# माणूस

शनिवार । १० फेब्रुवारी १९७९ । ७५ पैसे

## एक शिक्षक-क्रांतिकारक काय उभारू शकतो ?

आयुष्यात ज्यांनी सतत अपमान व क्रौर्य यांचे अनेक घाव सोसले आहेत अशा शेकडो लहान मुलांना नवीन शिक्षण देऊन त्यांच्यामध्ये अपूर्व बदल घडवून आणण्याचे प्रचंड कार्य क्रांतीनंतरच्या रशियात कोणी केले असेल तर ते ए. एस्. मकरेन्को ह्या एका साध्या शिक्षकाने.

" तुम्ही एक अचाट गृहस्थ आहात व आजच्या रशियाला अशाच माणसाची गरज आहे " असे मॅक्झिम गॉर्कीने ज्यांच्याविषयी म्हटले त्या शिक्षक-क्रांतिकारकाचे ' रोड टू लाइफ ' हे एक महान् पुस्तक.

झोपडपट्ट्यांतून, खेड्यापाड्यांतून, गलिच्छ वस्त्यांतून नवा माणूस घडवण्याचे कार्य करणाऱ्या जगभरच्या क्रांतिकारक तरुणांना, ध्येयवादी शिक्षकांना प्रेरणा देणाऱ्या या महान् पुस्तकाचा अनुवाद.... ' गॉर्की कॉलनी '

या अंकापासून सादर होत आहे.

## आंतरराष्ट्रीय बालकवर्षानिमित्त ' माणूस 'द्वारा प्रस्तुत खास पुस्तकभेट

# साप्ताहिक माणूस

**वर्ष अठरावे–अंक सदतिसावा**

**१० फेब्रुवारी १९७९**

**मूल्य ७५ पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

¤

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४ ३४ ५९

¤


# एकात्म मानव दिन....

दीनदयाळ संशोधन संस्थेच्या पुणे शाखेच्या वतीने दि. ११ फेब्रुवारीला पं. दीनदयाळ उपाध्याय यांचा दहावा स्मृतिदिन 'एकात्म मानव दिन' म्हणून साजरा होत आहे.

दिल्लीला नानाजी देशमुख यांच्या नेतृत्वाखाली या संस्थेने राष्ट्र-उभारणीचे व मानवसेवेचे खूप मोठे कार्य आजवर उभे केलेले असले तरी देशाच्या इतर भागात अद्याप या संस्थेची फारशी ओळख नाही. आंध्र-वादळग्रस्तांच्या मदतीला गेल्या वर्षी ही संस्था धावून गेली व तिथे एक 'दीनदयाळपुरम्' म्हणून गाव वसवून तिने आपल्या विधायक कर्तृत्वाचा पुरावा सादर केला हे खरे असले तरी महाराष्ट्रात अद्याप तिचे कार्य जाणवत नाही. वैचारिक क्षेत्रात तर मुळीच नाही. एकात्म मानववादाची नवीन संदर्भात पुन्हा व्यवस्थित मांडणी करण्याची वास्तविक आज नितांत गरज आहे. दीनदयाळ उपाध्याय हयात असताना त्यांचे आयुष्य बहुतांशी पक्षसंघटनेच्या व्यापात गुंतलेले राहिल्याने आपल्या तत्त्वज्ञानाची सर्वांगीण मांडणी करण्यासाठी आवश्यक तो वेळ व निवांतपणा त्यांना लाभलाच नाही. काही ढोबळ रूपरेषा त्यांनी आपल्या निवडक एक-दोन ग्रंथांत आखून ठेवलेल्या आहेत. मुख्य गाभा सांगून ठवलेला आहे; पण त्या आधारे प्रचलित समस्यांच्या संदर्भात ही विचारसरणी, हे तत्त्वज्ञान पुढे नेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न फारसा कुठे होताना दिसत नाही. 'गांधी, लोहिया आणि दीनदयाळ' हे दीनदयाळ संशोधन संस्थेमार्फत प्रसिद्ध झालेले पुस्तक त्या दृष्टीने अगदीच निराशाजनक आहे. लहान मुले जोडचा जमवतात तसा या तीन व्यक्तींच्या विचारातील साम्यस्थळे एकत्र आणण्याचा हा एक फार प्राथमिक खटाटोप आहे. गरज आहे ऐतिहासिक दृष्टिकोनातून या तत्त्वज्ञानाची प्रथम मांडणी होण्याची. कुठल्या परिस्थितीत हे तत्त्वज्ञान निर्माण झाले? या तत्त्वज्ञानाची पूर्व-पीठिका कोणती? या तत्त्वज्ञानाचा विकास कसकसा होत गेला? विकासाचे प्रमुख टप्पे कोणते? दीनदयाळांनी नेमकी कोणती भर घातली? हे तत्त्वज्ञान चार्वाकासारखे खासच केवळ पुस्तकी नाही. काही आचारधर्म, काही कार्यक्रम, समाजपरिवर्तनाचा काही निश्चित दृष्टिकोन, कृती आणि विचार यांची विशिष्ट सांगड या तत्त्वज्ञानात घातली गेलेली आहे. या तत्त्वज्ञानाच्या पाइकांकडून काही आव्हाने दिली गेलेली आहेत, काही स्वीकारण्यातही आलेली आहेत. कुठले आव्हान केव्हा, का दिले गेले, नवी आव्हाने कोणती आहेत, याबद्दल काही डोळस मार्गदर्शन होईल अशा तऱ्हेने या तत्त्वज्ञानाची, एकात्म मानव विचाराची मांडणी, शोध-बोध होण्याची आवश्यकता आहे. तसा अद्याप प्रयत्न होताना दिसत नाही. सेवाकार्य सुरू आहे. कार्यामागील तळमळही जाणवणारी आहे; पण वैचारिक स्पष्टतेबाबत पुरेशी

दक्षता दिसत नाही. आजच्या वैचारिक गोंधळाच्या परिस्थितीत तर या दक्षतेची फारच आवश्यकता आहे. इतक्या विचारसरणी, प्रवृत्ती परस्परांना छेद देत, परस्परात मिसळत आहेत, की काही अमेरिकन समाजशास्त्रज्ञ म्हणतात त्याप्रमाणे 'End of Idiology' चा कालखंड जवळ आला आहे की काय अशी शंका यावी. अमेरिका हा संपन्न देश आहे. तिथे कदाचित् कुठल्याच ध्येयवादाची, आदर्शाची आज गरज भासत नसावी. एक मुक्त समाज, एक उपभोगप्रधान संस्कृती तिथे उभी आहे. भारत आज या अवस्थेपासून कित्येक योजने दूर उभा आहे. दारिद्र्य, मागासलेपणा, विषमता यातून बाहेर पडण्याच्या प्राथमिक धडपडीत व्यग्र आहे. काही आदर्शाशिवाय, ध्येयवादाशिवाय ही धडपड यशस्वी होणार नाही हे चीन–रशिया यांच्या इतिहासावरून स्पष्ट झालेले आहे. आदर्श वेगवेगळे असू शकतात; पण उपभोगाला गौण मानून, व्यक्तीला थोडे कमी महत्त्व देऊन समुदायहिताचा विचार या देशांनी केला म्हणून पन्नास–साठ वर्षांत ते अमेरिकेसारख्या संपन्न देशाशी बरोबरीच्या नात्याने वागू शकण्याइतके प्रबळ झाले. युरोप – अमेरिकेला जी प्रगती साधायला दोनशे वर्षे लागली ती निम्म्या वेळात साधण्याचा त्यांचा प्रयत्न बराचसा यशस्वी ठरला, हे तर कुणीच नाकारू शकत नाही. तेव्हा End of idiology युगाचा विचार मांडला जात असला तरी भारतीय जनतेला ही चैन, ही मुक्तता आजच परवडण्यासारखी आहे की नाही, हेही पाहिले पाहिजे आणि त्या दृष्टीने एकात्म मानववादाने आपली वैचारिक पायाभरणी जागरूकपणे, तातडीने करायला हवी.

एकात्म मानववादाची पृष्ठभूमी ही रा. स्व. संघाची पृष्ठभूमी. रा. स्व. संघ हा हिंदू संघटनेसाठी स्थापन झाला व आता तो भारत संघटनेच्या टप्प्यावर उभा आहे. पंचवीस साली संघ स्थापन झाला तेव्हा 'हिंदू हा संघटित होऊच शकत नाही' असा ठाम समज दृढमूल होता. सघाने हे आव्हान स्वीकारले व दैनंदिन शाखांची एक विशिष्ट कार्यपद्धती शोधून हा दृढमूल झालेला समज खोटा ठरवला, आव्हान यशस्वीपणे पेलून दाखवले. हिंदू समाज आज केवळ संघटितच नाही तर एका विजिगीषु मनःस्थितीत आहे हे संघाचे, हिंदुराष्ट्रवादाचे, सावरकर-हेडगेवार-गोळवलकरगुरुजी यांचे यश आहे. या मनःपरिवर्तनाला पन्नास वर्षे लागली पण ते यशस्वी झाले. आता टप्पा आहे भारतसंघटनेचा. दक्षिण-उत्तर वाद आहेत. दलित आणि सवर्ण परस्परांपासून दूर चालले आहेत. नागालँड-झारखंड या चळवळी पुन्हा डोके वर काढू लागलेल्या आहेत. मुस्लिमांचा अलगतावाद संपलेला नाही. पॅन इस्लामची हाक मध्यपूर्वेकडून येऊ लागलेली आहे. आग्नेय आशिया सुरक्षित नाही. अनेक राष्ट्रीय–उपराष्ट्रीय किंवा अतिराष्ट्रीय संकटांवर मात करून भारताचे ऐक्य व प्रगती साधण्याचे या दशकाचे आव्हान आता आपल्यासमोर आहे. संघाचा हिंदुत्ववाद, एकात्म मानववाद आज या टप्प्यावर उभा आहे. क्षितिजे विस्तारलेली आहेत. आव्हाने मोठी आहेत. उगमाजवळ नदीचे जे स्वरूप असते ते पुढे बदलते–विस्तारते, खोल आणि गंभीर होत जाते; पण स्वरूप बदलले तरी प्रवाह तोच असतो. एकात्म मानववाद या प्रवाहात आज नेमका कुठे उभा आहे? या ठिकाणी प्रवाहाला कोणते वळण देणे आवश्यक आहे? प्रवाहातले या ठिकाणचे भोवरे कोणते? हिंदुत्वाच्या मूळ गंगोत्रीपासून प्रवाह आता बराच पुढे सरकलेला आहे. या प्रवाहाचे अंतिम उद्दिष्ट 'एकात्म मानव' हे आहे; पण एकात्म हिंदू ते एकात्म मानव या प्रवासातला 'एकात्म भारत' हा मधला, महत्त्वाचा टप्पा अद्याप पूर्णपणे गाठला गेलेला नाही. हा गाठायचा तर प्रत्यक्ष कार्याबरोबरच वैचारिक स्पष्टतेची, तत्त्वज्ञानात्मक डोळसपणाचीही आवश्यकता पदोपदी जाणवणार आहे. नाही तर चालू गोंधळात वाट हरवली जाण्याचा धोकाच अधिक! हा धोका टाळायचा असेल तर प्रत्यक्ष सेवाकार्याइतकाच हा वैचारिक स्पष्टतेचा, डोळस ध्येयवादाचा प्रसारही आवश्यक मानला जायला हवा. नाही तर कामे होतील पण ठसा उमटणार नाही. 'इदं क्षात्रं, इदं ब्रह्म' असे पूर्वी विश्वामित्राचे वर्णन होते. वैचारिक आणि समरांगणिक अशा दोन्ही सामर्थ्यांनी विश्वामित्र युक्त होता म्हणून इंद्राचे सिंहासन तो हलवू शकला. काळ बदलला असला तरी यशापयशाची गणिते काही बदलत नसतात. कार्य आणि विचार, प्रेरणा आणि कृती यांची सांगड घालावीच लागते. ती सांगड दीनदयाळ संशोधन संस्थेकडून घातली जावी ही अपेक्षा या प्रसंगी चूक ठरू नये.

**–श्री. ग. मा.**

संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# इतिहास संशोधन मंदिरात

जो गतकालातील वस्तू शोधून काढतो तो इतिहाससंशोधक होतो. जो गतकालातील गोष्टी सांगतो तो लेखक होतो..

वृत्तीतील या साधर्म्यामुळे इतिहास संशोधन मंदिराच्या इमारतीवरून जाताना मला नेहमी आपुलकी वाटावयाची. माझा तो रोजचाच रस्ता. न कळत मान वळावयाची. उंच गोथिक पद्धतीची इमारत. ऐसपैस मोठा दरवाजा. आतील काळोख. बाहेरूनसुद्धा जाणवणारी आतील प्राचीनता, अगदी गूढ वाटावयाचे. फारशी हालचाल नाही, गडबडही नाही. हॉलमध्ये खुर्च्या मांडलेल्या; पण माणसे नाहीत. दाराबाहेर फळ्यावर खडूने व्याख्यान लिहिलेले, वक्ता लिहिलेला. विषय बहुधा अनाकलनीय. म्हणजे 'नाटकांच्या राजधानीवर नवा प्रकाश' किंवा 'गोदावरीकाठावरील आदिमानवांची हत्यारे.' अशा या विषयांवर बोलतो कोण? आणि ते ऐकायला येतं कोण? बाहेर रेडिओ वाजताहेत, आकाशातून स्पुटनिक डोक्यावरून जात आहेत आणि गुहेत एखादा ऋषी तप करीत बसलेला असावा तसे तेथील लोक वाटत. त्यामुळे या संस्थेविषयीचे माझे आकर्षण वाढतच चालले होते.

शेवटी एकदा या इमारतीत जाण्याचा योग आला. माझी आई आमच्याकडे आली असता तिला ज्या तऱ्हेचे वाचावयाची आवड ते विषय इ. सं. मंदिराच्या ग्रंथालयात आहेत असे कळले. मी इ. सं. मंदिरात जाऊन पुस्तके पाहिली. खरोखरीच कथा कादंबरी हा विषय जवळजवळ तिथे वर्ज्य दिसला. रामायणे, महाभारते, संस्कृत काव्ये, चरित्रे, बखरी, पोवाडे, लावण्या, ज्योतिष आणि आपल्या स्वप्नातही येणार नाहीत अशा विषयांची पुस्तके तिथे होती. असे लक्षात आले की, असले पुस्तक लिहिले की लेखकाने इ. सं मंडळाला भेट पाठवावे हा संकेतच असावा. या वाचनालयात पुस्तक असल्याचा त्यांना मान वाटत असावा– आजही तेच असेल. मात्र या पुस्तकांमुळे आईचे पुण्यातले दिवस चांगले गेले परवा म्हणजे दि. २४।१।७९ रोजी सायंकाळी सहाला तिथे असलेल्या एका व्याख्यानाला गेलो. विषय होता– 'वरंघळ, हनमकोंडा, श्रीशैलम्, देवगिरी, अजिंठा इत्यादी ठिकाणचे अवशेष.' वक्ते होते डॉ. परचुरे, डॉ. कानडे, श्री शेटचे, श्री फाटक, श्री. साठे. अध्यक्ष– प्रा. ग. ह. खरे. मी सहाला तिथे गेलो तेव्हा अक्षरशः कुणीही नव्हतं. अध्यक्षांची खुर्ची-टेबल आणि समोर तशाच पाउणशेएक खुर्च्या रिकाम्या होत्या. हॉलमध्ये शिरताच डाव्या हाताला दोन–चार म्हातारे बसले होते. आपण वर्तमानपत्रात वाचावयास चुकलो की हेच लोक सभेचं विसरले? इतिहास–संशोधक विसराळू असतात हे प्रसिद्धच आहे. मागच्या पिढीच्या लेखकांची एक तरी गोष्ट इतिहाससंशोधकावर असे. त्या गोष्टी खऱ्याच तर!

एकीकडे असे मनात येत असता दुसरीकडे सभेला कुणी येऊ नये याचेही वाईट वाटत होते. इतिहासात लोकांना एवढी गोडी नसावी! सभेला कुणी येणार नाही या कल्पनेनं माझीच धडधड होऊ लागली. माझ्या मनात आलं, या रिकाम्या अध्यक्षीय खुर्ची–टेबलात आणि समोरच्या त्याहून रिकाम्या श्रोत्यांसाठी ठेवलेल्या खुर्च्यांत काय संवाद होत असेल?

हा जो मला शॉक बसला त्या अगदी उलट शॉक काही वर्षांपूर्वी बसला होता. आईसाठी सभासद झाल्यानंतर काही वर्षांनी दोन गृहस्थ माझा पत्ता शोधीत घरी आले. कुणी आपला पत्ता शोधीत आले की, बरे वाटते. त्याहूनही ते माझे मत मागायला आले आहेत हे कळल्यावर अधिक बरे वाटले. इतिहाससंशोधन मंदिराच्या कार्यकारिणीसाठी ते उभे होते. सर्व स्तरांवर फोफावलेल्या आपल्याकडील लोकशाहीने माझ्यासारख्या साध्यासुध्या नागरिकांना आपला अहंकार सांभाळण्यास संधी दिली आहे केंद्र-निवडणुकी, राज्य-निवडणुकी, जिल्हा-निवडणुकी, बँका, वाचनालये आणि लहान–मोठ्या संस्थांच्या निवडणुकी यामुळे वर्षातून एकदा तरी नागरिकांना भाव येतो.

चौकशी करता जितक्या जागा होत्या त्याच्या चौपट उमेदवार उभे होते असे कळले. ते ऐकून मला धक्का बसला. काही वर्षांपूर्वी इ. सं. मंडळाच्या निवडणुका केव्हा होत हे कळतही नसे. कुणी म्हटले असते की आपण इ. सं. मं.च्या निवडणुकीत उभे आहोत तर लोक हसलेच असते.

तेव्हा काही तरी घोटाळा होता. काळ बदलला होता. मला आठवले की, त्या आधीच्या वर्षी नगर वाचनालयाच्या निवडणुकीसाठी इतके उमेदवार उभे होते की, मत देण्यास पत्रकांच्या ढिगातून जावे लागले होते. निवडणुकांचे पर्व आले होते. जणू प्रत्येकजण कुठच्या तरी निवडणुकीला उभा राहात होता. केंद्रासाठी फार स्पर्धा म्हणून असेम्ब्लीसाठी, तिथे फार स्पर्धा म्हणून नगरपालिकेसाठी. तिथे स्पर्धा वाढल्यावर उमेदवार लोक लहान लहान संस्थांकडे वळले होते आणि शेवटी ते भारत इतिहास संशोधन मंडळाच्या निवडणुकी लढवीत होते.

या संस्थेचे द. वा. पोतदार अनेक वर्षे अध्यक्ष होते. मनात आले त्यांनाही स्पर्धेत उतरावे लागले की काय? त्यांनी लिहावयास घेतलेल्या शिवचरित्रावर पुष्कळ विनोद ऐकूनही हे गृहस्थ मला फार आवडत. त्यांच्याशी बोलावयाचे कसे हीच पंचाईत होती. तसे म्हटले तर पंचाईत नव्हती. एक विषय सुरू केल्यावर पुन्हा सभेला त्याच विषयावर येईपर्यंत ते इतके विषय काढतात की, एका विषयास सुरवात करून आपण घरी जाऊन स्नान, जेवण, वामकुक्षी उरकून हवे तर चहा घेऊन यावे. बहुधा तोपर्यंत मूळ विषयावर पोतदार आले नसले तरी येण्याची चिन्हे तरी तुम्हाला दिसावी. एकदा

गायकवाडवाड्यात गणपती उत्सवात त्यांचे व्याख्यान होते विषय बरा वाटला म्हणून ऐकावयास आत शिरलो. त्यांनी पाच एक मिनिटे विषयाला आरंभ केला. नंतर ते शिवाजीच्या जन्मतारखेबद्दल बोलू लागले. त्यावरून ते पंचागांच्या वादात शिरले आणि पंचागा–पचागामधील मतभेद, सरकारने नेमलेले मंडळ वगैरे सविस्तरपणे सांगता सांगता त्यांनी फ्रान्स आणि पॅरिसबद्दल सांगण्यास सुरवात केली. तेव्हा मूळ विषयावर गाडी एवढ्यात येत नाही हे ओळखून आम्ही तेथून काढता पाय घेतला; पण जरा नाईलाजानेच. कारण त्यांची ही विषयांतरेही ऐकायला चांगली वाटतात.

अशा या गृहस्थांशी मी एकदाच बोललो. म्हणजे प्रयत्न केला. मी त्यांना विचारले की, 'शिवाजीमहाराजांचे वेळी कॉफी होती हे खरे का?' ते एकदम फटकारीत म्हणाले, 'कुणी सांगितले तुम्हाला? काही कथा-कादंबऱ्या रचित असतात! इतिहास म्हणजे कादंबरी नाही.'

मी म्हटलं की, 'तत्कालिन इंग्रजांच्या पत्रव्यवहारातून हे आहे. शिवाजीमहाराजांनी या गोऱ्या पाहुण्यांसाठी मुद्दाम कपबशा व कॉफी ठेवली होती.'

ते मला उडवीत म्हणाले, 'भाकडकथा!'

मग त्या संदर्भात त्यांनी इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगितल्या व त्यात माझा प्रश्न ते विसरले व मीही विसरलो.

□

साधारण साडेसहाला, आजच्या सभेचे अध्यक्ष प्रा. ग. ह. खरे, वक्त्यांसाठी व स्वतःसाठी सभेत न चुकता लागणारे तांब्याभांडे घेऊन आले. ते टेबलावर ठेवून अध्यक्षांच्या आपल्या खुर्चीवर बसले. प्रेक्षकांच्या खुर्च्या अजून रिकाम्याच होत्या; पण ते निर्धास्त दिसले. खुर्चीवर बसून बरोबर आणलेली अध्यक्षांची घंटा टेबलावर ठेवून त्यांनी ती जोरजोरानं खणखणवली. जणू परिकथेत जादूने गवतातून सैनिक उत्पन्न झाले, तसे घंटेच्या प्रत्येक आघाताला प्रेक्षक निर्माण होऊन खुर्च्या भरणार होते! पण तसे काही झाले नाही तरी दाराजवळ लहान टेबलाशी बसलेले चौघं-पाचजण म्हातारे, खरे यांनी त्यांना पुढे येऊन बसा म्हणताच उठून पुढे खुर्च्यांवर येऊन बसले. मग एक एक खुर्ची भरत चालली. मीही जाऊन बसलो. लौकरच लक्षात आले की, मी चौदावा श्रोता आहे; पण वक्ते कुठे आहेत? मलाच अपराध्यासारखे वाटू लागले. मी मागे वळून दाराकडे पाहिले तेथून रस्त्यावरची रहदारी दिसत होती. मी झटकन तोंड वळविले. कुणी मला इथे पाहिले तर हसेल– वेड्यात काढील किंवा म्हातारा झाला म्हणेल. मला जे लाजल्यासारखं वाटत होतं, तसं वक्त्याच्या वा श्रोत्यांच्या कुणाच्याच तोंडावर काही दिसत नव्हतं. समोर वक्त्याकडे बघत श्रोते रस घेऊन ऐकत होते. मी मागे वळून पाहिले हे चुकले होते. अशा सभेत मागे बघायचे नसते.

हैद्राबाद हिस्ट्री कॉंग्रेसला इथली मंडळी जाऊन आली होती. तेथे वरंघळ, हनमकोंडा, श्रीशैलम्, देवगिरी, अजिंठा इत्यादी स्थळे व तिथले अवशेष पाहून आली होती. सर्व वक्ते त्यावरच बोलणार होते. अध्यक्षांनी प्रथम डॉ. परचुरे यांना बोलण्याची विनंती केली. परचुरे म्हणाले, 'आंध्र हा देवळांचा देश आहे. हैद्राबादचे सालारजंग म्युझियम प्रचंड आहे; पण वस्तु मिळाली तशी साठवली आहे. त्याला पद्धत नाही. वरंगळ किल्ला वैशिष्टपूर्ण आहे. त्याचे बांधकाम सत्तर वर्षे चालले होते. २५ मैलांचा कोट आहे व भोवेताली खंदक आहे. आवारातील देऊळ भग्नावस्थेत आहे. [ 'वंडर्स दॅट वॉज इंडिया' या पुस्तकाचा लेखक इथं भेटला. ] रामप्पा देऊळ फारच चांगले आहे. हिंदू लोक हे अध्यात्मवादी नसून संपूर्ण इहवादी होते हे येथील एंजिनिअरिंग पाहून कळते.'

हळूहळू व्याख्यानांना रंग चढू लागला. मी मागे मान वळवून पाहिले. माझ्यापुढे आधी तेरा लोक होते. आता माझ्या मागे तेरा लोक बसले होते. मला एकदम बरे वाटले. खूपच छान गर्दी होते की इथे! माझ्या मनात आलं.

मी व्याख्यानाला शिरताना बाहेर सूर्यप्रकाश होता. आता अंधार पडला होता. शहरात संध्याकाळ होत असता अंधार केव्हा पडतो कळत नाही. पुढचे वक्ते श्री. शेटचे होते. ते म्हणाले,

'दक्षिणेकडची देवळं नीट ठेवली जात नाहीत. त्यातून देवळांचा भोवताल फारच वाईट असतो. रामप्पाचंही वातावरण वाईटच आहे. या देवळांना राजे लोकांनी द्रव्य दिले; पण बांधणारे कारागीर वेगळेच होते. ही परंपरा असुरांची होती. ती पहायला हवी.'

तिसरे व्याख्यान फाटक या गृहस्थांचे झाले. ते सर्वात तरुण म्हणजे चाळिशीतले होते. ते म्हणाले, 'श्रीशैल बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. पूर्वी या मार्गावर दरोडेखोरांचे भय होते. आता धरणाचे काम चालू

पृष्ठ २८ वर

'सफर'
[ माझा राजकीय प्रवास – १९४० ते १९७५ ]
लेखक : मोहन धारिया
डेमी आकार । ३८८ पृष्ठे । मूल्य चाळीस रुपये

विशेष सवलत

शहा आयोग – शोध आणि बोध
लेखक : पन्नालाल सुराणा, अनिल गोरे, विनय हर्डीकर
डेमी आकार । १७३ पृष्ठे । मूल्य पंधरा रुपये

दोनही पुस्तकांचे एकत्रित मूल्य रु. ४५/– + टपालखर्चापोटी रु. ३/– एकूण रुपये ४८/– ची मनीऑर्डर पाठवा आणि पुस्तके घरपोच मिळवा.

विश्वकर्मा साहित्यालय
२०३५ सदाशिव पेठ, टिळक पथ, पुणे ३०

मुंबई वार्ता

विनय सहस्रबुद्धे

## □ डॉ. भाऊसाहेब उबाळे

१९७९ हे जसे आंतरराष्ट्रीय बालकवर्ष आहे, तसेच ते आंतरराष्ट्रीय वंशभेदविरोधी वर्ष सुद्धा आहे. या निमित्ताने डॉ. अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली गेल्या शुक्रवारी मुंबईत एक परिसंवाद पार पडला. असेच कार्यक्रम वर्षभर मुंबईत आणि देशात इतरत्रही होतील; पण हे सारे होत असतानाच वंशभेद आणि माधवाधिकारांच्या गळचेपी विरुद्ध कॅनडात एक प्रकारची चळवळ उभारून तेथील सरकारला या प्रश्नाची जाणीव करून देणारे एक भारतीय गृहस्थ डॉ. भाऊसाहेस उबाळे सध्या भारतात आहेत याची फार थोड्या जणांना माहिती असेल !

महाराष्ट्रात जन्मलेले डॉ. उबाळे ब्रिटिश सरकारची शिष्यवृत्ती घेऊन उच्च शिक्षणासाठी लंडन येथे गेले. ब्रिटनमधील सेंट अॅण्ड्रयूज विद्यापीठातून अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळविल्यानतर काही काळ ब्रिटनमध्ये व नंतर १९६७ पासून ते कॅनडात राहात आहेत.

कॅनडातील वास्तव्यात डॉ. उबाळे यांना सामाजिक व शासकीय व्यवहारात सर्वत्रच वंशभेदाची पाळेमुळे रुजली असल्याची तीव्र जाणीव झाली. वर्ण आणि वंशभेदामुळे कॅनडासारख्या प्रगतीशील राष्ट्रातही कृष्णवर्णीयांना, विशेषत: दक्षिण आशियाई राष्ट्रातील स्थलांतरितांना सुखाचे जिणे जगता येत नाही. अलीकडच्या काही वर्षांत तर भिन्न वर्णीयांतील दंगलींचे प्रमाणही वाढू लागले होते.

कॅनडातील दक्षिण आशियाई लोकांची संख्या सुमारे दोन लाखांपेक्षा जास्त आहे व त्यातील जवळजवळ ४०% लोक टोरंटो महानगरीचे रहिवासी आहेत. गौरवर्णीयांकडून वारंवार होणारे अपमान, धमक्या आणि दैनंदिन जीवनात त्यामुळे आलेली असुरक्षितता या सर्व गोष्टींमुळे कॅनडाचे नागरिकत्व मिळालेल्या या जनतेने या अत्याचारांविरूद्ध जोरदार आवाज उठविला. या सर्व चळवळीत डॉ. भाऊसाहेब उबाळे अग्रभागी होते. कॅनडातील वंशभेदाचे स्वरूप सांगताना डॉ. उबाळे म्हणाले की, या वंशभेदामुळे मोठ्या प्रमाणावर हिंसाचार होत आहेत आणि दक्षिण आशियाई स्थलांतरितांची मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्तहानी होत आहे. आगगाड्या, बसेस, चित्रपटगृहे, दुकाने, उपहारगृहे, उद्याने इ. सर्वत्रच कृष्णवर्णीयांना भयानक अपमान तर सोसावा लागतोच; पण कधीकधी शारीरिक अत्याचारही सहन करावे लागतात. साहजिकच या स्थलांतरितांमध्ये एक प्रकारची भयाची भावना सतत असते.

कृष्णवर्णीयांच्या मुलांना शाळांमध्येही अशाच अपमानाला तोंड द्यावे लागते. विशेष म्हणजे बरोबरीच्या विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकही या मानसिक व शारीरिक अत्याचारांत सहभागी होतात. नोकरी मिळवितानाही स्थलांतरितांसमोर असंख्य अडचणी असतात आणि दरवेळी गौरवर्णीयांपेक्षा कृष्णवर्णीयांना कमी लेखले जाते.

स्थलांतरितांच्या या साऱ्या वेदना या उपेक्षित समाजघटकाचे एक प्रतिनिधी म्हणून डॉ. उबाळे यांनी 'समान संधी आणि सामाजिक धोरण' या शीर्षकाच्या एका निबंधात व्यक्त केल्या आहेत. प्रत्यक्ष अनुभव आणि या समस्येचा सखोल व सर्वांगीण अभ्यास या आधारे डॉ. उबाळे यांनी हा निबंधवजा अहवाल तयार करून अंटारिओ राज्याच्या अॅटर्नी जनरलना सादर केला.

सहा महिन्यांच्या परिश्रमानंतर तयार केलेल्या या अहवालात डॉ. उबाळे म्हणतात, 'आम्हा कृष्णवर्णीयांवर वारंवार होणाऱ्या हल्ल्यांची वा शारीरिक अत्याचारांची पोलिसयंत्रणा किंचितही दखल घेत नाही, ही अत्यंत दुःखद गोष्ट आहे. तसेच घरांचे विक्री-व्यवहार, रोजगारविनियोजन, शासकीय व्यवहार इ. बाबत कृष्णवर्णीय आणि गौरवर्णीय यांच्यात नेहमीच भेद केला जातो. स्थलांतरित कृष्णवर्णीयांपैकी अनेक जण आपापल्या क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी केलेले आहेत आणि कॅनडाच्या समृद्ध लोकजीवनात त्यांचे स्थान संख्या व कामगिरी या दोन्ही दृष्टिकोनांतून महत्त्वाचे आहे. तसेच आपण कॅनडाचेच सुपुत्र आहोत हीच भावना या स्थलांतरितांमध्ये असते. या साऱ्या पार्श्वभूमीवर वंश व वर्णभेदावरून जी हीन वागणूक मिळते ती निषेधार्ह आहे!'

हा अभ्यासपूर्ण अहवाल सादर केल्यानंतर डॉ. उबाळे एकाएकी प्रकाशझोतात आले. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ अशा सर्व माध्यमांतून त्यांना बरीच प्रसिद्धी मिळाली. या अहवालाचे महत्त्व व समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन कॅनडातील सरकारने डॉ. उबाळे यांची १९७७ मध्ये मानवाधिकार आयुक्त म्हणून नेमणूक केली. कॅनडाच्या इतिहासात प्रथमच हे पद कायदेशीर कॅनेडियन नागरिक नसलेल्या व तेही एका दक्षिण आशियाई स्थलांतरिताला मिळाले आहे.

ज्या आयोगावर डॉ. उबाळे यांची नियुक्ती झाली आहे तो आयोग व त्याची मानवाधिकारांच्या रक्षणाची कार्यपद्धती उल्लेखनीय आहे.

आपल्याकडे मानवाधिकार किंवा मूलभूत अधिकार आपल्या घटनेत समाविष्ट केले आहेत व त्यामुळे मानवाधिकारांची गळचेपी इ. बाबी न्यायालयांच्या अधिकार कक्षेत येतात. कॅनडात मात्र ही प्रकरणे हाताळण्यासाठी स्वतंत्र मानवाधिकार आयोग आहे. सर्व प्रकारच्या स्वातंत्र्यांवर बंधने, मर्यादा, मानवाधिकारांची हेळसांड, वंश वा वर्णभेदावरून अन्याय इ. सर्व बाबी हाताळण्यासाठी नऊ आयुक्तांचा हा एक आयोग बनविण्यात येतो. अशा प्रकारच्या अन्यायांची व स्वातंत्र्याच्या संकोचांची कोणतीही प्रकरणे दखलपात्र आहेत किंवा नाही याचा निर्णय हा आयोग घेतो. जी प्रकरणे दखलपात्र वाटतील ती नंतर ह्या आयोगाच्या शिफारशींसह एका स्वतंत्र चौकशी आयोगाकडे सोपविण्यात येतात. न्यायालयासारखेच चौकशीचे व शिक्षा सुनावण्याचे अधिकार असलेले हे चौकशीमंडळ मागाहून त्या त्या प्रकरणाची जाहीर सुनावणी करून आपला निवाडा देते.

सर्वसाधारणत: न्यायालयाची पायरी चढायला सामान्य माणसे

कचरतात. प्रचंड वेळ व पैसा यांचा त्यापायी होणारा खर्च हे त्यामागचे मुख्य कारण ! कॅनडातील या नव्या पद्धतीमुळे मोठ्या प्रमाणावर वेळ वाचतो. कारण ही प्रकरणे हाताळण्यासाठी उभी असलेली स्वतंत्र यंत्रणा. शिवाय या यंत्रणेत मानवाधिकार विषयक प्रकरणांसाठी फिर्यादीला कोणताही खर्च करावा लागत नाही.

माझ्याशी गप्पा मारताना डॉ. उबाळे यांनी एक वेदना बोलून दाखविली. ते म्हणाले की, 'मी जेव्हा परदेशात समतेसाठी लढा देतो तेव्हा अनेकदा अनेकजण मला असं विचारतात की, तुम्ही इथे कॅनडात समतेसाठी चळवळी करता, आंदोलने करता हे ठीक आहे; पण कॅनेडियन जनता तुम्हा भारतीयांपेक्षा खूपच समंजस म्हटली पाहिजे. आमचे लोक वंशभेद मानत असतील, नाही असे नाही; पण निदान तुमच्या देशासारखे हरिजन वगैरेंना जिवंत जाळत तर नाहीत ! आम्ही कुणाचे डोळे काढत नाही ! त्यांच्या प्रतिपादनाला माझ्याजवळ उत्तर नव्हते.' मोठ्या विषण्ण मनाने डॉ. उबाळे यांनी सांगितले. □

## □ स्वागतार्ह निर्णय

महाराष्ट्रात नवे पु. लो. द. सरकार आल्यानंतर नगरविकासाच्या क्षेत्रात घेण्यात आलेला निर्णय म्हणजे मुंबईतील नव्या बाजारपेठेचा. गेल्या प्रजासत्ताकदिनी मुख्यमंत्री शरद पवार यांनी तुर्भे येथे मुंबई कृषी-उत्पन्न बाजार समितीच्या नव्या बाजारपेठेचं उद्घाटन केलं.

यापूर्वी ही वाजारपेठ गेली कैक वर्षे डंकन रोड या ठिकाणी होती. हा भाग सर्वच बाजारपेठा ह्या ठिकाणी केन्द्रित झाल्यामुळे सदैव गजबजलेला असतो. एखाद्या वाहनाला फर्लांगभर अंतर जायला या ठिकाणी पंधरा मिनिटे सहज लागतील इतकी प्रचंड गर्दी व त्यामुळे वाहतुकीची कोंडी या भागात होत असते. शिवाय वाढत्या व्यापाराला हे ठिकाण पुरेसे नाही. या ठिकाणी भाजीपाल्याचा घाउक व्यापार चालत असल्याने नाशिवंत वस्तूंच्या केर-कचऱ्यामुळे आरोग्यही धोक्यात येऊ शकले असते.

गेली अनेक तपे या भागातील रहिवाश्यांनी या प्रचंड बाजारपेठेमुळे होणारा त्रास विनातक्रार सोसला आणि शासनानेही ही बाब एक गंभीर समस्या म्हणून विचारात घेतली नाही. आता मात्र नवे नगरविकासमंत्री श्री. हशु अडवाणी यांनी मुंबईकरांचे अनेक प्रश्न सोडविण्याचे मनावर घेतले आहे व त्यांच्या कार्यक्षम कारभारात अनेक प्रश्न जरूर मार्गी लागतील.

डंकन रोड परिसरातील व्यापारउदीमाचे केन्द्रिकरण व त्यामुळे निर्माण झालेल्या समस्या दूर करण्यासाठी सरकारने तुर्भे येथे बाजारपेठ हलविण्याचा निर्णय घेतला असला तरी हे प्रकरण वाटते तितके सोपे नाही. आज अनेक वर्षांचे बस्तान नीट बसलेल्या व्यापाऱ्यांचा या स्थलांतराला विरोध आहे.

वस्तुतः तुर्भे येथील नव्या मार्केट यार्डात पूर्वीच्या बाजारपेठेत नसलेल्या अनेक सोयी-सुविधा आहेत. या मार्केट यार्डात ८६ दुकाने, १५९ चौथरे, ७२ पेढ्या आणि मालाच्या लिलावासाठी एक स्वतंत्र हॉल अशा सर्व सुविधा आहेत. या बाजारपेठेच्या विस्तारासाठी सभोवतीची ३०० एकर जागा राखून ठेवण्यात आली आहे.

वस्तुत; ही नवी बाजारपेठ शेतकरी व माथाडी कामगारांना सोयीची आहे. मुख्य म्हणजे या योजनेचे महत्त्व व मुंबईतील जनतेचे हित ओळखून माथाडी कामगारांनी समंजसपणे या योजनेला भरघोस पाठिंबा दिला आहे.

या योजनेला कट्टर विरोध आहे तो व्यापाऱ्यांचा. त्यांच्या मते डंकन रोड हे मध्यवर्ती ठिकाण आहे व त्यामुळे मालाची ने-आण करताना वाहतूक-खर्च कमी येतो. याउलट तुर्भे येथे बाजारपेठ नेण्याने वाहतूक-खर्च वाढेल व त्यामुळे भाववाढीचा धोका आहे. तसेच जुन्या बाजारपेठेतील कामगार व हातगाडीवाले यांनाही नवी बाजारपेठ गैरसोयीची आहे व म्हणून ही बाजारपेठ डंकन रोडवरून हलवू नये.

स्वतःची सोय आणि स्वार्थच फक्त दिसत असला की बाजू मांडण्यासाठी इतरांचा कसा पुळका येतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे कांदे-बटाटे व्यापाऱ्यांचे हे निवेदन. मुंबई शहराचा व्याप दिवसेंदिवस वाढत असल्याने मुळात डंकन रोड हे आता मध्यवर्ती ठिकाण राहिलेले नाही, उत्तर मुंबईतील अनेकांना ते गैरसोयीचे आहे व तुर्भ्याची बाजारपेठ त्यांना काही प्रमाणात तरी सोयीची वाटेल. कामगार व हातगाडीवाल्यांचा प्रश्न महत्त्वाचा असला तरी तो सोडविणे कठीण नाही. या दोन्ही वर्गासाठी तुर्भ्याच्या परिसरातच घरे बांधून देण्याचे आश्वासन श्री. हशु अडवाणी यांनी दिले आहेच. शिवाय व्यापाऱ्यांप्रमाणे कामगारांची भूमिका अडवणुकीची नाही. माथाडी कामगारनेते श्री. अण्णासाहेब पाटील यांनी व्यापक हित लक्षात घेऊन योजनेला विरोध तर केला नाहीच, पण उलट डंकन रोडवरील मालाच्या चढ-उतारावर बहिष्कार घालून एक प्रकारे व्यापाऱ्यांना चांगला धडा शिकविला आहे.

हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे व व्यापारी हा आपल्या प्रतिष्ठेचा प्रश्न करीत आहेत.

मुंबईतील लोखंडबाजार येत्या दोन वर्षांत कळंबोली (नवी मुंबई) येथे आणि कापडबाजार वांद्रे-कुर्ला परिसरात हलविण्यात येणार आहे ही नगरविकासमंत्र्यांची घोषणा आशादायी आहे. गोरेगाव-मुलुंड दरम्यान जोडरस्त्याचे बांधकाम वेगाने होत आहे. त्यामुळे नवी मुंबई उत्तर मुंबईच्या जवळ येईल. हे सारे बदल करीत असताना व्यापाऱ्यांनी आपल्यावर कोणतेही दडपण आणण्याचा प्रयत्न करू नये, हा श्री. अडवाणी यांचा परखड इशारा व्यापाऱ्यांनी लक्षात ठेवावा.

मुंबईप्रमाणेच ठाणे, डोंबिवली व कल्याण या शहरांना अनेक कठीण प्रश्न भेडसावत आहेत. नव्या राजवटीत त्यांचा निश्चित विचार होईल अशी आशा आहे. □

# मानवी हक्क

## लोकशाहीचा अविभाज्य भाग

वा. दा. रानडे

जगातील निरनिराळ्या देशांत मानवी हक्कांचे रक्षण व पायमल्ली याबाबत काय परिस्थिती आहे याची पाहणी ॲम्नेस्टी इंटर नॅशनल ही संस्था करीत असते. १९७८ मधील तिच्या कार्याचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. संयुक्त राष्ट्रसंघटनेने मानवी हक्कांची सनद मान्य करून गेल्या वर्षी तीस वर्षे झाली; पण जगातील ११० देशांत लोकशाही हक्कांची पायमल्ली चालू असल्याचे या संस्थेस आढळून आले. त्यात कम्युनिस्ट देश आहेत तसेच स्वतःला लोकशाहीवादी म्हणविणारेही देश आहेत. खऱ्या लोकशाहीच्या उद्दिष्टांपासून जग अजून किती दूर आहे हेच या अहवालावरून दिसून येते.

कोणत्याही देशातील प्रस्थापित सरकारची धोरणे, कारभार यांविरुद्ध मतप्रदर्शनाचा हक्क प्रत्येकाला असला पाहिजे; पण अनेक देशांत विरोधी आवाज दडपला जात आहे. विरोधकांना पळविणे, त्यांचा छळ करणे, त्यांना ठार करणे या मार्गांचा अवलंब दक्षिण अमेरिका आणि आफ्रिकेतील काही देशांत चालू असल्याचे आढळून आले, तर आशियातील काही देश आणीबाणीच्या कायद्याचा वापर करून आपल्या विरोधकांना चौकशीविना दीर्घकाळ तुरुंगात ठेवीत असल्याचे दिसून आले. अल्बानिया, अल्जेरिया, ब्रह्मदेश, मध्यआफ्रिका, कांपूकिया (कंबोडिया), उत्तर कोरिया या देशांतील परिस्थितीसंबंधी ॲम्नेस्टीस नीट माहितीच मिळू शकली नाही; पण जेथे मानवी हक्कांवर कोणत्या तरी स्वरूपाचे निर्बंध नाहीत असा एकही देश जगात नाही असे या संस्थेस वाटते.

आपल्या राजकीय व धार्मिक मतांमुळे किंवा वर्ण, लिंग, वंश, भाषा या कारणांमुळे निरनिराळ्या देशांत ४७२६ जणांना गेल्या वर्षी तुरुंगवास पत्करावा लागला. त्यांनी कोणत्याही प्रकारचा हिंसाचार किंवा दहशतीच्या मार्गाचा अवलंब न करता शांतपणे मतप्रदर्शन केले होते; पण केवळ प्रस्थापित सरकारच्या धोरणाविरुद्ध मतप्रदर्शन करणे हाच त्यांचा गुन्हा ठरला होता आणि राज्यकर्ते त्यांना नुसते कारावासात टाकूनच थांबले नाहीत तर पन्नास देशांत अशा लोकांना मारहाण करून त्यांचा छळ करण्यात आला अशी माहिती ॲम्नेस्टीकडे आलेली आहे. तेवीस देशांत अशा विरोधकांना एक तर गोळ्या घालून ठार करण्यात आले किंवा अटकेनंतर अज्ञातस्थळी पळवून नेले. काही जणांचे काय झाले याचा पत्ताच नाही !

इराणमध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या सभासदांना, तसेच संशयित कुर्डिश बंडखोरांना गोळ्या घालून ठार करण्यात आले ! त्यांच्या नातलगांना अटक करण्यात आली, कामगार चळवळीतील कार्याबद्दल ट्युनिशियात शेकडो लोकांना अटक करण्यात आली. इराणमध्ये शहाविरोधी आंदोलनात डाव्या गटाच्या तसेच धार्मिक विरोधकांना अटक झाली, अल्जीरियात माजी अध्यक्ष बेनबेला यांना गेली तीस वर्षे त्यांच्या घरी स्थानबद्ध करण्यात आलेले आहे. त्यांच्यावरील आरोपांची चौकशी नाही, खटला नाही !

रशिया आणि पूर्व युरोपातील कम्युनिस्ट राष्ट्रात प्रस्थापित राजवटीच्या विरोधकांना मनोरुग्ण ठरवून मनोरुग्णांच्या हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात येते असे ॲम्नेस्टीने निर्णायक पुराव्याने सिद्ध केलेले आहे. प्रस्थापित सरकारच्या धोरणाविरुद्ध मत व्यक्त केल्याबद्दल किंवा परवानगीशिवाय देश सोडून जाण्याचा प्रयत्न केल्याबद्दल कारावासाची शिक्षा देणारे कायदे या देशात अजून आहेत ! 'राज्याविरुद्ध गुन्हे' असे या गुन्ह्यांना म्हटले जाते. कारण वास्तविक हे गुन्हे नसतात आणि राज्याविरुद्धही नसतात. सरकारवर टीका किंवा विरोधी मतप्रदर्शन हा गुन्हा कसा म्हणता येईल ? आपली मते मोकळेपणाने मांडण्याचा हक्क प्रत्येकाला असला पाहिजे. हिंसाचाराने किंवा दहशतीने ती दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न मात्र त्याने करता कामा नये एवढेच बंधन अशा मतप्रदर्शनावर घालणे न्याय्य ठरेल. केवळ आपल्या सत्तेच्या जोरावर विरोधी मन दडपण्याचा अधिकार सरकारलाही असता कामा नये. लोकांना खुलेपणाने मत बनविण्याचे स्वातंत्र्य असणे आणि आपल्या मताचे सरकार त्यांनी निवडणे हीच खरी लोकशाही !

पाश्चात्य पद्धतीची लोकशाही खरी लोकशाही नव्हे. आमची समाजवादी लोकशाही हीच खरी लोकशाही असा दावा कम्युनिस्ट नेहमी करीत असतात; पण वस्तुनिष्ठ विचार करावयाचा तर या दोन्ही प्रकारच्या लोकशाही अपूर्ण आहेत. गुणदोष दोन्ही पद्धतींत आहेत. त्यातले दोष टाकून आणि गुण एकत्र करून परिपूर्ण लोकशाही आपणास निर्माण करावयाची आहे.

लोकशाहीची बाह्य चौकट पाश्चात्य लोकशाहीत आहे. तेथे सर्व प्रौढांना मताधिकार आहे. निवडणुकांनी सरकार निवडले जाते. अनेक राजकीय पक्षांना संघटनेची, मतप्रचाराची पूर्ण मोकळीक असते. लोकशाही म्हणजे आणखी काय हवे असा प्रश्न कोणाच्याही मनात येईल; पण जे मतदार सरकार निवडतात त्यांच्यावर निरनिराळ्या प्रकारची दडपणे येत असतात, त्याचे काय ? मुख्य दोष म्हणजे आर्थिक विषमता ! धनिकवर्ग आपल्या पैशाच्या बळावर आपल्या मताचा प्रभाव मतदारांवर पाडू शकतो. आपल्याकडे मताचा भाव ठरतो व ती विकत घेतली जातात तसे पाश्चात्य देशांत घडत असेल असे म्हणावयाचे नाही; पण वृत्तपत्रे व इतर प्रचारमाध्यमे, धनिकवर्गाच्याच हाती असून प्रचाराचा सतत एवढा मारा केला जातो की त्याचा प्रभाव पडू न देता स्वतंत्रपणे विचार करून आपले मत बनविण्याची शक्ती मतदारांत कितपत रहात असेल याची शंका येते. मतदानाचा हक्क खऱ्या अर्थाने मुक्तपणाने बजावता यावा यासाठी आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट व्हावयास हवी. त्यासाठी पाश्चात्य लोकशाही देशांनी समाजवादाच्या दिशेने पावले टाकायला हवीत. फ्रान्स व इटलीतील निवडणुकीत डाव्यांच्या हाती अजून सत्ता आली नाही तरी त्यांना जो वाढत्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे त्यावरून लोकमत या विचाराकडे झुकू लागले आहे असे दिसते. निवडणुका जिंकण्यासाठी सत्तेचा केवढ्या मोठ्या प्रमाणावर गैरवापर केला जातो हे अमेरिकेत निक्सनप्रकरणाने सिद्ध झालेलेच आहे.

पृष्ठ २८ वर

# जैन, शीख, बौद्ध

## सगळ्यांना विश्व हिंदू संमेलनाने जवळ आणले

**विनया खडपेकर**

दि. २४ जानेवारी संस्कृत संमेलन आणि दि. २५, २६, २७ जानेवारी विश्व हिंदू संमेलन प्रयागक्षेत्री धूमधडाक्यात पार पडले.

अलाहाबादपासून थोड्या दूर त्रिवेणी संगमाकाठचा परिसर कसा गजबजून गेला होता. कित्येक हजार तंबू उभारले होते. थंडीपासून बचाव होण्यासाठी तंबूत पेंढा पसरला होता. ही एक मोठी छावणी अनेक नगरांत विभागली गेली होती. मुंबईचे महावीरनगर, बाकी महाराष्ट्राचे ज्ञानेश्वरनगर. गुजराथचे नरसी मेहतानगर. एक वेगळे पत्रकारनगर. अशी शेकडो नगरे !

हिंदुस्थानच्या काना-कोपऱ्यातून हिंदू उत्साहाने आले होते. विविध भाषा बोलणारे, नाना पोषाखातले हिंदू, 'हाऊ नाइस' 'हाऊ फाइन' करणाऱ्या बेलबॉटममधल्या तरुणींपासून घुंगट घेऊन 'अठनेतठने' बोलणाऱ्या राज्यस्थानातील स्त्रियांपर्यंत सगळ्या आल्या होत्या. तीन-चार वर्षांच्या मुलांपासून पंचाहत्तर वर्षांच्या म्हाताऱ्यांपर्यंत सगळ्या वयांचे लोक होते. भगवी वस्त्रे नेसलेले गौरवर्णीय 'हरे राम हरे कृष्ण' होते, तसेच सुटाबुटातले भजनपूजन न करणारे कृष्णवर्णी हिंदूही होते.

कोणी विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते म्हणून आले होते. कोणी परिषदेबद्दल आस्था म्हणून आले होते. कोणी हिंदू धर्माच्या प्रेमाने आले होते. कोणी शंकराचार्यांचे दर्शन होईल, गंगास्नान घडेल म्हणून आले होते. कोणी केवळ प्रवासाच्या आवडीने आले होते. कोणी आपले नातेवाईक, मित्र आले म्हणून आले होते; परंतु सगळे समेलनाच्या उत्सवात सहभागी झाले होते.

पहाटे पाच वाजल्यापासून नगरांमधले ध्वनिक्षेपक प्रातःस्मरणाने तंबूतल्या लोकांना जागे करीत. मग पहाटेच्या दाट धुक्यात लोकांचे मुखमार्जन-स्नानादि कार्यक्रम सुरू होत. आश्चर्य म्हणजे प्रतिनिधींची संख्या एवढी प्रचंड-पन्नास हजाराच्या आसपास; पण कोठे गोंधळ नाही. शौचकूपाला रांग नाही. स्नानगृहाला रांग नाही. शिवाय स्नानासाठी कडकडीत गरम पाणी. सगळे आवरून झाले की, चहा-कॉफीच्या स्टॉलकडे धाव ! सकाळच्या न्याहारीसाठी चहा-कॉफी, दूध, गुलाबजंब, जिलबी, बंगाली मिठाई. (पैसे देऊन)

न्याहरी घेऊन, थोडे फार हिंडावे तर कार्यक्रमाची वेळ व्हायचीच ! नऊ वाजल्यापासून मातृमंदिर सभामंडपाकडे सगळेजण जाऊ लागत. साधारण दुपारी एक वाजेपर्यंत कार्यक्रम चालत. कार्यक्रमात निरनिराळ्या लोकांची भाषणे, ठराव. दुपारी जेवायला द्रोणामध्ये भाजी पुरी, सब्जी-रोटी, डाळ-भात. प्रत्येकी एक एक रुपया ! ज्याला जे लागेल ते त्याने घ्यायचे ! जेवण झाले की, तीनपर्यंत विश्रांती. कोणी आपापल्या तंबूत विश्रांती घेत; कोणी खरेदी करीत हिंडत. विवेकानंद, बाबू अरविंद घोष यांची जीवने दाखविणारी छोटी छोटी प्रदर्शने पहात. हिंदू धर्माची माहिती देणाऱ्या धर्मगंगा प्रदर्शनाला गर्दी करीत. दुपारचे स्वरूप जत्रेचे असे. पिपाण्या, फुगे, बांगड्या, स्वेटर्स असा माल विक्रीसाठी ठिकठिकाणी पसरलेला. विवेकानंद केंद्र, चिन्मयानंद मठ, रामकृष्ण मिशन, असे बरेच बुक-स्टॉल. सगळीकडे भरपूर गर्दी.

मग तीन वाजता सभामंडपात पुन्हा कार्यक्रम सुरू. ते सहा-साडेसहापर्यंत चालत. मग थोडे पाय मोकळे करण्यासाठी फिरणे. नगरात परत येऊन स्टॉलवर जेवण. रात्री आठ वाजता करमणुकीचे कार्यक्रम. वेगवेगळ्या प्रांतांचे व्यासपीठावर कार्यक्रम सुरू. लोकांच्या आपसात गप्पा सुरू. कोणी डुलक्या घेत. कोणी चक्क हातपाय पसरून झोपून जात. अकरा वाजता कार्यक्रम संपले की, आपापल्या नगरात स्वतःच्या तंबूत येऊन झोप, असा दिनक्रम होता.

संमेलनाच्या व्यासपीठावर अनेक कार्यक्रम आयोजित केले होते. दि. २४ जानेवारीला सगळे संस्कृत कार्यक्रम झाले. एकापाठोपाठ अनेक संस्कृत भाषणे ही कल्पनाच रोमांचकारी होती. निरनिराळ्या विद्यापीठांतून विद्वान जमले होते. डॉ. करणसिंग आणि श्री. देवरस यांचीच भाषणे तेवढी हिंदीत झाली. विश्व हिंदू संमेलनाचे उद्घाटन दलाई-लामांच्या हस्ते झाले. जगद्गुरु शंकराचार्यांचा सन्मान झाला. स्त्रियांचे प्रश्न मांडणारे एक मातृसंमेलन झाले. हिंदू साधूंचे कार्य, समस्या सांगणारे साधूसंमेलन झाले. एक सत्र खास विदेशी लोकांसाठी ठेवण्यात आले होते. त्यात गोऱ्या कातडीचा बडेजाव नव्हता. मॉरिशस, जपान, बांगला देश, सिलोन, ब्रह्मदेश येथील मंडळी, काही विश्व हिंदूपरिषदेचे या देशात काम करणारे कार्यकर्ते, काही त्या त्या देशांचे स्थानिक लोक. आपापल्या देशातील हिंदूंच्या अडचणी त्यांनी मांडल्या.

या संमेलनाने काय साधले ? हजारो हिंदू एकत्र आले. हिंदू एकत्र येत नाहीत असे नाही. खूपदा येतात. हजारोंच्या संख्येने येतात. अनेक जत्रा, यात्रांसाठी हिंदू एकत्र येतात; पण ते संघटित नसतात. देवाच्या दर्शनासाठी एकाच लांबलचक रांगेत उभे असलेले हिंदू अलग-अलग असतात. एकमेकांपासून दूर असतात. या संमेलनात ते वेगवेगळ्या ठिकाणी हिंडत होते. कोणी काशीविश्वेश्वराला जात होते. कोणी देवरसांचे भाषण ऐकण्यात धन्यता मानीत होते. कोणी स्वस्तात स्वेटर खरेदी करण्यात मग्न होते. कोणाला त्रिवेणी संगमातल्या पर्वणीस्नानाची चिंता होती. तरी सगळे एकमेकांपासून जवळ होते. विश्व हिंदू परिषदेच्या एकाच सूत्राने एकमेकांना जोडले गेले होते. जैन, शीख, बौद्ध हे सगळे खरे म्हणजे हिंदूच; पण काही गैरसमजुतीमुळे हिंदूंपासून दूर जात आहेत. त्यांना या संमेलनाने जवळ आणले. आपलेपणाने बांधून टाकायचा प्रयत्न केला. मॉरिशस, बांगला देश, जपान, ब्रह्मदेश, इंडोनेशिया येथे रहाणाऱ्या हिंदूकडे भारतीय हिंदूंचे लक्ष वेधले. मानवतेचा मंत्र तोंडाने जपत दुसऱ्याच्या धर्मावर आक्रमण करणाऱ्या मिशनऱ्यांचा हिंदूंनी उघडपणे निषेध केला.

निधर्मीपणाचे ढोल सतत कानात वाजत असल्यामुळे स्वतःचा धर्म गुपचुपपणे पाळणाऱ्या हजारो हिंदूंनी 'आम्ही हिंदू' असे उत्साहाने, धीटपणे, धुंदपणे म्हटले. त्याची खूण म्हणून एकमुखाने 'ॐ' चा उद्घोष केला.

विश्व हिंदू परिषद संमेलनाने एवढे निश्चित साधले!

### थोडे इकडे तिकडे

आपापल्या माणसांसाठी गंगाजल सगळयांना घरी न्यायचे होते. गरज ओळखून गंगाकाठच्या दुकानदारांनी रिकाम्या बाटल्या विकायला ठेवल्या होत्या. लहान–सहान बाटल्या नाही. भरपूर गंगा नेता यावी म्हणून रम, व्हिस्कीच्या मोठमोठ्या बाटल्या. त्यांच्यावरची लेबले काढायलासुद्धा बहुतेक वेळ नव्हता किंवा आवश्यकता नव्हती. मद्याच्या बाटल्यांतून गंगाजल भरभरून लोक आपल्या घरच्या माणसांसाठी घेऊन जात होते. काळाशी जमवून घेत स्वतःचे संस्कार चिवटपणे जपून ठेवणाऱ्या हिंदूंच्या प्रवृत्तीचेच हे दर्शन वाटले.

त्रिवेणी संगमावर होडीतून जाता जाता, पाण्यात डुबक्या मारता मारता, हसत–खेळत बोलणी चालली होती. 'काय रे त्रिवेणी संगमावर येऊन काही तरी प्रिय सोडायचे असते ना?' 'मग मी संघ सोडतो. कशी काय आयडिया? बायकोला कळलं तर सत्यनारायण करील!' 'तू संघ सोडतोस? मी लाजच सोडतो!' वगैरे वगैरे.

संगमाच्या ठिकाणी स्नानाला खूप गर्दी होती. कोठे आडोसा ही चीज नव्हती. बायकापुरुष सगळे होडीवरच वस्त्रांतर करीत होते. तेथे अशिक्षित होते. सुशिक्षित होते. ग्रामीण होते. नागर होते; पण कोठे मवाली शिटी नाही. बायकांकडे पाहून फिदीफिदी हसणे नाही. गंगेच्या सहवासात जसे काही सगळेजण काही क्षणांपुरते योगी! सगळे संगमस्नानासाठी उत्सुक. गंगादर्शनाने मनःपूर्वक सुखावलेले. म्हणूनच नेहमीच्या प्रवृत्तीपासून काही क्षण सुटका!

अलाहाबाद शहरातून फिरताना किती तरी ठिकाणी मुसलमानवस्त्या दिसत होत्या. हिंदुस्थानात सर्वत्रच मुसलमान सुखात रहातात तसेच हिंदूंच्या तीर्थक्षेत्रीही ते सुखेनैव रहातात! मक्का, मदिनेत किती हिंदू रहातात ते जाणून घेण्याची इच्छा झाली. ☐

---

परराष्ट्रीय घडामोडी । चन्द्रशेखर पुरन्दरे

# संपग्रस्त ब्रिटन

## सशक्त संघटना, अशक्त सरकार

सुरवात झाली लॉरी-ड्रायव्हर्सच्या संपाने; पण तेव्हा कोणालाच (अगदी लॉरी-ड्रायव्हर्सनासुद्धा) कल्पना नव्हती एवढे विक्राळ स्वरूप हां हां म्हणता संपाने धारण केले. आर्थिक व्यवस्था पूर्ण कोलमडून पडेल एवढ्या ताकदीचा धक्का सरकारला बसल्यावरच कोणत्याही इतर देशातल्या सरकारप्रमाणे कॅलॅघनचे सरकार हलकेच जागे झाले. तोपर्यंत अर्थातच बराच उशीर झालेला होता. मग बोलण्याचे दळण सुरू झाले ते लेख लिहीपर्यंत चालूच होते.

लॉरी-ड्रायव्हर्सच्या मागण्यांपैकी प्रमुख मागण्या दोन. सध्याच्या पगारात साडेबावीस टक्क्यांची वाढ करून द्यावी आणि चाळीस तासांचा आठवडा करावा, या त्या मागण्या. ट्रान्स्पोर्ट अ‍ॅण्ड जनरल वर्कर्स युनियन ही प्रमुख संघटना. सरकारने पंधरा टक्के वाढ द्यायचे कबूल केले ते अमान्य करून लॉरी-ड्रायव्हर्स संपावर गेले.

### देशव्यापी संप

रोजच्या जीवनातील अनेक गोष्टींचा खोळंबा यामुळे झाला. सरकार बधत नाही म्हटल्यावर कामगार संघटनांनी आपल्या ताकदीचे पूर्ण प्रदर्शन करायचे ठरवले आणि बावीस जानेवारीला देशव्यापी संप झाला. रस्ते झाडणाऱ्यांपासून रेल्वेपर्यंत सगळे संपावर गेले. एकूण पंधरा लाख लोक संपावर असावेत असा अंदाज होता. हा चोवीस तासांचा संप चांगल्यापैकी यशस्वी झाल्याने सरकार हादरले. कारण यामध्ये नगरपालिकेचे कर्मचारी, वैद्यकीय सेवेतील कर्मचारी, विद्यापीठातले कर्मचारी, शाळांमधले कर्मचारी अशा अनेक क्षेत्रांतील लोक सामील

होते. लंडनच्या हाइड पार्कवर एक प्रचं
मोर्चा गेला. जवळजवळ तेराशे शाळा ब
पडल्या. स्मशानातली थडगी खणणारे अ
थडगी बांधणारेसुद्धा संपावर गेले.

सगळ्यात हाल रुग्णांचे झाले. ॲम्ब्युलन्
कर्मचारी संपावर असल्याने बाहेरच्यांना आ
येता येईना आणि दवाखान्यात असणा
अत्यवस्थांना बाहेर जाता येईना. बऱ्या
जणांना आधी डिस्चार्ज दिलेला होत
त्यातले कॅन्सर आणि हृदयविकाराचे रु
सरळ मरणाच्याच दाढेत लोटले गेले. मा
सिक रुग्णांची निराळीच कहाणी हो
त्यांच्या नर्सेस, डॉक्टर्स संपावर गेल्या
स्वयंसेवकांच्या मदतीने त्यांच्या दैनंदि
व्यवहारांकडे लक्ष देण्याचा केविलवाण
प्रयत्न करण्यात आला.

२२ जानेवारीचा एक दिवसाचा संप ह
आगामी संकटांची चुणूक आहे असे कामगा
संघटनेचा एक अधिकृत प्रवक्ता म्हणाल
या ट्रेलरनेच इंग्लंडमधल्या प्रमुख शहरां
जीवन पूर्ण विस्कळित झाले. लंडन, ग्लासग
बर्मिंगहॅम, मँचेस्टर ही शहरे प्रमुख उद्यो
केंद्रे. ती बंदच पडली. यॉर्कशायर, सफो
इसेक्स, केंट आणि ऑक्सफर्डशायर या प
गण्यांना संपाचा मोठा फटका बसल
यापुढच्या देशव्यापी संपात खाण–कामगा
इंजिनियर्स हेही सामील होणार आहेत. ख
हिसका पाणीपुरवठा विभागाचे कामगा
संपावर गेले तर बसणार आहे. जनरल अॅ
म्युनिसिपल वर्कर्स युनियन ही त्यांची संघटन
सरकारने देऊ केलेली १३·९% पगारवा
त्यांनी नाकारली आहे. त्यामुळे ते संपाव
जाण्याची शक्यता आहेच. मग मात्र आर
ग्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर उभा ठाके

## आर्थिक आघाडीवरचा अंधार

पाचा उद्रेक हा आजारी अर्थव्यवस्थेचा परिणाम आहे. चलनफुगवटा प्रचंड ला आहे. सध्याच्या मजूर पक्षाच्या ारने हुजूर पक्षाचीच धोरणे अवलंबली.

देवाणघेवाण आणि पतपुरठ्यावर ाणे ही हॅरॉल्ड विल्सनची धोरणे आणि सीलिंगची मजूर पक्षाची स्वतःची ना ही कॅलॅघनची आर्थिक जमेची बाजू; त्यामुळे मूळ प्रश्न सुटला नाहीच. त्यात तीस वर्षांच्या सरासरी बेकारीपेक्षा र्षीची बेकारीही वाढली. हॅरॉल्ड सनच्या तेरा वर्षांच्या कारभारातल्या च्या पाच–सहा वर्षांपासून कुजत असलेले आणि १९७०–७४ दरम्यान एडवर्ड ज्या प्रश्नांना उत्तरे देऊ शकला नाही श्न कॅलॅघनच्या काळात एकदम पृष्ठ- ावर आले आहेत. प्रत्येक सरकारला कसोटीचा काळ येतो तसा कॅलॅघनला ा आलेला आहे. यावर उपाय काय वेत यावर मंत्रिमंडळात प्रचंड मतभेद हेत. किमती गोठवणे व कर वाढवणे प्रत्यक्ष किंवा प्रत्यक्ष) हे प्रमुख उपाय आलेले आहेत; पण अप्रत्यक्ष कर वाढ- एवढा एकच पर्याय सरकारला त्यातल्या त राजकीयदृष्टया सोयीचा ठरेल. प्रत्यक्ष वाढवण्याचे परिणाम गंभीर होतील असा ळ इशारा मंत्रिमंडळातूनच देण्यात येत हे.

## प्रश्नाचे राजकीय स्वरूप

संपांचा प्रश्न आर्थिक आहेच, पण हूनही अधिक राजकीय आहे. काम- रांच्या प्रश्नांची जाणीव आपल्याला हुजूर ीयांपेक्षा जास्त आहे असा टेंभा मिरव- ्या मजूर पक्षाच्याच कारकीर्दीत हा प्रश्न मवल्यामुळे तो अकलेचा बुडबुडा जास्त ला आहे. मजूर पक्षाची आजवर चालत लेली कामगारांची परंपरागत मते विरुद्ध तील म्हणून सरकार त्यांच्या विरुद्ध ंय घेऊ धजत नाही हे खरे दुखणे आहे. प्रश्नावर विरोधी पक्षीय मार्गारेट थॅचरही गाच सहानुभूती कशाला गमवा ' असा चार करून गप्प आहे. B B C ने या षयावर मतप्रदर्शन करण्यासाठी बोलावले सताना या धूर्त बाईने ते पद्धतशीर टाळले आणि मजूर पक्षाला आणखीच अडचणीत आणले. या रेडिओवरून प्रसारित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये सरकार पक्षातर्फे संपा- विषयी जी मते प्रसिद्ध करण्यात आली, ती सरकारच्याच सेक्रेटरी फॉर एम्प्लॉयमेंटने ( आल्बर्ट बूथ ) एका पत्रकार परिषदेत सपशेल फेटाळली नंतर कॅलॅघनला घाईघाईने खुलाशांवर खुलासे करून सारवासारव करावी लागली दरम्यान ट्रान्सपोर्ट सेक्रेटरी रॉजर्स सरकारचे संपाविषयीचे धोरण नामंजूर असल्याचे सांगून राजीनामा द्यायलाच निघाला होता. त्याला परत दादापुता करून जागेवर ठेवण्यात आले एकूण लेबर पार्टीतच या प्रश्नावर काय टोकाचे मतभेद आहेत हे जनतेसमोर आले. सरकारचे धोरणदारिद्र्य चौकातच लोंबायला लागल्यावर कामगार संघटनांना आणखी दम भरायला प्रोत्साहनच मिळाले.

या प्रश्नावर सध्या लगेच निवडणुका घेणे कॅलॅघनला अजिबातच सोयीचे नाही. सत्ता हा प्रमुख घटक सगळ्या देशांच्या सरकारी धोरणामध्ये अंतर्भूत असतोच. तोच इथेही आहे. पार्लमेंटमध्येही अल्स्टर युनिय- निस्टस् आणि स्कॉटिश नॅशनॅलिस्टस् या छोटया पक्षांचा पाठिंबा असल्याने अविश्वा- साचा ठराव काही मंजूर होणार नाही. त्यामुळे कॅलॅघनची खुर्ची शाबूत आहे.

एकूण परिस्थितीचे गांभीर्य पाहून देशभर आणीबाणी पुकारावी असा एक विचार पुढे आला होता; पण लोकशाही (!) मार्गानीच प्रश्न सोडवण्यावर सरकारचा विश्वास अस- ल्याचा निर्वाळा देण्यात आला. आणीबाणी अधिकृतरीत्या पुकारलेली नाही एवढेच. बाकी लोकांना आणीबाणीच चालू आहे.

## सेकंडरी पिकेटिंग

अर्थात या रस्सीखेचीमध्ये सामान्य माणूसच भरडला जातो आहे. सायकलवरून, खाजगी वाहनांवरून जेवढे कामावर हजर होऊ शकले तेवढेच कामावर हजर झाले. त्यातही ' सेकंडरी पिकेटिंग ' या नावाची नवी निदर्शने संपावर गेलेल्यांनी सुरू केली आहेत. आतापर्यंत पिकेटिंग म्हणजे कामावर जाऊ इच्छिणाऱ्यांना सामोपचाराने कामावर जाण्यापासून परावृत्त करणे समजले जाई. तेही त्या उद्योगापुरतेच मर्यादित असे. सेकंडरी पिकेटिंग म्हणजे आपल्या उद्योगाशी ज्याचा दूरान्वयानेही संबंध नाही, त्या उद्योगातील कामगारांनाही धमक्या देऊन, मारहाण करून कामावर जाऊ न देणे. या संघटित हल्ल्यांमुळे सामान्य माणसाचा टिकाव लागणे अशक्य आहे.

## सामान्य माणूस

इकडून अत्यावश्यक सेवा बंद, जीवना- वश्यक वस्तू बंद, वाहतूक बंद, तिकडून सर- कारची सत्ता टिकवण्याची धडपड म्हणून कामगारांना दुखवायची इच्छा नाही एकूण दोन बडयांच्यात सामान्य माणसाची ससे- होलपट असा प्रकार चालू आहे.

दत्ता सामंतप्रणीत कामगार संघटनांच्या अतिरेकी कृत्यांची अशा वेळी आठवण न झाल्यासच नवल. संघटित शक्ती कोणत्या उद्दिष्टासाठी वापरायची हे वापरणाऱ्याच्या मर्जीवर अवलंबून असल्याचे दुष्परिणाम कोणाला कसे भोगावे लागतात हे इथेही पहायला मिळतेच.

एकूण पाहता लोकशाहीमध्ये खरे नियंत्रण कोणाचे हाच प्रश्न पडावा. उद्योगधंद्यातील मॅनेजमेंट आणि ट्रेड युनियन्स यांच्यातील समतोल बिघडल्याने ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यात ब्रिटनमध्ये Contract Law च्या खाली ट्रेड युनियन्सचा समावेश होत नाही यामुळे सरळ कायद्याखाली ट्रेड युनियन्स येत नाहीत. त्यामुळे सरकार आणखीच अगतिक झाले आहे.

हे राष्ट्रीय अरिष्ट लवकर टळो अशी सामान्य माणसाची केविलवाणी प्रार्थना बलिष्ठ कामगार संघटनांच्या कानी पडेल तेव्हाच हे टळणार असा नूर दिसतो. कामगार संघटना आणि सरकार दोघेही आपल्या (अनुक्रमे) बलिष्ठपणाचे आणि दुबळेपणाचे मगरूर आणि केविलवाणे (परत अनुक्रमे) प्रदर्शन करत आहेत आणि ज्यांच्या जिवावर ही चैन आहे ते बांधल्या हातांच्या मुठी वळत आहेत.

☐

# गॉर्की कॉलनी

लेखक : ए. एस्. मकरेन्को

अनुवाद : मीनाक्षी कोल्हटकर

## लेखकाचा परिचय

आन्तोन सेमियानोविच मकरेन्को यांचा जन्म १३ मार्च १८८८ रोजी बेलोपाल्ये या छोटयाशा शहरात झाला. हे शहर युक्रेनमधील खार्कोव्ह जिल्ह्यात आहे. त्यांचे वडील सेमियान ग्रिगोर्येविच मकरेन्को हे रेल्वे वर्कशॉपमध्ये पेंटर म्हणून काम करीत. त्यांची आई तात्याना मिखायलोवना ही सद्वर्तनाचा आदर्श मानणारी एक साध्वी व प्रेमळ अशी माता व गृहिणी होती.

मकरेन्कोंचे कुटुंब हे गाढ व अकृत्रिम प्रेमाने बांधलेले कुटुंब होते व या कुटुंबातल्या प्रत्येक माणसाला त्याची जबाबदारी माहीत होती. यामुळे प्रामाणिकपणा, कर्तव्यपरायणता व सभ्यता या गुणांची आन्तोन मकरेन्कोंमध्ये लहानपणापासून आवड निर्माण केली गेली होती.

आन्तोन वयाच्या ५ व्या वर्षी वाचायला शिकले. वयाच्या १२ व्या वर्षी त्यांच्या शहराच्या माध्यमिक शाळेत त्यांना पाठविण्यात आले. मकरेन्को हे कुटुंब आर्थिकदृष्टया गरीब या सदरातच मोडत होते. त्यांचे वडील त्यांना ज्या शाळेत घेऊन गेले होते त्या शाळेमध्ये लहान व छोटे दुकानदार व इतर लहान उद्योगधंद्यांत काम करणाऱ्या लोकांची मुले जास्त करून येत.

त्यांच्या वडिलांनी त्यांना या शाळेत घालताना बजावले होते — 'आपल्यासारख्यांसाठी या शाळा नाहीत पण त्यांना दाखवून दे. सतत १०० टक्के मार्क मिळवायचे, समजलं ! '

खरोखर या मुलानं वडिलांची आज्ञा तंतोतंत पाळली. त्यांच्या सबंध शालेय जीवनात व नंतरही शिक्षणक्षेत्रात आन्तोन मकरेन्को नेहमीच आघाडीवर राहिले.

सहा वर्षांचा माध्यमिक शाळेचा शिक्षणक्रम पूर्ण करून मकरेन्कोंनी नॉर्मल स्कूलमध्ये प्रवेश केला. त्यांनी शिक्षणाचा डिप्लोमा घेतला व रेल्वेकामगारांच्या मुलांसाठी असलेल्या शाळेत शिक्षकाची नोकरी पत्करली. ही शाळा क्र्यूकोव्हो नावाच्या रेल्वे कॉलनीत होती. १९५० साली याच ठिकाणी मकरेन्को मेमोरियल म्युझियम उघडण्यात आलं. आन्तोन मकरेन्कोंचे शिक्षणक्षेत्रातले सुरुवातीचे दिवस पहिल्या रशियन क्रांतीच्या काळात गेले.

'१९०५ ते १९०७ या पहिल्या क्रांतीच्या तीन वर्षांच्या छोटयाशा कालावधीत कामगार वर्ग व शेतकरी वर्ग यांना फार मोठे शासकीय शिक्षण मिळाले. असे शिक्षण ३० वर्षांच्या शांततेच्या काळातसुद्धा त्यांना मिळाले नसते. ज्या गोष्टी त्यांना एरवी शांततामय विकासाच्या अनेक वर्षांत कळल्या नसत्या, त्या क्रांतीच्या छोटयाशा कालखंडात अगदी स्पष्टपणे समजून आल्या.'

( पान १५०, सोविएत युनियनच्या कम्युनिस्ट ( बोल्शेविक ) पक्षाचा इतिहास ).

याच काळामध्ये मकरेन्कोंचा जगाकडे पहाण्याचा दृष्टिकोन निश्चित झाला. पुढील आयुष्यात या काळाची आठवण करताना

मकरेन्को नेहमी म्हणत, 'बोल्शेविक शिक्षण आणि क्रांतिकारक घटना यांच्यामधूनच आम्ही खरा इतिहास शिकलो. मी ज्या रेल्वे-कॉलनीच्या शाळेत शिकत होतो. तिथलं वातावरण इतर ठिकाणा-पेक्षा अतिशय चांगलं होतं, तेथील कामगार वर्गीय समाज खऱ्याखुऱ्या वर्गीय जाणिवेने प्रेरित झालेला असल्याने त्यांनी ती शाळा आपल्या हातात ठेवली होती.'

मकरेन्को स्वतः या कामगार वर्गाच्या समाजातूनच आलेले होते. त्यांनी याच वर्गात कामही केलं. त्यामुळे तात्त्विक व राजकीय क्षेत्रात एक मार्क्सवादी म्हणून त्यांचा विकास होण्यास फार मदत झाली.

यानंतरच्या काळात मॅक्झिम गॉर्की यांचा मकरेन्कोंचा दृष्टिकोन घडविण्यात फार मोठा हिस्सा होता. ते म्हणत असत, 'गॉर्कीनी आम्हाला शिकवण दिली की, इतिहासाच्या स्पंदनाशी समरस व्हा आणि वादळाचा अत्यंत सौम्य स्वरूपात स्फोट होऊ द्या!' या त्यांच्या घोषणेमुळे आमच्या मनात भवितव्याविषयी प्रचंड विश्वास-युक्त आशावाद व हर्षोत्साह निर्माण झाला.'

१९१४ साली मकरेन्को कोलायव्हा पेडॅगॉजिकल इन्स्टिटयूट या संस्थेत माध्यमिक शिक्षकाचा शिक्षणक्रम पुरा करण्यासाठी दाखल झाले. या संस्थेत ते एक उत्तम विद्यार्थी म्हणून चमकले. या ठिकाणी त्यांनी खूप व सतत वाचन केलं आणि शिक्षणशास्त्रातल्या अनेक विषयांवर अनेक माहितीपूर्ण व उद्बोधक व्याख्याने दिली. ते आपल्या शिक्षकांचा अत्यंत कृतज्ञतापूर्वक उल्लेख करीत. 'यापैकीच अनेकजण पुढे बोल्शेविक झाले व अनेकांनी क्रांतीनंतरच्या यादवी युद्धात आपल्या प्राणांचे बलिदान केले. ती खरीखुरी माणसं होती व त्यांनी आमच्या मनात अत्यंत उदात्त अशी मानवी आकांक्षांची ज्योत पेटवली. शिकणाऱ्या मुलांची वागणूक आदर्श व्हावी म्हणून त्यांना काटेकोरपणे शिस्त लावीत असताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचीही अत्यंत आदरपूर्वक कदर केली पाहिजे, हे शिक्षणशास्त्रातील एक महत्त्वाचे सूत्र मी शिक्षकांकडूनच शिकलो,' असं मकरेन्को म्हणत असत.

आन्तोन मकरेन्को पोल्टावा शिक्षणसंस्थेतून पदवीपरीक्षा उत्तीर्ण झाले व त्यामध्ये त्यांनी सुवर्णपदक मिळविले.

१९१७ च्या सप्टेंबर महिन्यात त्यांची माध्यमिक शाळेचे मुख्या-ध्यापक म्हणून नेमणूक झाली. त्या जागेवर असतानाच रशियात महान ऑक्टोबर क्रांती झाली! त्या संदर्भात मकरेन्को म्हणतात, 'ऑक्टोबर क्रांतीमुळे माझ्यापुढे एक नवे व्यापक क्षितिज निर्माण झाले आणि आम्ही शिक्षणक्षेत्रातली मंडळी या नव्या क्षितिजामुळे अगदी भारावून गेलो!'

यानंतरच्या काळातच मकरेन्कोंनी शिक्षणाच्या नवीन प्रकारचे व पद्धतीचे आणि शिक्षणशास्त्रामधील नव्या सिद्धान्ताचे संशोधन सुरू केले.

१९२० च्या ग्रीष्मऋतूमध्ये त्या जिल्ह्याच्या समाज शिक्षणखात्याने निराधार मुलांची एक संस्था आन्तोन मकरेन्कोकडे चालवायला दिली. हीच पुढे गॉर्की कामगार कॉलनी म्हणून नावारूपास आली. पोल्टावा शहरापासून ६ किलोमीटर अंतरावर असलेली ४० एकर जमीन व काही मोडक्या इमारती मकरेन्कोंच्या ताब्यात देण्यात आल्या. ऑक्टोबर क्रांती होण्यापूर्वी याच जागेवर उन्मार्गी मुलांची एक शाळा होती. मकरेन्कोंनी ताबा घेण्यापूर्वी या इमारतीची अत्यंत नासधूस झालेली होती. आजूबाजूच्या खेड्यांतल्या श्रीमंत शेतकऱ्यांनी तेथील बरंचसं सामान उदा० दारं, खिडक्या, तुळया वगैरे पळविले होते. तिथली फळझाडेही उपटून नेली होती.

दोन महिने अविश्रांत श्रम केल्यावर त्यांनी तेथील डॉरमिटरी कशीबशी रहाण्यायोग्य केली आणि जुन्या कॉलनीमधील काही सामानसुमान परत मिळविलं.

डिसेंबर महिन्यात कॉलनीत राहाणाऱ्या मुलांची पहिली तुकडी आली. या मुलांमध्ये एकदम काही परिवर्तन होईल अशी अपेक्षा न ठेवता मकरेन्कोंनी त्यांना हळूहळू पण निश्चित दिशेने सुधारण्या-साठी प्रयत्न करण्यास सुरुवात केली. प्रथम त्यांनी बेकायदेशीरपणे जंगलतोड करणाऱ्या लोकांना आळा घालण्यासाठी काही कामसू व चलाख मुलांचा एक गट गस्त घालण्यासाठी तयार केला.

'या सरकारी जंगलाचे रक्षण करण्याच्या कामामुळे आमच्यामध्ये आत्मविश्वासाची जाणीव निर्माण झाली. आम्हाला एक अतिशय मजेदार काम मिळालं आणि आमचा इतर दृष्टीनेही बराच फायदा झाला.'

सुरुवातीच्या काही वर्षांत दुरभिमानाने पछाडलेल्या विद्यार्थ्यांची वागणूक रानटी होती आणि आन्तोन मकरेन्को यांना याचा खूप त्रासही झाला; पण नंतर त्यांनी असं लिहिलं आहे की, 'हळूहळू पहिल्या हिवाळ्यात रुजलेले सामुदायिक वृत्तीचे बीज आमच्यामध्ये पेरलं गेलं आणि त्याचा हळूहळू विकास होऊ लागला.'

शिक्षणशास्त्रात चमत्कार घडवून आणता येतात यावर मकरेन्कोंचा विश्वास नव्हता. याउलट मुलांच्या मनात कर्तव्य, आदर, शिस्त व कामसूपणा या सत्प्रवृत्तीचे जे स्फुलिंग मधूनमधून उमटतात ते प्रज्वलित करण्यासाठी शिक्षकाला केवढे प्रचंड परिश्रम करावे लागतात याची मकरेन्कोंना अनेक वर्षांच्या अनुभवाने इतर कोणा-पेक्षाही अधिक तीव्र जाणीव होती. या मुलांचे पूर्वीचे सर्व आयुष्य आळशीपणात गेलेले होते. अशा मुलांमध्ये कर्तव्याची जाणीव निर्माण करणं अवघड तर होतंच; पण यापेक्षा पुढे जाऊन त्यांच्यामध्ये सच्छीलपणाचा स्वभावपरिपोष करणं व त्याची योग्य दिशेनं वाढ करणं अत्यंत कठीण होतं.

शिक्षणक्षेत्रात सामुदायिक वृत्तीला मकरेन्कोंनी प्रमुख महत्त्व दिले. शिक्षण हे समुदायामध्ये, समुदायाच्या द्वारे व समुदायासाठी असले पाहिजे, हे त्यांचे ध्येय होते.

गॉर्की कॉलनीला भेट दिल्यानंतर 'अॅक्रॉस द सोविएत युनियन' या आपल्या लेखात मॅक्झिम गॉर्की यांनी खालील भाष्य केलं आहे–

'आयुष्यात ज्यांनी सतत अपमान व क्रौर्य यांचे अनेक घाव सोसले आहेत अशा शेकडो लहान मुलांना नवीन शिक्षण देऊन त्यांच्यामध्ये एवढा अपूर्व बदल घडवून आणण्याचे प्रचंड कार्य कोणी केले असेल तर ते करणारा ए. एस. मकरेन्को हाच एकमेव शिक्षक आहे असे म्हटले पाहिजे. ते एक अतिशय बुद्धिमान शिक्षणतज्ज्ञ आहेत. मकरेन्कोंना पाठविलेल्या एका पत्रात गॉर्की म्हणतात, 'तुम्ही चालविलेलं काम फार उत्कृष्ट प्रकारचं आहे व त्याचं फळही अत्यंत बहारदार मिळेल. तुम्ही एक अचाट गृहस्थ आहात व आजच्या रशियाला अशाच माणसाची जरुरी आहे!'

१९२७ मध्ये खार्कोव्हच्या परिसरात झेरेन्स्की नावाची एक कामगार सामुदायिक कॉलनी उभारली. ही मुख्यत: अनाथ व तरुण मुलांसाठी उभारण्यात आली होती. १९२८ पासून ते १९३५ पर्यंत ६०० मुलं असलेलं हे सामुदायिक व्यवस्थित बसविण्यासाठी मकरेन्को यांनी अविश्रांत श्रम केले.

मकरेन्कोंची शिक्षणशास्त्राची पद्धत ते १९२० ते २८ या काळात गॉर्की कॉलनीत काम करीत असतानाच साकार झाली, वेळोवेळी सुधारली गेली. गॉर्की कॉलनी म्हणजे जणू काही शिक्षणशास्त्राची एक प्रयोगशाळाच होती असं म्हटलं तर फारसं वावगं होणार नाही. या ठिकाणी तयार केलेले शिक्षणतंत्र झेरेन्स्की सामुदायिकात फोफावलं व विश्वासपूर्वक अंमलात आणलं गेलं. याच ठिकाणी शिक्षण व उत्पादक काम यांची सांगड घालण्याचं तत्त्व अंमलात आणलं गेलं. मुलांची शारीरिक, मानसिक सौंदर्यदृष्टी यांची जोपासना करीत असताना त्यांना तांत्रिक शिक्षण देण्याचा सिद्धान्त या ठिकाणी पूर्णत्वाला नेण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यात आला.

या कम्यूनमध्ये काम व चारित्र्य संवर्धन या दोन गोष्टी गॉर्की कॉलनीपेक्षा वेगळ्या तऱ्हेने निगडीत केल्या होत्या. गॉर्की कॉलनीत शिक्षण व हस्तव्यवसाय (शिवणकाम, मोचीकाम, सुतारकाम) या गोष्टींवर भर दिला होता. कारण त्यातनं कॉलनीच्या गरजा भागू शकत होत्या. झेरेन्स्की सामुदायिकात अद्यावत यंत्रसामुग्रीच्या सहाय्यानं धंदेशिक्षण दिलं जात असे.

त्या सामुदायिकात विद्यार्थी उत्पादक काम करीत असतानाच त्यांना माध्यमिक शालेय शिक्षण दिले गेले. यामुळे त्यातले अनेक विद्यार्थी पुढे चांगल्या तऱ्हेने उच्च शिक्षणाच्या प्रवेशपरीक्षेत पास होऊ शकले.

अंतोन मकरेन्कोंनी अशा तऱ्हेने त्यांच्या सोळा वर्षांच्या गॉर्की कॉलनीतल्या व झेरेन्स्की कॉलनीतल्या कालावधीत ३००० निष्ठावंत देशभक्त व समाजवादी पितृभूमीचे आदर्श नागरिक तयार केले. आज ते निरनिराळ्या क्षेत्रांत इंजिनिअर, सैन्याधिकारी, डॉक्टर, शिक्षक, कलाकार म्हणून काम करीत आहेत.

मकरेन्को हे नुसतेच उत्तम शिक्षक नव्हते तर शिक्षणशास्त्रातील अव्वल दर्जाचे सिद्धान्तक होते. सोविएत शिक्षणशास्त्रात त्यांनी फार मोलाची भर टाकली आहे.

लेनिन व स्टालिन यांच्या शिक्षणविषयक कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीवरच मकरेन्कोंनी आपलं शिक्षणतंत्र आधारलेलं होतं. हे शिक्षणतंत्र उभारताना त्यांना मार्क्सवाद–लेनिनवादाच्या विरोधी असलेल्या भांडवलदारी व मध्यम वर्गीय शिक्षणशास्त्राच्या सिन्द्धाताविरुद्ध निकराचा लढा द्यावा लागला होता. त्यांनी 'मुक्त शिक्षणा'चा अराजकवादी सिद्धान्त मांडणाऱ्यांची रेवडी उडवून अशा प्रकारच्या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आळस, अडचणींना सामोरे न जाण्याची व पुढाकार न घेण्याची प्रवृत्ती कशी बोकाळते हे दाखवून दिले मुलांचे व्यक्तिमत्त्व हे आनुवंशिक कारणाने व त्यांची भोवतालची न बदलणारी परिस्थिती यामुळे बनलेले असते, म्हणून मुलांचा भूतकाळ व त्यांचे पूर्वज यांचा अभ्यास केला पाहिजे, अशा प्रकारच्या भोंगळ व अशास्त्रीय सिद्धान्त मांडणाऱ्या तथाकथित शिक्षणतंत्राला मकरेन्कोंनी कसून विरोध केला.

मकरेन्कोंना मुलाच्या भूतकाळापेक्षा त्याच्या भविष्यकाळाची जास्त काळजी होती.

आनुवंशिकतेवर आधारलेल्या नियतीवादी व पूर्वनिर्धारित शिक्षणशास्त्राच्या नियमांचा त्यांनी कडवा विरोध केला आणि योग्य शिक्षणाचा केवढा प्रचंड प्रभाव असतो हे सैद्धान्तिकदृष्टचा दाखविलं आणि प्रयोगाद्वारे ते सिद्ध केलं. मुलांच्या बौद्धिक तपासणीसाठी (लांबलचक प्रश्नावली व बौद्धिक कसोट्या इत्यादी) कृत्रिम व दोषपूर्ण शिक्षणशास्त्रीय पद्धती कशा चुकीच्या आहेत ते त्यांनी दाखवून दिले. शैक्षणिक निरीक्षणाद्वारे मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा छडा कसा लावता येतो हे त्यांना माहीत होते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस प्रयोगाधिष्ठित शिक्षणशास्त्रामध्ये वनस्पतिशास्त्र व प्राणिशास्त्रविषयक कल्पनांचा जो प्रभाव होता त्याच्याविरुद्ध त्यांनी कडाडून हल्ला केला. त्याचप्रमाणे त्यांनी हर्बर्टसारख्या जर्मन शिक्षणशास्त्रज्ञांच्या प्रतिगामी शिक्षणशास्त्रावरही टीका केली व केवळ तात्त्विक सिद्धान्तावर आधारलेल्या, प्रत्यक्ष जीवनापासून दूर असलेल्या कल्पनावादी शिक्षणशास्त्राच्या नियमांचाही खरपूस समाचार घेतला.

आन्तोन मकरेन्कोंनी या सगळ्या शिक्षणतंत्राच्या जागी खऱ्या मार्क्सवादी, लेनिनवादी तत्त्वावर शिक्षणशास्त्राची उभारणी केली. त्यांनी शिक्षणशास्त्रविषयक तर्कशास्त्रावर केलेले भाष्य हे द्वंद्वात्मक भौतिकवादाच्या तात्त्विक भूमिकेच्या आधारे शिक्षणविषयक प्रश्नांची मांडणी कशी करावी याचे एक आदर्श उदाहरण आहे.

शिक्षणशास्त्राचे तर्कशास्त्र हे शिक्षणाच्या उद्दिष्टानुसार निश्चित होत असते आणि ही उद्दिष्टे त्रिकालाबाधित नसून जसा समाज बदलतो तशी बदलत असतात. १९३० नंतरच्या सुरुवातीच्या काही वर्षांत त्यांनी असं सांगितलं की, 'कामगार वर्गाच्या सर्वाधिकारी सत्तेच्या कालखंडात वर्गरहित समाज निर्माण करण्यासाठी सोविएत राज्याला ज्या गुणांची व स्वभाववैशिष्टचांची मुलांमध्ये वाढ करणं आवश्यक आहे ते आमच्या सध्याच्या शिक्षणशास्त्राचे उद्दिष्ट आहे. आपली स्वत:ची शिक्षणपद्धती अशी वेगळी काही नाहीच. किंबहुना आपली शिक्षणपद्धती म्हणजेच सोविएत शिक्षणपद्धती आहे,' असे ते म्हणत असत. 'आपली शिक्षणपद्धती ही मार्क्स, एंजल्स, लेनिन, स्टालिन यांनी वेळोवेळी समाज, कम्युनिस्ट शिक्षणपद्धतीचे उद्दिष्ट व भूमिका, कम्युनिस्ट नीतिशास्त्राचे सार याबाबत प्रतिपादलेल्या शिकवणीवर आधारलेली आहे,' असे त्यांचे म्हणणे होते. मकरेन्कोंचे शिक्षणशास्त्रीय तंत्र हे मानवतावादावर आधारलेलं आहे. मुलांच्या (विद्यार्थ्यांच्या) व्यक्तिमत्त्वाची जास्तीत जास्त बूज राखत असताना त्यांच्याकडून जास्तीत जास्त श्रमाची मागणी करणे हे मकरेन्कोंच्या शिक्षणशास्त्राचे मूलभूत तत्त्व होते. मनुष्याच्या अफाट व सुप्त कर्तृत्वशक्तीवरील गाढ विश्वास, सामुदायिकामध्ये संघटित झालेल्या जनतेच्या निर्मितिशक्तीबद्दलची खात्री आणि दुर्दम्य आशावाद ही बोल्शेविक विचारसरणी त्यांच्या शिक्षणशास्त्रात पूर्णपणे प्रतिबिंबित झालेली आहे. ऑक्टोबर क्रांतीनंतर मानवी इतिहासात प्रथमच जेव्हा व्यक्ती व समाज यांच्यामधील संबंधाचे प्रश्न योग्य प्रकारे सोडविले गेले अशा काळातच मकरेन्कोंची शिक्षणपद्धती उदयास येणे शक्य होते.

मकरेन्कोंनी शिक्षणशास्त्रात एक नवीन दालन सुरू केले. त्यांनी शिक्षणशास्त्राच्या कार्यपद्धतीत एक नवा व अभिजात बदल घडवून

आणला. शिस्तीबाबत त्यांनी एका नव्या दृष्टिकोनाची मांडणी केली. अडचणींना तोंड देण्याची व त्यावर मात करण्याची वृत्ती, मुलांचा स्वभाव व व्यक्तिमत्त्व घडविण्याची कार्यपद्धती म्हणजे शिस्त. असा शिस्तीचा अभिनव अर्थ त्यांनी सांगितला. त्यांनी कुटुंबातच मुलांची जोपासना व वाढ कशी करावी हे समजावून सांगण्यावर खूप परिश्रम घेतले. यासंबंधीच्या अनेक उपयुक्त सूचना त्यांनी केल्या. सामुदायिक पद्धतीचा शिक्षणशास्त्रात केवढा प्रभाव होतो हे दाखवून देण्याचं सारं श्रेय मकरेन्कोंनाच दिलं पाहिजे. त्यांची दुसरी मौलिक भर म्हणजे भावी विकासक्रमाच्या अंदाजाची शिक्षणतंत्रातील पद्धत. त्यांचं म्हणणं असं की, 'माणसाला उद्याच्या सुरवातीसाठी जगण्यासारखे काही तरी असले पाहिजे. उद्या मिळणारा आनंद हीच मानवाला कार्यप्रवण करणारी मोठी शक्ती आहे. नजिकच्या भविष्यकाळात मिळणारा आनंद या उद्दिष्टाचा शिक्षणशास्त्राच्या तंत्रात अंतर्भाव करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रथम हा आनंद कसा मिळवायचा, त्यासाठी संघटना कशी करायची, तो प्रत्यक्ष दैनंदिन आयुष्यात कसा उतरवायचा आणि तो हमखास मिळेल अशी शक्यता कशी निर्माण करायची हे पाहिले पाहिजे. अगदी साध्यासुध्या समाधानाच्या गोष्टीतून हळूहळू मोठ्या व महत्त्वाच्या आनंदाची व सुखाची प्राप्ती कशी करून घ्यायची हे प्रत्यक्ष अनुभवानेच दाखवून दिले पाहिजे. माणसाला शिक्षण देणे म्हणजेच त्याला सध्याच्या विकासक्रमातून उद्याच्या आनंदाची हमी निर्माण होत आहे हे पटवून देणे होय. शिक्षकाकडून ही विकासक्रमाची कल्पना जर नीट वापरली गेली तर ती सामुदायिकाला सतत आनंदित व उत्साहित ठेवण्यास अत्यंत उपयोगी ठरेल. यामुळे मुलांसमोर एक निश्चित उद्दिष्ट निर्माण होईल, त्यांचा आपल्या कुवतीवरचा विश्वास वाढेल आणि नव्या उदात्त ध्येयाच्या पूर्तीसाठी त्यांना कार्यक्षम करणारे ते एक साधन ठरू शकेल.'

आन्तोन मकरेन्को यांनी शैक्षणिक विषयावर पुष्कळ लिखाण केले आहे. त्यामध्ये प्रस्तुत ग्रंथ 'द रोड टु लाइफ', 'फ्लॅग्ज् ऑन द टॉवर्स', '१९३०, मार्चेस ऑन' व 'बुक फॉर पेरेन्टस्' ही विशेष महत्त्वाची आहेत. त्यांनी आपल्यामागे जवळजवळ १०० ग्रंथ उपलब्ध करून ठेवलेले आहेत.

'द रोड टु लाइफ' या पुस्तकात मकरेन्कोंनी गॉर्की कॉलनीमधील जीवनाची माहिती (वास्तविक गॉर्की कॉलनीच्या उभारणीची) वर्णिलेली आहे. त्यांची शिक्षणतंत्राची पद्धत १९२५ साली सुरू झाली व १९३५ साली पूर्ण झाली. मॅक्झिम गॉर्कींना हे पुस्तक फार आवडलेले होते. त्यांनी म्हटले आहे, 'हे पुस्तक म्हणजे सोविएत वाङ्मयातलं अत्यंत उत्तम पुस्तक आहे.'

शिक्षणविषयक वाङ्मयात जगामध्ये या पुस्तकाला दुसरी तोड नाही असं म्हटलं तरी चालेल. हे पुस्तक म्हणजे धडपडणाऱ्या माणसामध्ये असणाऱ्या प्रचंड अंगभूत कार्यशक्तीला उकलून दाखविणारं, अतीव मानवतेने ओथंबलेलं पुस्तक आहे. ते सोविएत जनतेमध्ये अत्यंत लोकप्रिय झालेले आहे. यामध्ये माणसाची जगण्याची धडपड व त्याचे पराकाष्ठेचे परिश्रम, त्याची सतत पुढे जाण्याची, नवीन नवीन क्षितिजे गाठण्याची महत्त्वाकांक्षा प्रतिबिंबित झालेली आहे. श्रमिक जीवनाचा आनंद, तसेच मुलांच्या सामुदायिकाची, आध्यात्मिक वाढीची अनेक उदाहरणे, यामधून कम्युनिस्ट शिक्षणपद्धतीच्या कल्पना प्रत्यक्षात कशा अंमलात आणल्या जातात याची प्रचिती वाचकाला येते.

प्रस्तुत पुस्तकात लेखकाने जुन्या सामाजिक परंपरेचे ओझे डोक्यावर घेऊन आलेल्या मानवाचे नव्या सोविएत समाजात कसे परिवर्तन होते हे दाखवून दिले आहे. या नव्या समाजात प्रथमच प्रत्येक मानवाला इतरांबरोबर आनंदाने जीवन जगायची व सामुदायिकरीत्या श्रम करून आपल्या मातृभूमीचे पुनरुत्थान करण्याची संधी कशी मिळू शकेल हे दाखवून देण्यात आले आहे.

या पुस्तकाची भाषा अतिशय बोलकी, नर्मविनोदी, वास्तववादी, कॉलनीतील विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या मानसिक अवस्थेचे सूक्ष्म


**तीन राजहंस प्रकाशने**

**आणि ड्रॅगन जागा झाला!**
लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये

**फिडेल चे, आणि क्रांती**
लेखक : अरुण साधू । मूल्य । सात रुपये

**पूर्णिया**
लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

व यथार्थ वर्णन करणारी आहे. गॉर्कीनी त्याबद्दल म्हटलेच आहे की, 'प्रत्येक विद्यार्थ्याचं हुबेहूब वर्णन कसं करावं हे मकरेन्कोच उत्तम तऱ्हेनं जाणू शकतात. जणू काही प्रत्यक्ष त्या त्या व्यक्तीचा फोटोच आपण पाहत आहोत असा वाचकाला भास होतो.'

ज्यांच्यावर मकरेन्कोंनी जीवापाड प्रेम केले अशा आपल्या जुन्या विद्यार्थ्यांच्या आठवणी सांगताना मकरेन्को फार भावनावश झालेले दिसतात.

'माझे गॉर्कीइडस्सुद्धा मोठे झाले आणि आज सबंध सोविएत युनियनभर पसरलेले आहेत. आता कल्पनासृष्टीतदेखील त्यांना एकत्र आणणं अत्यंत कठीण होऊन बसलंय. माझा झाडारोव्ह हा इंजिनिअर आहे. तो तुर्कमेनीस्तानमधल्या एका बांधकामावर नियुक्त झालेला आहे. तसाच आमचा व्हेर्शनेव्हसुद्धा बडा डॉक्टर झाला आहे आणि पूर्वेकडील सैन्यात मेडिकल ऑफिसर आहे बुरून देखाल यारोस्लाव्हला डॉक्टर झाला आहे. यांच्यापैकी कोणालाही मी आता भेटीलाही बोलवू शकत नाही. काल छोटे असलेले माझे निसीनोव्ह आणि झोरेन हेसुद्धा अक्षरशः पंख लावून पळून गेले; परंतु हे पंख माझ्या शिक्षणतंत्राच्या सहानुभूतीचे नाजूकसाजूक पंख नाहीत हं! तर ते सोविएत वायुसेनेत खरेखुरे पोलादी पंख लावून बसले आहेत.'

'फ्लॅग्ज् ऑन दी टॉवर्स' ही एक कादंबरी 'द रोड टू लाइफ'सारखीच तीन भागात लिहिलेली आहे; परंतु तिची कथा अगदी संपूर्णतया वेगळी आहे. ही १९३८ साली क्रासनायानोव्ह या मासिकात प्रसिद्ध झाली. यामध्ये 'झीरझिन्स्की कम्यून' हे सामुदायिक कसं तयार झालं व कसं वृद्धिंगत झालं याची हकीगत वर्णिलेली आहे. यामध्ये झाकारोव्ह या पात्राद्वारे मकरेन्कोंनी आपल्या आत्मचरित्राची ओळख करून दिलेली आहे.

१९३७ साली 'बुक फॉर पेरेन्टस्' हे पुस्तक प्रसिद्ध झालं. हे पुस्तक म्हणजे कुटुंबात मुलांची वाढ होत असताना ज्या समस्या निर्माण होतात त्यांची चर्चा केलेली आहे.

१९३७ ते १९३९ या दोन वर्षांत मकरेन्कोंनी अनेक गोष्टी व लेख लिहिले. यामध्ये निरनिराळे विषय हाताळलेले आहेत. मुख्यत्वेकरून समाजसत्तावादी मातृभूमीत घडलेल्या निरनिराळ्या घटना आणि त्यांचे निरनिराळे पैलू याबद्दलच्या त्यांच्या प्रतिक्रिया यांचं वर्णन त्यात आढळून येतं. त्यांची असाधारण वाङ्मयीन क्षमता खरोखरच आश्चर्यकारक होती आणि त्यांनी आपल्या लिखाणात वाङ्मयाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत पदार्पण केलेले दिसते. त्यामुळे त्यांच्या वाचकांना एकाच वेळी ते कादंबरीकार, कथालेखक, मुलांसाठी व मुलांसंबंधी लेखन करणारे, उत्तम टीकाकार व पत्रकार आणि सर्वांत शेवटी परंतु अत्यंत महत्त्वाचं म्हणजे लहान मुलांच्या शिक्षणशास्त्राचे एक उत्तम अग्रगण्य तज्ज्ञ अशा निरनिराळ्या भूमिकांतून दर्शन देतात.

आन्तोन मकरेन्कोंनी आपल्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा पुरेपूर उपयोग केला आहे. १९३९ मध्ये 'लिटरातुरनाया गॅझेटा' या मासिकात त्यांनी आपल्या वाङ्मयीन निष्ठेबद्दल लिहिले आहे—

'माझं वाङ्मय हे नेहमी प्रामाणिक व सत्यवादी असेल. त्यात कसल्याही प्रकारची फसवेगिरी किंवा विपर्यास असणार नाही असं मी प्रतिज्ञापूर्वक सांगतो. जिथे जिथे मला नवीन विजय झालेला दिसेल त्या वेळी विजयी लोकांचा गौरव करण्यासाठी व भित्र्या आणि चुकार लोकांच्या मनात उत्साह आणण्यासाठी विजयपताका वर उठवायचं माझं कर्तव्य राहील. जेव्हा जेव्हा मला कुठे दुही दिसेल तिथे लोकांना वेळीच सावध करण्याचं काम मी करीन, म्हणजे ती फूट लवकर मिटेल. मला कुठेही एखादा शत्रू दिसला तर त्याचे नग्न स्वरूप उघडकीस आणण्याचं काम मी करीन, ज्यायोगे शत्रूचा निःपात करण्यास मदत होईल. लेखकाचं कार्य हे थंडपणाचं, आरामशीर कार्य नव्हे. समाजसत्तावादी चढाईच्या संपूर्ण आघाडीवर प्रत्यक्ष हातघाईत भाग घेण्याची जबाबदारी लेखकाला पार पाडायची असते.'

आन्तोन मकरेन्कोंच्या वाङ्मयीन कार्याचा गौरव सोविएत सरकारनं १ फेब्रुवारी १९३९ मध्ये त्यांना 'ऑर्डर ऑफ द रेड बॅनर ऑफ लेबर' देऊन केला.

दुर्दैवानं मकरेन्को यांच्या अलौकिक व अविश्रांत जीवनाचा १ एप्रिल १९३९ रोजी एकाएकी शेवट झाला. मॉस्कोपासून जवळच लेखकांसाठी खास उभारलेल्या एका निवासस्थानाहून परत मॉस्कोकडे येताना मकरेन्कोंचं गाडीतच देहावसान झालं. आपल्या वाङ्मयीन व सार्वजनिक कामकाजाच्या व्यापात त्यांनी स्वतःला इतकं गुंतवून घेतलं होतं की, त्यांनी आपल्या प्रकृतीची कधी फारशी काळजी घेतली नाही आणि अनेक वर्षांच्या प्रदीर्घ परिश्रमामुळे त्यांची प्रकृती एकदम ढासळली.

त्यांचे अनेकविश्व क्षेत्रात विखुरलेले विद्यार्थी—कोणी सैन्यात तर कोणी इंजिनियरिंग व्यवसायात, तर कोणी डॉक्टर, शिक्षक, पत्रकार हे त्यांच्या अंत्यदर्शनासाठी देशाच्या कानाकोपऱ्यांतून जमा झाले. त्यांनी या सोविएत युनियनच्या थोर नागरिकाला, एका महामानवाला अखेरची सलामी दिली. त्यांच्या अंत्ययात्रेच्या वेळी जणू काही पोरक्या झालेल्या एका मोठ्या व प्रेमळ कुटुंबियाच्या भावनेने प्रत्येकाने त्यांना खडी तालीम दिली.

१९४० पासून मकरेन्कोंनी मागे ठेवलेल्या समृद्ध शिक्षणशास्त्रविषयक वाङ्मयाच्या संशोधनाचे कार्य सुरू झाले आणि त्यांचे अनेक लेख व भाषणे यांचे प्रकाशन करण्यास सुरुवात झाली. कुटुंबातील मुलाच्या शैक्षणिक विकासाबाबत ज्यामध्ये शिक्षणाची तत्त्वे विशद केली आहेत अशी त्यांची लहान मुलांच्या शिक्षणाबद्दलची व्याख्याने—या ग्रंथाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. त्याशिवाय 'ॲकॅडमी ऑफ पेडॅगॉजिकल सायन्सेस' या संस्थेने मकरेन्कोंचे काही निवडक लेख सात खंडांत प्रसिद्ध केले आहेत. त्याशिवाय त्यांच्या लिखाणाच्या विविध अंगांबद्दलची माहिती शास्त्रीय पदवी-परीक्षेसाठी तयार केलेल्या प्रबंधामध्ये उपलब्ध आहे. सोविएत युनियनमधील अनेक शिक्षक व प्रशिक्षक यांच्या शिक्षणविषयक कल्पनांचा व तत्त्वांचा आजही मार्गदर्शनासाठी उपयोग करतात.

**—प्राध्यापक वाय्. मेडीन्स्को**

'सभासद, सोविएत युनियन ॲकॅडमी
ऑफ पेडॅगॉजिकल सायन्स.'

## प्रकरण पहिले

# स्थानिक अधिकाऱ्यांशी पहिली मुलाखत

१९२० च्या सप्टेंबर महिन्यात मला एके दिवशी पब्लिक एज्युकेशन खात्याच्या प्रमुख अधिकाऱ्याकडून तातडीचं बोलावणं आलं.

तो मला म्हणाला, 'भल्या माणसा, तुझ्या शाळेसाठी देण्यात आलेल्या जागेबद्दल तू निष्कारण आरडाओरड चालविली आहेस असं ऐकतो.'

मी म्हणालो, 'ती जागा पाहून कोणीही डोक्यात राख घालील. ती जागा व्यावसायिक शाळा चालविण्यायोग्य आहे काय? अशी अत्यंत घाणेरडी जागा पाहून एखादा रडू लागेल. तुमची शाळेची कल्पना तरी काय आहे, मला कळत नाही.'

'बरोबर आहे. तुम्हाला नवी कोरी करकरीत इमारत, नवे फर्निचर असं सारं हवं. मग तुम्ही नुसते तिथे जाऊन शिकविणार; पण हा काही इमारतीचा प्रश्न नाही. खरा प्रश्न आहे नवीन मनुष्य घडविण्याचा. तुम्ही शिक्षणतज्ज्ञ त्याचा विचार करण्याऐवजी नुसत्या तक्रारी करीत बसता. ही इमारत ठीक नाही, हे फर्निचर बरोबर नाही वगैरे. खरं म्हणजे तुमच्यामध्ये खरी जिद्द– क्रांतिकारी जिद्दच नाही. तुम्ही नुसते सफेद–पोषाखी पांढरपेशे लोक!'

'मी काही सफेद-पोषाखी नव्हे हं. लक्षात ठेवा.' मीही ठासून सांगितलं.

'ठीक आहे. नसाल; पण तुम्ही सगळे बुरसट बुद्धिजीवींचे एक टोळके आहात. इथंच पहा ना. एवढं प्रचंड काम पडलं आहे आणि ते करण्यासाठी मी एक मनुष्य धुंडाळतोय. अनाथ मुलांची संख्या वाढली आहे. एवढी वाढली आहे की, रस्त्यावर फिरणे मुष्किल झालंय. ती पोरं लोकांच्या घरात घुसताहेत. त्यांची काळजी कोणी घ्यायची? आहे कोणाला फिकीर! आणि मलाच प्रत्येकजण सांगतोय, हे तुमचेच काम आहे, ती पब्लिक एज्युकेशनची जबाबदारी! बरं. ते जाऊ द्या. मग बोला आता काय म्हणणं आहे?'

'कशाबद्दल?'

'तुम्हाला माहीत आहे काय ते. प्रत्येकजण आपली जबाबदारी झटकू पहात आहे. कोणालाही विचारलं तरी नकार ठरलेला. म्हणतात– 'माफ करा. आम्हाला आमचे गळे कापून घ्यायचे नाहीत.' तुम्हा लोकांना तुमच्या आरामशीर अभ्यासिका व आवडती पुस्तकं एवढंच हवं आहे. तुम्ही आणि तुमचे ते जाड चष्मे!'

'हं. हं. माझ्या चष्म्याची चर्चा कशाला?'

'ऐका हो. मला हेच सांगायचं आहे की, तुम्हाला फक्त तुमच्या पुस्तकात नाक खुपसून बसायचं आहे. जेव्हा धगधगीत जिवंत माणसाची गाठ पडते तेव्हा तुम्ही किंचाळता.'

'हं. हं. तुमचा जिवंत मनुष्य माझा गळा कापील. वा रे बुद्धिजीवी!'

तो शिक्षण खात्याचा प्रमुख माझ्याकडे रागीट कटाक्ष फेकीत होता. शिक्षक वर्गावर वाग्बाण सोडीत होता. पण ती त्याची चूक होती. मी समजुतीच्या सुरात म्हटलं, 'ऐका तर खरं,'

'काय ऐका, कपाळ! तुम्ही काय सांगणार आहात मला? मला माहीत आहे तुम्हाला काय सांगायचंय ते. ते तिकडे अमेरिकेत करतात तसंच हवंय ना तुम्हाला? नुकतंच मला एकानं एक पुस्तक दिलं. अमेरिकेत म्हणे सुधारशाळा आहेत. आपल्याकडे नाहीत. असंच ना?'

'माझं ऐकून तर घ्याल?' मी मध्येच टोकलं.

'बरं, बोला तुम्हाला काय म्हणायचं आहे ते.'

'क्रांतिपूर्व काळात उनाड अनाथ मुलं नव्हती का? होती. त्यांना डांबून ठेवत होतोच की नाही? त्यांच्यासाठी सुधारशाळा होत्याच ना? क्रांतीपूर्व काळात होतं त्यातलं आपल्याला काहीही नको.'

'ठीक आहे. म्हणूनच आपल्याला नवी पद्धत शोधून काढायला हवी. आपल्या नव्या समाजव्यवस्थेत आपला नवा माणूस बनवायची नवी किमया करायला हवी.'

'आता कसं बोललात? नवी पद्धत अगदी बरोबर; पण सुरवात कुठून करायची कुणालाच माहीत नाही. खरं की नाही?'

'मला तरी कुठं माहीत आहे?'

'का बरं? तुमच्या याच खात्यात किती तरी लोक आहेत ज्यांना या नवीन माणूस बनवायच्या नव्या तंत्राची माहिती असेलच; परंतु काही करायची त्यांची इच्छा नाही, असं मी म्हणालो.'

'बरोबर आहे तुमचं म्हणणं. त्यांना खरोखरच काही करायची इच्छा नाही. त्यांच्या नादी लागण्यात काही अर्थ नाही.'

'नको करू दे; पण तुमच्या सांगण्याप्रमाणे मी ती जबाबदारी घेतली तरी हे लोक सारखे लुडबुड करतील. सारख्या चुका काढत राहतील आणि असं नाही, तसं करायला पाहिजे असा आग्रह धरतील. शिक्षण खात्यातील लोक तेवढंच करतील बघा. ते लोक तसलेच आहेत आणि प्रत्येक वेळी तुम्ही माझ्यावर नाही, पण त्यांच्या सांगण्यावर विश्वास ठेवाल.'

'नाही नाही. मी त्यांना सांगेन, 'तुम्हीच ते का केलं नाही? तुम्हाला आता मध्ये लुडबुड करायचं काही कारण नाही.!'

'पण समजा, मी जबाबदारी घेतली आणि सगळा गोंधळ झाला तर काय कराल?'

त्या सार्वजनिक शिक्षण खात्याच्या प्रमुखाने आपले दोन्ही हात टेबलावर आदळले आणि तो म्हणाला, 'तुम्ही आणि तुमचे ते गोंधळ! तुम्हाला काय म्हणायचंय मला समजत नाही.'

'पुन्हा आलात तुम्ही मूळ पदावर. मला समजत नाही असं वाटतं तुम्हाला? गोंधळ होवो अगर न होवो, आपल्याला काय करायचं आहे? परिणामावरूनच आपल्याला कामाचा बरे-वाईटपणा समजेल. आपल्याला उन्मार्गी मुलांसाठी नुसती सुधार वसाहत काढायची नाही, तर तुम्हाला चांगलं माहीत आहे की, आपल्याला नवीन शिक्षणपद्धती अंमलात आणावयाची आहे. नव्या समाजव्यवस्थेसाठी नवा माणूस तयार करायचा आहे. तेच तुमचं काम. काही असलं तरी नव्या समाजरचनेचं तंत्र आपणा सर्वांनाच शिकायचं आहे आणि तुम्ही ते शिकाल याबद्दल मला पूर्ण विश्वास आहे.

तुमच्या शंका आणि अडचणी तुम्ही प्रत्यक्ष बोलून दाखवल्यात हे बरं केलंत. ठीक आहे !'

'बरं, मग तुमच्याजवळ सोयिस्कर जागा आहे का ? कारण जागेशिवाय आपण काहीच करू शकत नाही हे तुम्हाला माहीतच आहे.'

'आहे. जागा तयार आहे. आपल्यापाशी चांगली जागा आहे. क्रांतिपूर्व काळात उन्मार्गी मुलांसाठी तिथे शाळा होती. इथून दोन-अडीच मैलांवर ती जागा आहे. तिथे आजूबाजूचा परिसर जंगल, मैदान सर्व काही आहे. तुम्ही गाईसुद्धा ठेवू शकाल !'

'पण माणसं नकोत का काम करायला ?'

'मग माणसं काय माझ्या खिशात आहेत ? उद्या तुम्ही मोटारगाडी मागाल, आणखी नको का काही ?'

'आणि पैशाचं काय ?'

'त्याची काळजी करू नका. आपल्याकडे खूप पैसे आहेत!' त्यानं आपल्या टेबलाच्या खणातून नोटांचं बंडल बाहेर काढून माझ्यापुढे धरलं. 'हे पैसे घ्या. दीड लाख रुपये आहेत, असं मला वाटतं. हे सगळ्या जमवाजमवीला पुरेसे आहेत. तुम्हाला लागणाऱ्या खुर्च्या, टेबलं यांना पुरतील एवढे पैसे आहेत. त्यात गाईही घेता येतील !'

"थांबा थोडं. गाई वगैरे नंतर घेऊ. सध्या इमारतीची डागडुजी होऊ द्या. येत्या वर्षासाठी एक खर्चाचं अंदाजपत्रक तयार करा!'

'हे सारंच जरा चमत्कारिक वाटतंय; पण मला वाटतं मी आधी जाऊन जागा बघून येणं बरोबर होईल व मला पुढची कल्पना येईल.'

'अहो कशाला ? मी बघितली आहे. तुम्ही आणखी माझ्यापेक्षा वेगळं काय पहाणार ? तुम्ही सरळ तिथे चला आणि रहायला लागा!'

'बरंय, ठीक आहे. मी जातो. इथं आणखी वादविवाद घालायला नको.' इकॉनॉमिक कौन्सिलच्या त्या खोल्यांपेक्षा आम्हाला मिळणारी जागा नक्कीच वाईट नसेल अशी मी माझी समजूत करून घेतली व जायला निघालो.

खात्याचा प्रमुख मला जाता जाता म्हणाला, 'तुम्ही अगदी वल्ली आहात. खरंच काम चालू करा. एक भरीव कार्य आहे बरं.' ▫

## प्रकरण दुसरे

# गॉर्की कॉलनीची चमत्कारिक सुरुवात

पोल्टावापासून साधारण २॥ मैलांच्या अंतरावर एका वालुकामय टेकडीवर एक पाईन वृक्षांची राई-साधारण २०० यार्ड लांबीची-खार्कोव्हकडे जाणाऱ्या मोठ्या रस्त्यापर्यंत पसरलेली होती. त्या झाडीच्या एका कोपऱ्याला साधारणपणे ४० यार्ड जागा साफसूफ करून तिथे मोडक्यातोडक्या इमारतींचा एक चौकोन बनविलेला होता. हीच आमची उन्मार्गी मुलांसाठी नवी वसाहत होणार असं कळलं. मोकळ्या जागेचा पुढचा उतरता भाग एका छोट्याशा तळ्याकडे जाऊन मिळत होता आणि त्या तळ्याच्या दुसऱ्या पाळीवर शेतकऱ्यांची काही घरं होती. त्यापलीकडे लांबच लांब बर्चवृक्षांची राई आणि काही शाकारलेली छपरं दिसत होती.

क्रांतिपूर्व काळात उन्मार्गी मुलांची हीच शाळा होती. १९१७ च्या अखेरीस सारी पोरं पळून गेली. म्हणजे मागे राहिले ते फक्त शाळेचे अवशेष. जुन्या माहितीवरून एवढाच निष्कर्ष निघतो की, ही शाळा चालवायला त्या वेळी निवृत्त सेनाधिकारी घेतले जात. या अधिकाऱ्यांचं काम म्हणजे त्या मुलांना सतत नजरेत ठेवणं. रात्री झोपतेवेळीदेखील त्यांच्या झोपण्याच्या खोलीशेजारी झोपणं.

आजूबाजूच्या लोकांच्या तोंडून ऐकलेल्या हकीकतींप्रमाणे त्यांचे शिक्षणतंत्र फारसे विधायक नव्हते. सर्वांत सोपी पद्धत म्हणजे छडीचा सर्रास उपयोग, हेच शिक्षणतंत्र त्यांनी अंमलात आणले होते. इमारतीचे उरलेसुरले सामान तसेच बाकीच्या खुर्च्या, टेबले व इतर उपयुक्त वस्तू, तसेच निरनिराळ्या धंदेशिक्षणाची उपकरणेही आजूबाजूंच्या गावकऱ्यांनी फार पद्धतशीरपणे काढून नेलेली दिसत होती. इतर उपयुक्त वस्तूंबरोबर बगीचातली झाडंही उपटून नेलेली दिसत होती. हे करत असताना कुठल्याही प्रकारे नासधूस करण्याचा उद्देश नसावा असं वाटत होतं. त्यांनी खिडक्यांची तावदानं फोडलेली नाहीत तर काचा हळूच चौकटीमधून काढून नेल्या असाव्यात. झाडं तोडली नाहीत तर मुळासकट उपटून आपल्या अंगणात त्यांची स्थापना केलेली दिसली. दरवाजे त्यांच्या सांध्यांतून अलगद मोकळे करून नेलेले असावेत आणि स्वयंपाकाच्या कट्ट्याची वीटन्‌वीट काढून नेलेली होती. फक्त एक भलं मोठं कपाट जुन्या डायरेक्टरच्या खोलीत शिल्लक राहिलेलं दिसलं. लूका सेमियानोविच व्हेरखोला हा शेजारी नवीन आलेली माणसं बघायला आला होता. मी त्यालाच विचारलं, 'हे कपाट तेवढं कसं शिल्लक राहिलं ?'

त्यानं अगदी प्रामाणिकपणे सांगितलं की, 'ते कपाट इतकं लांबरुंद आहे की, ते आमच्या कोणाच्याही घरात मावलं नसतं. ते तोडूनसुद्धा त्याचा उपयोग करता आला नसता. म्हणून ते तसंच राहिलं.'

बाजूला बांधलेल्या खोपटातून खूपसा कचरा भरला होता. उपयोगात आणण्यासारखी एकही वस्तू त्यात दिसत नव्हती. नुकत्याच चोरीला गेलेल्या काही वस्तू परत मिळविण्यात मी यशस्वी झालो. त्यातून एक पितळी घंटा, काही मोडकी बाकं, पेरणीयंत्र, एक किरगिझ घोडा व ३० वर्षांचा जुन्या गाडीचा सांगाडा एवढ्या वस्तू परत मिळविल्या.

प्रथम गाठ पडली ती कालिना इव्हानोविचची. म्हणजेच आमचे पुरवठा-अधिकारी. त्यांनी सलाम ठोकला व विचारलं, 'तुम्हीच का ते कॉलनीचे प्रमुख शिक्षणतज्ज्ञ ?' माझ्या लवकरच लक्षात आलं की, कालिनासाहेब युक्रेनियन भाषेला तत्त्वतः मान्यता देत नसले तरी त्यांचे उच्चार बरेचसे युक्रेनियन धाटणीचेच होते आणि त्यांच्या बोलण्यात बरेचसे युक्रेनियन भाषेतले शब्दही वारंवार येत होते. त्यांच्या 'जी 'चा उच्चार तर अगदी दाक्षिणात्यांसारखाच होता.

त्यांनी परत मला विचारलं, 'तुम्हीच ना ते कॉलनीचे प्रमुख शिक्षणतज्ज्ञ ?'

'अहो, मी तर कॉलनीचा डायरेक्टर!' मी म्हटलं.

'नाही हो! मी पुरवठा-अधिकारी व तुम्ही शिक्षणतज्ज्ञ!'

कालिनाकडे पाहिल्यावर व्हुवेलच्या 'पानाची' आठवण येते; परंतु 'पानला' पूर्ण टक्कल होतं व थोडेसे केस त्याच्या दोन्ही कानांवर शिल्लक राहिलेले होते. पानची दाढी सफाकट केली, त्याच्या मिशा थोड्याशा बारीक केल्या व एक पाइप त्याच्या तोंडात दिला की, पानचा कालिना इव्हानोविच सडर्चूक झालाच म्हणून समजा. चेहरेपट्टीवर थोडे फेरफार केले की, कालिना पानच म्हणून समजायला हरकत नव्हती. कालिना तसा फार चाणाक्ष माणूस. खरं तर ही पुरवठा-अधिकाऱ्याची जागा त्याला फार खालची वाटली. त्याच्या पन्नास वर्षांच्या आयुष्यात त्याला फक्त दोन गोष्टींची अभिमानाने आठवण येते. एक खेकसोम पायदळातील गार्डची व दुसरी १९१८ साली जर्मन स्वारीच्या वेळी मिरगोराडे गाव खाली केलं त्या वेळी केलेल्या अधिकारपदाची.

कालिनाच माझ्या शिक्षणतंत्राची पहिली कथावस्तू झाला. त्याच्या पुष्कळशा विविध प्रकारच्या मतांनी मला बऱ्याचदा अडचणीत टाकलं. तो मोकळेपणाने मध्यम वर्गीयांना व बोल्शेविकांना, तसंच रशियन ज्यूंना शिव्या देई. जर्मन लोकांचा वक्तशीरपणा व रशियन लोकांचा गलथानपणा हेही त्याच्या टीकेतून सुटले नाहीत; पण एक गोष्ट खरी की, त्याला कमालीची जीवनासक्ती होती आणि तो सदैव हसत-खेळत राही. मला त्याला नव्या शिक्षणतंत्राची माहिती देताना वाईट वाटलं नाही. मी पहिल्याच सलामीत त्याला धडे देण्यास सुरुवात केली.

संभाषणाला मी सुरुवात करून म्हटलं की, 'कालिनासाहेब, एवढी मोठी वसाहत डायरेक्टरशिवाय कशी चालेल? साऱ्या गोष्टींची जबाबदारी घ्यायला कोणी तरी हवंच ना?'

कालिनांनी आपल्या तोंडातला पाइप काढला व आपली मान माझ्याकडे आदराने झुकवून म्हटलं, 'अगदी बरोबर! तुम्ही डायरेक्टर आणि मी तुमच्या हाताखाली मदतनीस म्हणून असावा, असंच ना? मी कधीही शिक्षकाचं काम केलेलं नाही आणि म्हणून त्या कामावर हक्क सांगायचा मला अधिकार नाही! परंतु तुम्ही अगदीच तरुण आहात आणि माझ्यासारखा एक वयस्क मनुष्य तुमच्या हुकमतीखाली काम करायला असावा हे काही मला पटत नाही. डायरेक्टर होण्याची माझी इच्छा नाही व डायरेक्टर होण्याइतकं माझं शिक्षण झालेलं नाही!' असं कालिनासाहेब घाईघाईनं म्हणाले.

परंतु एकंदर कालिनाला ही व्यवस्था मनापासून पटलेली दिसली नाही. संध्याकाळी काही तरी निमित्त काढून ते माझ्या खोलीत आले व म्हणाले, 'मी मोठ्या मुष्किलीनं टेबल व खाट इथं आणली आहेत. दुसरं सांगायचं असं की, खूप विचार करून निर्णय घेतला की– तुम्हीच व्हावं डायरेक्टर व मीच तुमच्या हाताखाली काम करावं!'

मी त्यांना धीर देत म्हटलं, 'आपण सारं काही ठीक जमवून घेऊ.'

त्यावर ते म्हणाले, 'मलाही तसंच वाटतंय. शेवटी बुटाला तळ बसवायला काही डोकं लागत नाही. तुम्ही शिकलेले आहात तेव्हा तुम्हीच डायरेक्टर रहावं हे बरं!'

आम्ही दुसऱ्या दिवशी आमच्या कामाला लागलो. ती ३० वर्षांची जुनी गाडी व घोडा आम्ही मोठ्या मुष्किलीनं उभा केला. आमच्या शेजाऱ्यांच्या उदार मदतीनं ती छकडा नावाची चीज तयार झाली. कालिनासाहेब गाडीवर स्वार झाले आणि ही सारी वरात शहराकडे निघाली. आम्ही अक्षरशः तासाला दोन फर्लांग या वेगाने जात होतो.

अशा रीतीने जुळवाजुळवीला सुरुवात झाली. नवा माणूस बनविण्यासाठी लागणाऱ्या साऱ्या वस्तूंची जमवाजमव करावी लागत होती. मी व कालिनाने यात दोन महिने घालविले. आमच्या स्वाऱ्या रोज शहराकडे जायच्या. कालिना त्या प्रेक्षणीय गाडीने व मी पायी! कारण मला या घोडागाडीत बसायची कल्पनाच विचित्र वाटत असे! कालिनाला पायी चालणं कमीपणाचं वाटे.

या दोन महिन्यांत खरं तर आम्ही आमच्या शेजारच्या गावातल्या कारागिरांच्या मदतीनं एक पडवी कशीबशी दुरुस्त केली. खिडक्यांची तावदानं बसविली व स्वयंपाकाच्या भट्टया आणि दारंही बसविण्यात यशस्वी झालो.

पण आमची सर्वांत मोठी कामगिरी म्हणजे आम्ही १५० पायली रायचं पीठ अन्नखात्याकडून मिळवलं आणि अशा तऱ्हेनं आम्ही खऱ्याखुऱ्या जीवनोपयोगी वस्तूंचा साठा करू शकलो. माझ्या कल्पनेतल्या भौतिक संस्कृतीची प्रत्यक्षात जे काही जमा केलं त्याच्याशी तुलना केली असता मला असं आढळून आलं की, यापेक्षा १०० पटींनी जरी मी जमवलं असतं, तरीसुद्धा माझा हेतू साध्य व्हायला कमीच पडलं असतं. म्हणून एक दिवस आम्ही तयारी संपविण्याचं ठरविलं व कालिनाही माझ्याशी या बाबतीत सहमत झाले.

कालिनानं आपल्या पद्धतीप्रमाणे टोकलंच, 'आपण यापेक्षा तयारी काय करणार? मिळतंय काय? या चोरांनी आधी पसारा करून ठेवायचा व आम्हाला तो आवरा म्हणून सांगायचं! आपणही त्या इलिया मुटोमेटसारखं करू या!'

'इलिया मुटोमेट? हा कोण बुवा?'

'होय. इलिया मुटोमेट. त्याला या लोकांनी मोठा हीरो बनवलाय. मला वाटतं तुम्ही त्याच्याबद्दल ऐकलं असेल. तो तर पक्का चाचेगिरी करणारा, अगदीच नालायक माणूस. कुत्र्याच्या गाडीतून बर्फावरून फिरण्याशिवाय त्यानं आयुष्यात काही केलं नाही!'

'ठीक आहे. आपण मेटोमेटस् बनू; पण सलोव्हिया कोण होणार?'

'त्याची नको काळजी. त्याची कमतरता कधीच पडणार नाही.'

यानंतर आमच्याकडे दोन शिक्षिका आल्या. एकीचं नाव एकतेरीना ग्रीगार्येव्ना व दुसरी लिडीया पेट्रोव्ना. या निर्जन जागी येऊन नव्या समाजरचनेतील नवा मनुष्य तयार करण्याच्या कामात आपला बहुमोल वेळ खर्ची घालायला कोणीही तयार होत नव्हत. त्यामुळं मी अगदी निराश झालो होतो. प्रत्येकाला आमच्या या मवाल्यांची भीती वाटत होती आणि आमचे बेत सिद्धीस जातील यावर कोणीही विश्वास ठेवत नव्हतं. एक दिवस खेड्यातल्या शिक्षकांच्या परिषदेत माझ्या कळकळीच्या भाषणाचा परिणाम होऊन वरील दोन स्त्रिया तयार झाल्या. त्यामुळं मी खूष झालो. विशेषतः त्या स्त्रिया असल्यामुळं आमचा नवा माणूस तयार करण्याच्या कामगिरीला चांगला आधार मिळेल अशी आशा उत्पन्न झाली.

लिडिया पेट्रोव्ना फारच लहान होती. तिनं आपलं माध्यमिक-शिक्षण नुकतंच संपवलं होतं. ती एखाद्या शाळकरी मुलीच्यापेक्षा फारशी मोठी दिसत नसे. ती नुकतीच आपल्या आईच्या छत्राखालून बाहेर पडली होती. शिक्षणखात्याचा माणूस तिची नेमणूक करताना म्हणाला की, 'या पोरीला घेऊन तू काय करणार? तिला काय समजतंय?'

अर्थात् मी त्याला सांगितलं, 'मला हवी तशीच ती आहे. तिला अजून शिक्षणतंत्राचं वारं लागलेलं नाही. त्यामुळं आमच्या नव्या तंत्रात ती बरोबर जमून जाईल. किंबहुना तिच्या अस्तित्वामुळं आम्हाला मदतच होईल!'

यावर तो म्हणाला, 'तुझी जरा अतिशयोक्ती होतेय असं मला वाटतं; परंतु ठीक आहे. तुझ्या मनासारखं होऊ दे!'

एकातेरीना ग्रीगार्येव्ना याउलट होती. तिनं शिक्षणक्षेत्रात काम केलेलं होतं. ती लिडियापेक्षा काही फार मोठी नव्हती; पण लिडीया प्रथमपासून एकातेरीनाच्या सहवासात राहू लागली. एखादं पोर आईला बिलगावं त्याप्रमाणे. तिचा चेहरा गंभीर परंतु आकर्षक होता. तिचा भिवया रेखीव परंतु पुरुषी थाटाच्या होत्या. ती नेहमी अतिशय व्यवस्थित व नीनंनेटक्या पोषाखात असे. कालिनानं ओळख झाल्याबरोबर मला टोकलं होतं, 'तू त्या मुलीपासून स्वतःला सांभाळ!'

अशा तऱ्हेनं तयारी तर सारी झाली.

६ डिसेंबरला आमची सहा विद्यार्थ्यांची पहिली तुकडी कॉलनीत येऊन दाखल झाली. त्यांच्याबरोबर भलेमोठे मोहोरबंद लखोटेपण आले. त्या लखोटचांतून म्हणे त्यांची सारी माहिती होती. सहांपैकी चारजण चांगले अठरा वर्षांचे होते. दुसरे दोन त्यापेक्षाही लहान. पहिले चार सशस्त्र घरफोडीच्या गुन्ह्यात व दुसरे दोघे चोरीच्या गुन्ह्यात पकडलेले होते. ही आमची नवी पाहुणेमंडळी उंची कपड्यांत व घोडेस्वारांच्या थाटात आली होती. ही काही रस्त्यावर भटकणारी मंडळी नव्हती. त्यांची केशरचना आधुनिक पद्धतीची होती. त्यांची नावे अनुक्रमे सदारोव, बुरुन, वोल्कोव, बेंड्यूक, गुड आणि तारानेट अशी होती.

या मंडळींचं आम्ही अगदी मनापासून स्वागत केलं. सारी सकाळ आम्ही रात्रीच्या मेजवानीची तयारी करण्यात घालविली. स्वयंपाक्यानं पांढऱ्याशुभ्र कपड्याने आपले केस बांधून टाकले होते. डॉरमिटरीत पलंग सोडून राहिलेल्या जागेत मेजवानीचं टेबल मांडलं होतं. टेबलक्लॉथची उणीव आम्ही पांढऱ्या शुभ्र चादरी पसरून भरून काढली होती. आमचे सारे रहिवासी जेवायला हजर झाले. कालिनासाहेबांचा थाट विशेषच होता. त्यांनी आपला नेहमीचा डागळलेला कोट ठेवून मस्तपैकी व्हेल्व्हेटचं हिरव्यागार रंगाचं खास डिनर जॅकेट घातलं होतं.

मी स्वतः छोटंसं भाषण केलं. सारांश असा की, 'आपल्याला जुनं सारं विसरून नव्या प्रामाणिक कष्टाच्या आयुष्याची सुरवात करावयाची आहे वगैरे, वगैरे...' पणआमचे पाहुणे भाषणाकडे फारच थोडं लक्ष पुरवित होते. याउलट ते आपापसात कुजबुजत. तसंच तिथे असलेल्या ओवडधोवड खाटा व त्यावरच्या जुनाट गोधडचा, खिडक्यांच्या न रंगवलेल्या चौकटी यांचं निरीक्षण करीत होते. इतकंच काय झदारोब नावाचा मुलगा माझं भाषण चालू असताना दुसऱ्या एकाला उद्देशून म्हणाला की, 'तुझ्यामुळेच आम्हाला इथे येऊन पडावं लागतं.

बाकीचा सारा दिवस आम्ही पुढं काय करायचं हे ठरविण्यात घालविला. आमच्या पाहुण्यांनी आमचं बोलणं वरवर ऐकलंसं केलं. ते तिथून बाहेर जायला उत्सुक होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी अतिशय गोंधळलेल्या मनःस्थितीत माझ्याकडे लिडिया तक्रार घेऊन आली. 'ह्यांना आवरणं आपल्याला नाही जमणार! ते ऐकत नाहीत! पाणी आणायला सांगितलं तर आणलं नाहीच. पण विचित्र केशरचना केलेल्या एकानं बुटानं फरफटायला सुरुवात केली व तो बूट माझ्या तोंडासमोर धरून त्यानं सांगितलं की, 'हे पहा, किती घट्ट बनवले आहेत!'

प्रथम प्रथम ते नुसतेच शिरजोरपणे वागत नसत तर आमच्याकडे दुर्लक्ष करीत. ते संध्याकाळी भटकायला जात व सकाळी परत येत. मी काही आवर्जून सांगायला गेलो तर हसून निघून जात. त्यानंतर साधारण एका आठवड्यानं बेंड्यूक नावाच्या मुलाला जिल्हा परिषदेच्या अत्याचार संशोधक खात्यांकडून दरोडा व खून या दोन आरोपांखाली पकडण्यात आलं. लिडिया या प्रकारानं एवढी घाबरली की, ती आपल्या खोलीत बसून खूप रडली! मध्येच एकदा तिनं विचारलं, 'खरंच त्यानं खून केला असेल का? याचा अर्थ काय समजायचा?'

एकातेरीना भिवया आकसून व गंभीर होऊन पण हसत म्हणाली, 'आन्तोन सेमियानोविच, मला काहीच समजत नाही; पण मला वाटतं आपण हे सारं इथंच संपवू या.'

आमच्या कॉलनीच्या भोवतीची दाट झाडी, ती अर्धवट रिकामी शाळेची इमारत, आमच्या कॅम्प-कॉट्स, फावडी व कुऱ्हाडी, थोडीशी हत्यारं व सर्वांत म्हणजे आमचे अर्धा डझन विद्यार्थी की जे नुसते शिक्षणालाच नव्हे तर माणुसकीलाही पारखे असलेले, या साऱ्या गोष्टी ज्यांनी खरोखरच शाळेत शिकविण्याच्या व्यवसायाचा अनुभव घेतला आहे त्याला अनुत्साहित करण्याला पुरेशा होत्या.

कडाक्याचे थंडीचे दिवस व लांबलचक रात्री, त्यात फक्त दोन दिवे. एक मधल्या डॉरमिटरीत व एक माझ्या खोलीत, एवढीच उजेडाची साधनं. बाकी शिक्षिकांना व कालिनाला तर चक्क डबरीच दिली होती. त्यातही माझ्या दिव्याची काच फुटकीच होती. तिचा वरचा भाग गेला होता व खालच्या भागाला खूपशी काजळी धरली होती. कारण कालिनासाहेब त्यांचा पाइप पेटविण्यासाठी कागदाचे कपटे त्यात वारंवार घुसवीत असत.

त्या वर्षी वादळी वारे लवकर सुरू झाले व बर्फ जमा होऊ लागला. सारं अंगण बर्फमय झालं होतं. जायला वाटही नव्हती. म्हणून एक दिवस सदारोवला मी अंगण साफ करायला सांगितलं. त्यावर तो म्हणाला, 'आताच काय घाई? पुन्हा बर्फ जमणारच. एकदम हिवाळा संपल्यावरच करू.' असं म्हणून माझ्याकडे एक कटाक्ष टाकून माझ्या अस्तित्वाची दखल न घेता तो मित्राबरोबर निघून गेला. सदारोवच्या वागण्याच्या बोलण्याचालण्याच्या थाटावरून तो खचितच शिकलेल्या घराण्यातला असावा. तो स्वच्छ व स्पष्ट बोले. त्याचा चेहरापण मोठा आकर्षक होता. त्यावरून त्याचं लहानपण सुखात गेलेलं असावं. वोल्कोव हा अगदी याच्या उलट होता. त्याची रुंद जिवणी,

चपटं नाक आणि बटबटीत डोळे व फुगीर चेहरा यावरून तो अगदी तयार गडी दिसत होता. वोल्कोवचे हात नेहमी त्याच्या घोडेस्वार धाटणीच्या विजारीच्या खिशात असत.

सदारोवच्या वरील उद्गारावर वोल्कोव खेकसला, 'तुम्हाला उत्तर मिळालंच आहे!'

माझा राग अगदी दाटून आला होता तो मी कसाबसा गिळला आणि डॉरमिटरीत गेलो; पण जायची वाट तर साफ करून घ्यायला हवी होतीच. तसंच रागही कसं तरी करून काढून टाकणं आवश्यक होतं. म्हणून कालिनासाहेबांना बोलावून आपणच अंगण साफ करू या म्हणून सूचना दिली. त्यांनी रागानं पृच्छा केली की, 'मी काय हे असलं काम करायला आलोय आणि ते चोर काय करणार आहेत?' त्यांनी डॉरमिटरीकडे पाहून विचारलं की, 'ते दरोडेखोर?'

मी म्हटलं, 'ते करणार नाहीत!'

'बरोबर. बोलूनचालून चाचेच ते. ते नाहीच करणार!'

मी व कालिनानी अंगण साफ केलं. इतक्यात तारानेट व वोल्कोव साफ केलेल्या जागेवरूनच त्यांच्या रात्रीच्या भटकण्यासाठी जाऊ लागले. 'काय मजा आहे नाही?' ते एकमेकांकडे पाहून बोलले. कालिना चिडला व त्यांची वाट रोखून बोलला, 'तुम्हाला दात काढायला शरम नाही वाटत? मी साफ केलेल्या जागेवरून तुम्हाला जाऊ देणार नाही. घाण करायची व ती आम्ही साफ करायची काय? तुम्ही त्या बर्फातूनच जा! साफ केलेल्या जागेवरून जायचं नाही! नाही तर तुमची या फावड्यानं टाळकी फोडीन!' असं म्हणून कालिनानं फावडं त्यांच्या बाजूला फेकलं व त्यावर काय होतंय हे समजायच्या आत कालिनाचा पाइप लांब उडून गेला! कालिना होता तिथेच राहिला व डोळे फाडून त्या जाणाऱ्या पोरट्यांकडे पाहू लागला. जाता जाता त्या पोरट्यांनी 'फावडी तुम्हीच घेऊन जा!' असं ओरडून सांगून हसत-खिदळत ते निघून गेले.

कालिनासाहेब गडगडले, 'मला इथं काम करायचं नाही. मी तर सोडून जाणार. मग काहीही होवो!' ते आपल्या खोलीकडे चालते झाले. फावडी तशीच बर्फातच पडू राहिली.

कॉलनीतलं जीवन दिवसेंदिवस फार उदासवाणं होऊ लागलं. खारकोवच्या रस्त्यावरून दररोज रात्रीच्या किंकाळ्या ऐकू येत. शेजारच्या खेड्यातले लोक पण तक्रारी करीत; पण मी तरी काय करणार? मोठ्या मिनतवारीनं मी एक पिस्तुल मिळविलं. न जाणो, या आमच्या दरोडेखोरांपासून रक्षण करण्याची वेळ एखादेवेळी यायची. अर्थात मी आमच्या कॉलनीतली बिकट परिस्थिती त्यांना सांगितली नाही; परंतु तरीही मी अजून आमची ही विद्यार्थीमंडळी सुधारतील ही आशा सोडली नव्हती.

कॉलनीच्या आयुष्यातील हे पहिले महिने निराशाजनक होते व म्हणून वाया जात होते असं म्हटलं तरी सर्वार्थानंच वाया गेले असं नव्हे. या वेळी आम्ही वरचसं संशोधन केलं. यापूर्वी केलं नव्हतं असं वाचन मी सपाटून केलं.

या १९२० च्या हिवाळ्यात खरं तर पोलंडची लढाई चालू होती आणि शत्रू नोव्होमिरगोरोड आणि चेरकासीजवळ येऊन ठेपले होते. साऱ्या युक्रेनभर पोलिश सैन्याचा सुळसुळाट झाला होता. आमच्या आजूबाजूचे पुष्कळसे लोक पेटलुराच्या बावट्याखाली जात होते; पण आम्ही मात्र या मोठ्या घडामोडींकडे संपूर्ण दुर्लक्ष करून हनुवटी तळहातावर टेकून गंभीरपणे कॉलनीसाठी शिक्षण-तंत्राचा विचार करीत होतो.

या सगळ्या भाराभर पुस्तकवाचनांचा एक परिणाम म्हणजे मी शेवटी अशा निष्कर्षाला येऊन ठेपलो की, पुस्तकं नुसतीच वाचून शास्त्रोक्त तंत्र आत्मसात करता येणार नाही तर रोजच्या दैनंदिन आयुष्यातल्या अनुभवातूनच मला माझी स्वतःचीच पद्धत तयार करायला हवी.

प्रथमच मला एवढं ज्ञान झालं की, कोणताही निश्चित स्वरूपाचा कार्यक्रम अंमलात न आणता वस्तुस्थितीची नीट छाननी करून त्यावर तशीच उपाययोजना आखणं अत्यंत निकडीचं आहे.

कॉलनीतले जीवन भयंकर बिघडत चालले होते व ती जणू काही चोर व दरोडेखोरांचे क्षेत्र बनू लागली होती. एकही दिवस फुकट न घालवता ताबडतोब काही तरी करायला पाहिजे हे मला तीव्रतेने जाणवू लागले. मुलांची शिक्षकाबद्दलची वृत्ती दिवसेंदिवस हुल्लड-बाजी करून शिक्षकांचा जास्तीत जास्त अपमान करण्याकडे होती. ती वाढतच चालली होती. उदा. जेवण मागताना शिरजोरी करणे, तसंच स्त्री-शिक्षकांसमोर घाणेरड्या गोष्टींची चर्चा करणे, सामानाची नासधूस, थाळ्या, जेवण घराच्या बाहेर फेकणे, चाकू-सुऱ्या घेऊन खुशाल खेळ करणे, एकमेकाजवळ असलेल्या गोष्टींची मोठमोठ्याने खोटी खोटी चर्चा करणे, कधीकधी केव्हाही काहीही घडेल अशी धमकीवजा भाषा करणे, चालूच होते.

जळणासाठी लागणारी झाडाची लाकडे तोडायची त्यांनी सपशेल नाकारली. उलट शेडचे लाकडी छप्पर मोडून 'आपल्याला थोडे दिवस पुरेल' अशी कालिनाच्या तोंडावर हेटाळणी करायलाही त्यांनी कमी केले नाही.

कालिनासाहेब पाईपचे झुरके घेत निराशेने आपले हात जोडून म्हणाले, 'यांच्याशी बोलण्यात काय अर्थ आहे? दुसऱ्यांनी बांधले-ल्याची तोडमोड करायला त्यांनी कोणी शिकवलंय? त्यांच्या आई-बापांनीच. ते सारे स्वतः चाचे होते व तुरुंगात जाण्याच्याच लाय-कीचे होते.'

शेवटी एक दिवस स्फोट झालाच. त्या प्रचलित शिक्षणतंत्राची माझ्यावरची पकड एकाएकी सैलच झाली.

त्याचं असं झालं की, थंडीचे दिवस होते आणि स्वयंपाकाच्या चुलीसाठी मी सकाळीच झादारोवला थोडे लाकूड कापून आण म्हणून सांगितले तर नेहमीप्रमाणे त्याने चक्क हसत हसत उत्तर दिले की, 'तूच कर. एवढेजण इथे आहात. मला काय म्हणून सांगतोस?'

प्रथमच मला अशा एकेरी नावाने त्याने संबोधले. आतापर्यंतच्या आलेल्या कटू अनुभवामुळे माझा पारा रागाने व अपमानाने भयंकर चढला. मी फाड्दिशी त्याच्या तोंडात मारली. मी इतक्या जोराने त्याला मारले की त्याचा तोल जाऊन तो बाजूच्या शेगडीवर पडला व मी त्याचे मानगुटे धरून त्याला उठवून पायावर उभा केला व पुन्हा चांगल्या दोन-चार चढवल्या.

आश्चर्य म्हणजे तो कमालीचा घाबरलेला दिसला. त्याचा चेहरा

ालीचा पांढराफटक पडला होता. त्याचे हात कापत होते व त्याच ाने तो टोपीशी चाळा करीत राहिला. मी त्याला कदाचित ाखी मारले असते; पण तो चाचरत म्हणाला की, 'आन्तोन यानोविच, मला क्षमा करा.' माझा राग इतका अनावर ा होता की, प्रतिकाराचा एखादा शब्द जरी त्याने काढला ता तर कदाचित मी त्या ठगांवर तुटून पडलो असतो व कदाचित ही केला असता; परंतु एक लोखंडी गज कुठून तरी माझ्या ात आला. बाकीचे पाचजण आपापल्या बिछान्याभोवती घाबरून होते. बुजून गोंधळलेल्या स्थितीत स्वतःचे कपडे सावरीत होता. लोखंडी गज खाटेखाली सरकवून त्या सर्वांकडे वळून मी ालो, 'या क्षणाला तुम्ही सारेजण रानात लाकूड आणण्यासाठी आणि ते काम करायचे नसले तर कॉलनी सोडून चालते व्हा ण पुन्हा तोंड दाखवू नका. कुठेही जाऊन मरा.'

असे म्हणून मी तिथून बाहेर पडलो. आमची अवजारे ठेवलेल्या ाटातून मी एक कुऱ्हाड घेतली व आश्चर्य म्हणजे ते सारे माझ्या ोपाठ रानात आले. त्यांच्या हातात कुऱ्हाडी देणे त्या वेळेस योग्य ो असा एक विचार माझ्या मनात येऊन गेला; परंतु वेळ निघून ी होती म्हणून मी तो झटकून टाकला. मी तर हट्टालाच पेटलो त्याही परिणामाला तोंड द्यायची माझी तयारी होती. त्या वेळी ाचच्याउगीच फुकट मरायलाही मी तयार नव्हतो. माझ्या ात रिव्हाल्व्हर होतेच.

आम्ही रानाकडे कूच केले.

कालिनाने विचारले, 'एकाएकी अशी काय जादू केलीत तुम्ही ते सारे मुकाट्याने कामाला लागले?'

मी पानच्या निळ्या डोळ्यांत निर्विकारपणे बघत उत्तर दिलं, ा वाईटच. माझ्या आयुष्यात प्रथमच मी एक माणूस असून ्या माणसावर हात टाकला.'

'हे भगवान,' कालिनासाहेब म्हणाले, 'आणि त्यांनी तक्रार केली?'

'जे होईल ते होईल.'

सर्व काही सुरळीत झालं. मुलांनी व मी मिळून संध्याकाळपर्यंत काम केलं. आम्ही पाइन वृक्ष तोडले. ते जराजरा शांतच होते; परंतु वादळी वाऱ्याचा आवाज, पाइन वृक्षांचे बर्फाच्छादित शेंडे, करवत आणि कुऱ्हाडीचे आवाज यांच्या तालात एकत्र काम करण्यात त्यांना आनंद वाटत असावा. 'थांबा!' म्हणून सांगताच ते थांबले व थोडयाशा संकोचानं, पण माझ्या बटव्यातील तंबाखू घेऊन त्यांनी सिगरेट बनविली. झादारोवनं पहिला झुरका पाइन वृक्षाकडे पाहत सोडला व मोठ्यांदा हसून म्हणाला, 'फार छान झालं हं!'

त्याच्या त्या गोंडस, हसऱ्या चेहऱ्याकडे पाहून बरं वाटलं. मीही त्याच्याकडे हसून बघितलं व विचारलं, 'काय छान झालं? कामच ना?'

'नाही. काम तर चांगलं आहेच; पण तुम्ही जो प्रसाद दिलात तो पण!'

तो त्या वेळी छान दिसला; पण खरोखर तो माझ्यापेक्षा खूपच भरदार होता व हसूही शकत होता. मी त्याला मारण्यांचे धाडसच केलं होतं. याबद्दल नंतर मला आश्चर्य वाटू लागलं. पुन्हा एकदा हसून त्यानं आपली कुऱ्हाड उचलली व झाडाकडे जात तो म्हणाला, 'खरोखर, मजाच मजा आहे!'

आम्ही खरोखर भुकेले होतो व सारे एकत्र बसून मनापासून जेवलो. जेवताना गप्पा मारल्या; परंतु सकाळी घडलेल्या घटनेचा कोणीही उल्लेख केला नाही. मनातून शरमिंदे वाटत असूनही आपल्या अधिकाराची त्यांना सतत जाणीव करून द्यायची असं मी पक्कं ठरवलं होतं. जेवणानंतर मी त्याप्रमाणे हुकूमही काढला. वोल्कोव नुसताच हसला; पण झादारोव माझ्याकडे येऊन गंभीरपणानं पाहत म्हणाला, 'आन्तोन, आम्ही काही वाईट पोरं नाही आहोत हं! आम्हालाही समजतं. सर्व काही ठीक होईल!'

[क्रमशः]


प्रसिद्ध झाले

# टॉलस्टॉय – एक माणूस

## लेखिका : सौ. सुमति देवस्थळे

आवृत्ती दुसरी । मूल्य पंचावन्न रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# गंधखुणा

## उत्साही उपक्रमशीलतेची प्रभावी साक्ष देणाऱ्या !

उजाड-ओसाड मराठवाड्यातील तरुण मनांच्या कोवळ्या जाणीवा, नव्या ऊर्मी आणि संपादकांच्या वृत्तीतील आशावादी उमेद यांच्या गंधाने भारलेल्या या खुणा अजून 'ओल्या' आहेत. इथली हुरहूर अजून निवलेली नाही. त्यामुळेच 'वेदना-विद्रोहा'चे खडे स्वर येथे लावलेले नाहीत. 'गंधखुणां'तून पाझरणारा स्वर व्यथेचा आहे आणि 'व्यथा' वेदनेइतकी आकर्षक नसते; पण ती तितकीच खोलवर रुजलेली असते, किंबहुना तिचा स्वर सौम्य आणि सतत लावलेला असल्याने तो अधिक अंतर्मुख करतो. मग कधी 'समाजवादी अंधार' चाचपडताना ती व्यथा अधिकाधिक गडद होत जाते तर कधी श्रीराम गुंदेकरांचे शब्द या व्यथेवर 'उतारा' म्हणून येतात आणि 'उघड्या-बोडक्या पोकळ फांद्यांत' घोंघावणारे वारे शेवटी शांत होतात. 'शांताराम देवां'सारख्या एखाद्या क्वचित 'मौना'चा अर्थही समजून जातो आणि मग अशा वेळेस तर ती व्यथा अधिक सूक्ष्म होते, अस्वस्थ करते. मोडक्या-तोडक्या स्वप्नांचं खिळखिळेपण इथे आयुष्याच्या इमारतीलाच भगदाड पाडतं, लहानसहान अपेक्षाभंगांच्या 'भळभळत्या जखमा' होतात. त्या जखमांशी प्रामाणिक राहून केलेली ही निर्मिती आहे—म्हणून वेगडी—उपरे स्वरही लगेच ओळखू येतात; पण त्याचे मूळ काल्पनिक दुःखातील विवशतेत फारसे नाही. स्वत:ची निर्मिती आणि आविष्कार यांच्यातील अनाकलनीयता अपुरे ज्ञान आणि अनुभव प्रकट करण्याच्या अपार ओढींतच ते दडलेले आहे. नमानसातले रक्त पुरेसे शिंपले गेलेच नाही तर अंधार कसा उजळणार ? (वा. रा. कान्त यांनी प्रस्तावनेत याची चांगली नोंद केलेली आहे.) पण खोपात दुबळे दारिद्र्य वळवळत असतांनासुद्धा या 'अंधाऱ्याच्या गळ्यामध्ये लाख चांदण्यांची माळ' ओवण्याइतकी इच्छा, आत्मविश्वास या कवितांत आढळतो आणि तोच मला अधिक महत्त्वाचा वाटतो.

'मायबापहो आज जेव्हा आम्ही  
दिवसचक्राच्या फेऱ्यात अर्धपोटी गरगरतो  
बसल्या जागी झोपतो डोळे उघडे ठेवून  
पोटतिडिकेने वळवळतो  
उद्या पोट-खळगा भरण्याची वेदना कवटाळून  
तरीही तुमच्या इम्पालाची चाके फिरतच  
आहेत.

तोंडातला समाजवाद  
('समाजवादी अंधार') पाटर्या, बंगले,  
डाकबंगले वगैरे भोगतच आहे.'

अशा ओतप्रोत भोगून मिरवणाऱ्यांना येथे खड्या आवाजात जाब विचारलेला आहे; पण अखेर 'मोसंबी-नारंगी'ची नशादेखील साथ देत नाही. रात्र सरते, स्वप्ने विरतात आणि उरी वेदना अधिकच सलत रहाते. मग पेटून उठण्याचा निर्धारही ढासळतो. कारण 'स्वातंत्र्याचे भवितव्य' ही गळाठलेल्या डोळ्यांसमोरून सरकत जाते—तुमची इच्छा असो वा नसो यासहच अधुऱ्या—अपुऱ्या जबाबदाऱ्या, थंडावलेली जिद्द आणि दीडशे पौंडांचे ओझे सतत 'अर्थपूर्ण' (?) होत रहाते, मग ते मन मृत असो वा नसो, या अजस्र अपरिहार्यतेला इलाज नाही. अशा वेळेसच 'एखाद्याच्या अंधाराला काटे फुटतात, सूक्ष्म आवाजही अंधारटाकीने प्राणांवर खोदत रहातो.' (पृ. ४१) आणि मग त्या 'एका रात्री' पिंपळाचे पान सळसळत रहाते तर कुणाला 'आईची पाऊसओली नजर, वडिलांचा पाठीवर थरथरता हात आणि आशेने न्याहाळणारे चार 'स्नेहाळ डोळे' यांची सय जागवते (पृ. ५१) आणि मग त्या चार डोळ्यांचे पांग फेडण्यासाठी त्याचे पाय घ रोवले जातात आणि ती भाबडी रात्र र भोळ्या, देखण्या स्वप्नानं भारावून जाते.

असं भावुक भारावलेपण आणखी एक ठिकाणी येतं आणि तिथेच, ते साकळत 'पापणीची वळचण ओल्या केलेल्या आसव नीच' ('वळचण') इथे सर्वांत जास घालमेल होते आणि मग अवेळीच दाटू आलेले हे आठवणींचे ढग वेडं करून जाता कारण ते विश्व फक्त दोघांचं असत (तो 'कुंभमेळा' नसतो.) अशक्यतेच्य सीमा हलकेच गळून पडतात. एका न दुपारी उघड्या-बोडक्या रस्त्यावर सूर सा घालतात. मग ओहोटीच्या समुद्राला अवचित उधाण येतं. नि:स्तब्ध थरथर अंधाऱ्या मनात उलघाल निर्माण करत कोळिष्टकं 'मोत्यांचे घोस' खुणावता 'थडग्यात निजून राहिलेली नि:शब्द दिवा स्वप्ने' ही जागी होतात. 'गात्रागात्रातू ठिणग्यांचे फूल पेटून येते' (पृष्ठ २९ आणि 'चंद्रावरी जाणाऱ्या वाटा साजणीच्य अमृतस्पर्शाने उजळत जातात.' ओलेत्य अंगाने आलेली सुस्त पहाट तिच्या धु मादक स्पर्शाने शिरशिरी आणते. मग

उसवत्या माळरानी  
रोविलास तू श्रावण  
सडा पाचूचा झेलाया,  
मग 'जाहलो कुरण' ('साजणे' पृष्ठ २

अशी अत्तराची अक्षरं उमटतात आ क्षणभर आपल्यालाही मोहित करतात; प हे अत्तर क्षणात उडून जाणारे ! डोळ्यांना मावळतीचे रंग फार का बघायची सवय नाही. मेंदीभरली पाव रक्ताळलेली दिसतात तेव्हा या नाजूक साजूक रेषा धडाधड उसवल्या जातात आ कातरवेळी काळजाच्या आत मरणगीता सूर आक्रोशतात

अलगद खुडला जातो आभाळातू  
काळीज चिरीत जाते.

(पृ. २९) कळेना कुठे आक्रोश  
कुठे प्राण ? कुठे नाते ?'

अशा प्रश्नांचा पेटता कल्लोळ उस ळतो आणि मग गर्दीतही विरघळू संपून जाणं जमत नाही. कारण 'अस्तित्व सर्वाला पुरून उरतं, म्हणूनच प्रश्न संपवण्य

साठी आपल्याला अखेर मुकं व्हावं लागतं. तेव्हा आश्वासनांची गरज संपलेली असते. इथे असंच जगायचं असतं. ( पृ. २२ ) बोलायचं असूनही बोलायचं नसतं ! असा शान्त समजूतदारपणा अंगी बाणवत जाणं हीच दीडशे पौंडांची मिळकत असते. हे ज्ञान झालं की मग हुरहूर कधीकधी जाणवते–पण सलत नाही. मग

'मी धावतोय...मी ठेचाळतोय
... मी रक्ताळतोय' (पृ. ४६)
किंवा 'मीही अशी कशी
आसवांनी वेडावते
सावलीत असूनही
अशी उन्हात जळते' ( पृ. ३८)

असे 'विलाप' येत नाहीत.

पण अशा तक्रारी वा सामाजिक क्रांतीचे जाहीरनामे, आक्रस्ताळा आक्रोश या संग्रहात जवळपास नाही, इथे भाबडी स्वप्नच जास्त छळतात, ती फार जाणती वगैरे नाहीत हे कबूल केलंच पाहिजे; पण तसं नसणं हेच सहज स्वाभाविक आहे ( आणि या कवितांची निवड करणारे 'जुलूस' वाले फ. मुं. शिंदे स्वतःच अतिशय चांगले कवी आहेत. त्यामुळे– ! ) म्हणूनच 'गंधखुणा' खिळवून ठेवण्याइतक्या ठळक नसल्या तरी उसन्या आकर्षकतेने मिरवणाऱ्या नाहीत. त्या 'प्रामाणिक, खऱ्या' आहेत आणि ती प्रामाणिकता ( विशिष्ट मर्यादेपर्यंत ) अत्यंत महत्त्वाची वाटते. आजही अशा उगवत्या, नेक पावलांचे मनःपूर्वक स्वागत करून दाद द्यायला हवी.

–रेखा इनामदार

**गंधखुणा** ( काव्यसंग्रह )
संपादक–प्रा. भास्कर चंदनशिव
प्रकाशक–प्राचार्य, विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर.
( पृष्ठे–५२. )

□

विदेशी चित्रपट । अशोक प्रभाकर डांगे

# नाइफ इन द हेड

डॉ. बर्टोल्ड हॉफमन. वय, वर्षे तीस-चाळीस काही तरी. देश-जर्मनी. व्यवसाय–अनुवंशशास्त्रासंबंधी काही संशोधन. मनानं प्रामाणिक. अर्थातच सुबुद्ध वगैरे. आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत. पत्नी तरुण. तिचं नाव ॲन. एकंदरीत सर्वच ठाकठीक. प्रश्न असा कोणताही नाही. मग–डॉ. हॉफमननं सार्जंट युलीच्या पोटात चाकू का खुपसला ? मग सार्जंट युलीनं नेमकी पिस्तुलाची गोळी त्याच्या डोक्यावरच का चालवली? कवटी फुटून देखील डॉ. हॉफमन का वाचू शकला ? चाकू दुसरीकडे कुठे नसून तो तुझ्याच डोक्यात आहे असं व्होल्कर का म्हणाला ? मी अमेरिकेत असतो तर सरळ खिडक्यांच्या तावदानांवर गोळ्या घालतच फिरलो असतो, असं डॉ. हॉफमन का म्हणाला ? आणि आपल्याच ह्या उद्गारांची त्यानं डायरीतही नोंद का ठेवावी ? खुनी हल्ल्याच्या आरोपाखाली अटक न करता पोलिसांनी डॉ. हॉफमनला तसंच का सोडून द्यावं ?

हेच काय पण ह्यासारखे असंख्य प्रश्न रिन्हार्ड हॉफच्या 'नाइफ इन द हेड' चित्रपटाच्या संदर्भात उद्भवतात, विचारात घ्यावे लागतात. हॉफचा हा चित्रपट त्याला इंगमार बर्गमन, अकिरा कुरोसावा, सत्यजित ऱ्हा किंवा ह्यासारख्या इतर प्रतिभाशाली दिग्दर्शकांच्या पंक्तीला नेऊन बसवीत नसला तरी तो विलक्षण वेगळा, प्रभावी म्हणूनच स्वतःची वेगळी दखल घ्यायला भाग पाडतो. खरं तर डॉ. बर्टोल्ड हॉफमन हा सरळमार्गी बुद्धिजीवी माणूस. एका वंशशास्त्र-विषयक ख्यातनाम संशोधनसंस्थेत संशोधनकार्य करणारा पाश्चात्य वळणाचा. प्रामाणिकपणा अंगी अभिमानानं बाळगणारा. एरवी डॉ. हॉफमननं आपलं हे मर्यादित विश्व सोडून बाकी कशाचाच विचारही केला नसता आणि आपलं संशोधन सोडून स्वतःला, पाश्चात्य समाजालाही नव्यानं पाहूही शकला नसता. मानवाच्या निसर्गाला समजून-उमजून घेण्याच्या, त्याच्यावर मात करणाऱ्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून आपलं संशोधन हिरीरीनं पुढं नेत राहिला असता.

डॉ. हॉफमनच्या बाबतीत असं काही घडायचं नव्हतं आणि घडणार असलंच तर दिग्दर्शक रिन्हार्ड हॉफ ते घडू देणार नव्हता हे निश्चित ! त्याच्या दृष्टीनं डॉ. हॉफमन स्वतःभोवतालचं अलिप्ततेचं कवच फोडून जीवनाच्या आम मैदानात उतरणार होता आणि मग त्यातूनच एक आगळी-वेगळी नसली तरी विलक्षण प्रभावी चित्रपटकथा दिग्दर्शक हॉफ घडवणार होता.

अर्थात ह्याला ॲनच कारण झाली. अलीकडेच ॲन यूथ मुवमेंटचं काम करायला लागली होती. सुरवातीला हॉफमननं तिच्याकडे फारसं लक्षही दिलं नव्हतं तो आपल्याच जीवपेशींच्या संशोधनात मशगुल राहिला होता. फार तर एक-दोनदा तिला भेटायच्या निमित्तानं तो यूथ मुव्हमेंटच्या ऑफिसमध्ये गेला असेल नसेल येवढंच; पण फार काळ असं कोषात जगणं डॉ. हॉफमनलाही शक्य झालं नाही. युवकांच्या चळवळींनी सारं वातावरणच ढवळून टाकलं होतं. अस्वस्थता सर्वत्र भरून उरली होती. मुव्हमेंटला दडपण्याच्या प्रयत्नात नेहमीप्रमाणेच पोलिसखातं आपलं सामर्थ्य खर्ची घालत होतं. अत्याचारांच्या त्या बातम्या ऐकून डॉ. हॉफमन चांगलाच अस्वस्थ झाला होता. इतका की, दुसऱ्यांसाठी नवं काही शोधता शोधता स्वतःलाच नव्यानं शोधू लागला आणि स्वतःचंच सामाजिक षंढत्व पाहून पुरता खजील होऊन बसला !

अशाच एका अवस्थेत डॉ. हॉफमन त्या दिवशी प्रयोगशाळेबाहेर पडला. रात्र खूप झालेली. जाताना त्यानं काउण्टरवरून सिगरेट शिलगावून घेतली आणि कुणाला उगीच संशय नको म्हणून पब्लिक कॉलवरून 'आपण मुव्हमेंटच्या ऑफिसात भेटायला येतोय' असाच त्यानं ॲनला फोनही केला. युवकचळवळीच्या कार्यालयाजवळ तो पोहोचला तर तिथलं दृश्य पाहून क्षणभर भांबावलाच! ऑफिसाला पोलिसांचा वेढा पडलेला. निदर्शनांचा सर्वत्र पाऊस पडलेला आणि पोलीस निदर्शकांना निघृणपणे बडवताना डॉ. हॉफमननं पाहिलं. स्वतःच्या पत्नीवर त्यांनी चालवलेला अत्याचार मात्र त्याच्यानं पहावेना. तो सरळ पोलिसी साखळी तोडून पुढे घुसला. इथे डॉ. हॉफमनचं आयुष्य पालटून गेलं. सामाजिक अन्यायाविरुद्धच्या लढ्यात तो सरळसाधा माणूसही दंड थोपटून उभा राहिला! ॲनची साथ करण्यास त्यानं सुरुवात केली. भित्तीपत्रकं, भाषणं, नानाविध मार्गांनी तो लढा लढवू लागला. वरकरणी डॉ. हॉफमन संशोधनात मग्न असला तरी आतून मात्र तो पुरता पेटून निघाला होता!

डॉ. हॉफमन आता सामाजिकदृष्ट्या एक निरुपद्रवी प्राणी उरला नव्हता. त्याच्या ह्या नव्या सामाजिक बांधिलकीने पोलिसांचं लक्ष लगेच वेधून घेतलं आणि अपेक्षेप्रमाणेच नंतर पोलिसांनी त्याच्या राहात्या जागेवर धाडही घातली. घराची झडती घेणाऱ्या सार्जण्ट युलीवर आत्मरक्षणासाठीच डॉ. हॉफमनला चाकूही चालवावा लागला!

एका शांत, समंजस आणि सत्प्रवृत्त शास्त्रज्ञाचं एका हिंसक माणसात असं परिवर्तन का व्हावं? हे विलक्षण मनोधैर्य त्यानं कोठून मिळवलं? सामाजिक न्यायासाठी स्वतःची कवटी फोडून घेण्याइतकं त्याला बेडर कुणी बनवलं? दिग्दर्शक रिन्हार्ड हॉफ ह्याच प्रश्नांचा शोध 'नाइफ इन द हेड'मधून घेताना दिसतो. डॉ. हॉफमननं सार्जण्ट युलीच्या पोटात चाकू खुपसल्यावर, युलीनं आधीच रोखलेलं पिस्तुल त्याच्या डोक्यावर चालवावं आणि मग तीच गोळी डॉ. हॉफमनची कवटी फोडून निर्दयपणे आत शिरावी हेही स्वाभाविकच ठरतं.

घायाळ हॉफमनला तातडीनं इस्पितळात दाखल केलं जातं. त्याच्यावरची जिवावरची शस्त्रक्रियाही सुरळीतपणे पार पडते. ॲनही हे वृत्त कळताच तिथे धाव घेते. बरोबर तिचा यूथ मुव्हमेंटमधला मित्र व्होल्करही असतोच. डॉ. हॉफमन ह्या साऱ्यातून बचावतो. इस्पितळाचे मुख्य डॉक्टर त्याच्यासाठी आपलं सारं कौशल्य पणाला लावतात. त्यांच्या दृष्टीनंही डॉ. हॉफमनचा जीव लाख मोलाचा असतोच! एक संशोधक म्हणून आणि दुसरा विख्यात वाद्यवादक म्हणूनही! देशातल्या ख्यातनाम वाद्यवादकांत डॉ. हॉफमनची गणना होत असते. स्वाभाविकच त्याच्यावरील हल्ल्याला अमाप प्रसिद्धी मिळून जाते. पोलिसांनी तर डॉ. हॉफमनवर खुनाच्या प्रयत्नाचा आरोप ठेवलेला. डॉ. हॉफमनसारखा ख्यातनाम शास्त्रज्ञ, एका हिंसाचारी चळवळीला सामील व्हावा ह्या वार्तेनेच सर्वत्र खळबळ माजते. वृत्तपत्रं त्याच्याविषयीच्या बातम्यांनी वाहून जातात.

डॉ. हॉफमनबद्दल असं विपर्यस्त वातावरण पसरवण्यावरच पोलिस थांबायला तयार नसतात. ते त्याच्या इस्पितळातल्या खोलीवरही पहारा बसवतात. त्याच्यावर अटकेचं वॉरंट बजावतात. हॉफमन मात्र अजून काळाशी झगडतच असतो. शस्त्रक्रियेतून बरा होऊन देखील तो स्वतःची स्मृती गमावून बसतो. डॉक्टरांनी ॲनला सांगितल्याप्रमाणेच त्यानं एक नवा जन्मच जणू घेतलेला असतो. शब्द, भाषा सारंच त्याला एखाद्या लहानग्यासारखं मुळातून शिकवावं लागणार असतं. शिवाय हॉफमनच्या शरिराचा अर्धा भाग आधीच लुळा होऊन गेलेला. त्याला चालण्या-फिरण्याइतका तंदुरुस्त नर्सेस नेटानं पार पाडत असतात.

हॉफमनच्या अशा परावलंबी अवस्थेतच पोलिसअधिकारी त्याची भेट मागतो. तो त्याची प्रकृती अजून गंभीर असल्याचं सांगून तो भला डॉक्टर त्याला वाटेला लावतो; पण असं चार-दोनदा झाल्यावर मात्र 'हॉफमन सारं काही विसरलाय.' हा डॉक्टरी सल्ला न जुमानता पोलिसअधिकारी हॉफमनला गाठतो. त्याला धाक घालतो. सार्जण्ट युलीला समोर उभा करून 'ह्याला ओळखतोस?' अशीही दटावणी देतो. तेव्हा तो पोलिसी माणूस निर्दयपणे हॉफमनला धक्काबुक्की करतो. त्याच्या अपेक्षेप्रमाणेच 'बनेल' हॉफमन त्याला अशी तशी दाद द्यायला तयार नसतो. उलट तो स्वतःच नग्न होऊन पोलिसांना खिजवू पहातो. तेव्हा मात्र त्या पोलिसी अधिकाऱ्याचाही नाइलाज होतो. 'आरोप कबूल करावाच लागेल! अशी नाटकं फार काळ चालायची नाहीत!' असं बजावून तो अधिकारी चालता होतो. इथे मात्र पोलिसांचा अंदाज अचूक असतो. हॉफमन वरकरणी त्यांना दाद देत नसतो. 'पत्रकं कुठे छापली?' अशा प्रश्नांना उत्तर न देता स्मृतिभ्रंश झाल्याचं भासवून नामानिराळा राहू पहातो. पोलिसअधिकारी त्याला तातडीनं तुरुंगात हलवायला तयारच असतो; पण अंतर्यामी हॉफमनबद्दल सहानुभूती बाळगणारा प्रमुख डॉक्टर कधी गंभीर प्रकृतीची, कधी स्मृतिभ्रंशाची कारणं पुढं करून दरवेळी हा डाव हाणून पाडत रहातो.

खरं तर डॉ. हॉफमन यूथ मुव्हमेंटशी फारसा संबंधित असा नसतोच. म्हणूनच तिच्या किती तरी सदस्यांना तो ठाऊकही नसतो. केवळ ॲनमुळेच तो तिकडे आकर्षित होतो. त्याचा प्रामाणिकपणा त्याला बंड करायला लावतो आणि म्हणूनच डॉ. हॉफमन अखेर पोलिसी गोळीचा बचावलेला बळी ठरतो. व्होल्करला हे सत्य चांगलंच ठाऊक असतं. म्हणूनच तो हॉफमनचा प्रामाणिकपणा संघटनेच्या प्रमुखांनाही पटवून देऊ शकतो. लगोलग हॉफमनवरील हल्ल्याच्या निषेधाची भित्तिपत्रकं शहरभर जागोजाग लावली जातात. ॲनच हॉफमनला हे सांगते. एकदा तर अशी पत्रकं वाटतानाच एका भुयारी रेल्वे-स्टेशनवर व्होल्कर पकडता-पकडताच निसटतो. आता पोलिसांचा मोर्चा ॲन आणि व्होल्करकडे वळतो. हॉफमनच्या भेटी दुरावतात आणि एकदा पोलीस त्याच्या गाडीला अचूक घेरतात. ॲन निसटते. व्होल्कर अडकतो. ॲन आता भूमिगत होते. गुप्तपणे वार्ताहर परिषद घेते. हॉफमनवरच्या अन्यायाची वार्ता टीव्हीवरून जगापुढे मांडली जाते. हॉफमन छानच सुधारलेला बिअर पिण्याइतका. शस्त्रक्रियेनंतर सुरुवातीला 'सॉस' शिवाय काहीच उच्चारता न येऊ शकणारा हॉफमन आता आधाराशिवाय चालू शकतो, फिरू शकतो. आपल्याबद्दलच्या सार्वत्रिक सहानुभूतीचा फायदा घेऊन डॉ. हॉफमन हॉस्पिटलमधून पळ काढतो. तो दूर जाऊन ॲनला

भेटतो. त्याला अटक, खटला सारंच टाळायचं असतं. तिथंच खेड्यात लपून रहायचा त्याचा प्लॅन अॅन नाकारते. तिच्या दृष्टीनं त्याची प्रकृती अजूनही नाजूकच असते. मग तिच्याच पुढाकारानं अॅम्ब्युलन्स मागवली जाते हॉफमनला परत नेण्यासाठी ! हॉफमनच्या मागावर असलेले पोलिसही तेवढ्यात तिथे येऊन पोहोचतात. हॉफमनचं मानसिक बळ बेताचंच असतं. हॉस्पिटलमध्ये पोलिसांच्या पहाऱ्यात पुन्हा एकदा जाण्याच्या कल्पनेनंच तो हादरतो. दुखावल्या मेंदूवर ताण पडतो. त्याला कसला तरी झटका येतो. हॉफमन जागच्या जागी कोलमडून पडतो.


विकलांग झालेल्या हॉफमनची निरुपद्रवता आता पोलिसांनाही पटते. ते त्याच्यावरचं वॉरंट मागं घेतात आणि तो सुटल्याची खात्री होताच सहृदय डॉक्टरही हॉफमनला लगेच डिस्चार्ज देऊन टाकतात.

डॉ. हॉफमन सुटल्याबरोबर लगेच घरी जातो. तिथं अॅन व्होल्करबरोबर रहात असते. जिथं तिथं व्होल्करच्या अस्तित्वाच्या खुणा पेरलेल्या. एकदा पिसाळून तो व्होल्करला विचारतो देखील 'चाकू कुठेय ?' व्होल्कर उत्तरतो, 'हॉफमन, चाकू माझ्याकडे नाही. तो तुझ्याच डोक्यात पडला आहे !' पोलिसांना पुराव्यात न मिळालेला चाकू हॉफमनला आता हवा असतो. व्होल्करचं उत्तर मात्र विलक्षण भेदक आणि वास्तववादी असतं. हॉफमनची चिडचीड वाढतच जाते. एकदा तर तो चवताळून वेड्यासारखा व्होल्करला मारायला धावतो. त्याचा पुरुषी मत्सर जागा होतो; पण अखेर अॅनची निवडच खरी ठरते. हॉफमनच्या हॉस्पिटलमधल्या काळात तिची व्होल्करशी जवळीक जडलेली असतेच, शिवाय काम, दारु स्त्री ह्याला डॉक्टरांनी वर्ज्य ठरवलेला हॉफमन एक पुरुष म्हणूनही तिच्या कामाचा नसतोच ! वर ऑपरेशननंतरचं त्याचं माथेफिरूपण असतंच !

पिसाळलेला हॉफमन नेशन चळवळीत उतरतो. निदर्शनं, जाळपोळ ह्यात हिरीरीनं भाग घ्यायला लागतो; पण पोलिसांना आता तो नकोच असतो. त्याच्या त्या कृतीची ते मुळीच दखल घ्यायला तयार नसतात. हॉफमन आणखी निराश होतो. खचतो. सूडाचा आतून अंगार पेटून उठतो. बदला घेण्यासाठी म्हणून तो सार्जण्ट युलीच्या घरी येऊन पोहोचतो. युलीच्या चाणाक्ष बायकोला तो चलाखीनं कोंडतो आणि स्वतःच्या बचावासाठी चाकू चालवायला धडपडणाऱ्या युलीवर तो सरळ पिस्तूल रोखतो. आता खेळी हॉफमनची असते. 'हॉफमन, तुला वेड लागलंय !' असं केविलवाणेपणे पडून म्हणणाऱ्या युलीला तो आता माफ करणार नसतो. कधीच माफ करणार नसतो ! कारण एके काळी युलीनंही त्याला माफ केलेलं नसतं !

रिन्हार्ड हॉफचा चित्रपट इथंच संपून जातो. एका बुद्धिवाद्याला—डॉ. हॉफमनला तो अखेर योग्य असा न्याय मिळवून देतो. हिंसक वृत्तीचा चाकू नेहमीच प्रत्येकाच्या मनात, बुद्धीच्या कोपऱ्यात पडलेला असतो. बऱ्याचदा माणसाच्या मनाबरोबरच तो कुठे तरी तसाच काळाच्या ओघात गंजूनही जातो. अस्वस्थतेच्या एखाद्याच अंतिम क्षणी मात्र तो बुद्धीतून निर्णायकपणे बाहेर पडतो आणि मग त्याच्या हातात येऊन बसतो. मग असा जाणून-उमजून चाकू घेऊन वावरणारा, खऱ्या अन्यायावर सूडानं पेटून तो चालवणारा मात्र सामाजिकदृष्ट्या कायमचा गुन्हेगार ठरतो. रिन्हार्ड हॉफचा नायकही ह्या वस्तुस्थितीला अपवाद असत नाही ! ❑

चित्रपट : **नाइफ इन् द हेड**
दिग्दर्शक : **रिन्हार्ड हॉफ**
देश : **जर्मनी**

लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
१९४८-४९

**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे ३० । मूल्य : २० रुपये**

# स्नेहलताबाईंची ‘ सीता ’

दि. ३ फेब्रुवारीच्या ‘ माणूस ’च्या अंकात श्री. शिरीष सहस्रबुद्धे यांनी कै. स्नेहलता रेड्डी यांच्या ‘ सीता ’ या नाटकाच्या पुण्यात झालेल्या नाट्यवाचनाच्या निमित्ताने त्या संदर्भात निर्माण होणाऱ्या काही मुद्द्यांचा आणि प्रश्नांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

त्याच संदर्भात आणखी तीन मुद्दे मांडावेसे वाटतात.

१. या नाटकाचा मराठी अनुवाद सौ. सरिता पदकी यांनी केलेला आहे. सुदैवाने याच नाटकावरील स्वतःची मतं किंवा विचार सरिताबाईंनी ऑक्टोबर १९७८ च्या ‘ किर्लोस्कर ’ मासिकामध्ये नोंदवलेले आहेत. तेव्हा त्या मतांचाही या नाटकावर चर्चा करताना अवश्य विचार केला गेला पाहिजे, असं मला वाटतं.

‘ स्नेहलता रेड्डी यांचे प्रक्षोभक, पौराणिक नाटक–सीता ’ या जाहिरातवजा शीर्षकानंतर स्नेहलताबाईंचा वाचकांना थोडक्यात परिचय करून देऊन सरिताबाई प्रत्यक्ष ‘ सीता ’ या नाटकाकडे वळतात. लेखाच्या आरंभीच त्या असं म्हणतात की–

‘ स्नेहलता रेड्डींचं ‘ सीता ’ हे नाटक रामायणातल्या रावणवधाच्या नि रामविजयाच्या कालातल्या एका महत्त्वाच्या घटनेवर लिहिलेलं आहे. ती घटना म्हणजे सीतेचे अग्निदिव्य **आणि या घटनेकडे पाहिलेलं आहे सीतेच्या** दृष्टिकोणातून– **जिच्या चारित्र्याबद्दल संशय व्यक्त केलेला आहे; पण आपण शुद्ध आहोत हे जिला पक्कं माहीत आहे अशा सीतेच्या दृष्टिकोणातून.**

आणखी थोडं पुढे जाऊन सरिताबाई म्हणतात, ‘ सीता रावणानं पळवलेली. ती रामानं पराक्रमानं जिंकली. आता सीतेचे दुःखभोग संपायला हवेत. ज्या रामाच्या प्रेमावर तिने ते भयंकर दिवस कंठले तो राम, ते त्याचं प्रेम तिला मिळायला हवं. **सीतेची ही मागणी, रामाचं तिला मिळालेलं उत्तर आणि त्यावर सीतेनं काढलेला उपाय यावरचं** हे **नाटक आहे.** ’

त्याच्याही पुढे जाऊन त्या म्हणतात– ‘ सीता, रावण आणि राम ही या नाटिकेतली तीन प्रमुख पात्रं–**त्यातही सीतेची स्वतःच्या शुद्धताशुद्धतेबद्दलची दृष्टी मांडण्याचा या नाटिकेचा मुख्य हेतू.** त्यामुळे सीतेच्या व्यक्तिमत्त्वाला प्राधान्य मिळणं साहजिकच आहे. ’

हे तीन लहान उतारे या ठिकाणी उद्धृत करण्याचा आणखीही एक उद्देश असा की, सहस्रबुद्ध्यांनी काय किंवा मी काय, नाटक मूळ ज्या भाषेत लिहिलं गेलं त्या भाषेतून वाचलेलं किंवा ऐकलेलं नाही. आम्ही त्या नाटकाचा अनुवाद वाचला / ऐकला आहे. याचाच अर्थ आम्ही संहितेच्या प्रत्यक्ष अभिव्यक्तीपासून किमान एक पायरी दूर आहोत. सरिताबाईंनी स्वतःच अनुवाद केलेला असल्यामुळे त्यांनी मूळ संहिता वाचून येणारा प्रत्यक्ष अनुभव घेतला असणारच. तेव्हा या नाटकाबद्दल बोलताना / लिहिताना सरिताबाईंची मतं निश्चितच विचारात घेतली पाहिजेत.

या सबंध लेखामधूनच सरिताबाई असं सुचवताना दिसतात की, सीता ही कोणी स्त्री-स्वातंत्र्यवादिनी नाही किंवा स्त्रियांवर हजारो वर्षं होणाऱ्या अत्याचारांबद्दल ती बंड करून उठलेली नाही, तर केवळ तिच्या वैयक्तिक जीवनात पतीकडून फार मोठा अपेक्षाभंग झाल्यामुळे, तिची मागणी रामाने पूर्ण न केल्यामुळे सीतेने योजलेला हा वैयक्तिक स्वरूपाचा उपाय आहे. म्हणजेच, जसे तिच्यावर रामाने अग्निदिव्य करायला सांगण्याचा अन्याय केला नसता, तिला तसंच स्वीकारलं असतं तर सीता, हे स्नेहलताबाईंनी आपल्या नाटिकेत दाखवलेलं बंड करून उठली नसती, तसंच आता जरी ती चवताळून उठली असली तरी त्या क्षणीदेखील अखिल स्त्री–जातीवरील अन्यायाचा विचार तिच्या डोक्यात किंवा मनात आहे असं वाटत नाही. ती जे काही बोलते किंवा करते ते संपूर्णतः वैयक्तिक पातळीवरचं आहे.

२. हे सगळं लक्षात आल्यानंतर असं वाटायला लागतं की रामायण-महाभारतातील काही ठळक पात्रं घेऊन त्यांना एकदम निराळ्याच स्वरूपात रंगवण्याचा जो सपाटा हल्लीच्या विविध भाषांमधील लेखकांनी लावलेला आहे त्यातलाच हा स्नेहलताबाईंनी केलेला प्रयत्न असावा; पण त्या पात्रांनाच जर स्वतःची खोली किंवा उंची नसेल तर तो प्रयत्न ridiculous ठरतो. स्नेहलताबाईंच्या ‘सीता’ या नाटकाचे तेच झालेले आहे कारण राम आणि सीता या दोन व्यक्ती परस्परांचं मन समजावून घेण्यास अपयशी ठरल्याने निर्माण झालेली शोकांतिका म्हणजे ‘ रामायण ’ आहे. Caeser's wife should be above every suspicion या विचाराने आत्यंतिक ग्रासलेला haunted असा राम आहे. सरिताबाईंनीच लिहिल्याप्रमाणे ‘ त्याच्या मनात सीतेच्या शुद्धतेबद्दल शंका होती का ? नव्हती; पण तरी ही शुद्धता सीतेने दिव्य करून प्रजेला पटवून द्यायला पाहिजे असं त्याला वाटलं. याबाबत सीतेला मनस्ताप झाला तर त्यालाही वाईट वाटणार होतं; पण प्रजेसाठी स्वतःची इच्छा मारणं हेच राजाचं कर्तव्य तो मानत होता. ’ पण सीता हे समजून घेऊन त्याला क्षमा करू शकली नाही. त्याचप्रमाणे, आपण जरी राजा असलो आणि मर्यादा-पुरुषोत्तम राजाप्रमाणेच त्याच्या निकटवर्तीयांचंही चारित्र्य संशयातीत, निष्कलंक असलं पाहिजे हा रामाचा आग्रह जरी बरोबर असला तरी तो कोणत्या प्रसंगी, कुठपर्यंत ताणायचा याचं तारतम्य त्यानं बाळगायला हवं होतं. न्यायनिष्ठुर म्हणून प्रजेमध्ये प्रिय होऊ इच्छिणारा रघुकुलातील हा राजा राम नकळत दुःखानं होरपळून गेलेल्या स्वतःच्याच पत्नीवर अक्षम्य अन्याय करीत होता. ‘ राजा प्रकृतिरंजनात् ’ हे तंतोतंत पाळणारा राम पत्नीचं मनसुद्धा समजू शकत नव्हता; पण या सगळ्या प्रकाराला उगीचच भव्य–दिव्य-उदात्त स्वरूप देण्याचा प्रयत्न केला जातो आणि त्यामुळं सबंध प्रकारच हास्यास्पद होतो.

३. जर एखाद्याला खरोखरच स्त्रीवरील अन्यायांबद्दल, तिच्या गुलामगिरीबद्दल काही लिहायचं असेल तर त्यानं याच रामायणातील ‘ सीता ’ या पात्राला डोळ्यांसमोर ठेवण्यापेक्षा ‘ उर्मिला ’ या पात्राला समोर ठेवून काही तरी बोललं/लिहिलं पाहिजे. तिच्याइतके शारीरिक आणि मानसिक अत्याचार मूकपणे सहन करणारी, तिच्याइतकी सदैव, संपूर्णपणे उपेक्षिली गेलेली स्त्री अजून जन्माला यायची आहे; पण सीतेवर किंवा कैकेयीवर काही बरं–वाईट बोलल्यानं किंवा लिहिल्यानं जी खळबळ माजवता येते ती उर्मिलेच्याबाबतीत अशक्य असल्यानं तर आमचे हे लेखकही उर्मिलेवर हा अन्याय करत नसतील ?

–सतीश कामत

## संध्याकाळचे पुणे

पृष्ठ ५ वरून

आहे. हा सर्व जंगलभाग आहे. आंध्र प्रदेशात गल्यावर सर्वत्र कॉफी प्यावी लागणार अशी भीती वाटली होती; पण चहा मिळाला. म्हणजे असे झाले की, कॉफी मागविली की चहाच येऊ लागला. थोडक्यात तिथे चहाला कॉफी म्हणतात. कॉफीला काय म्हणतात ठाऊक नाही. या देवळाचे उत्तर बाजूचे गोपूर शिवाजीमहाराजांनी बांधले. येथे श्रीशिवाजीमहाराजांची मूर्ती हातात दंड घेऊन उभी दाखविली आहे. धर्मशाळा चांगली आहे. येथे सिंहाच्या एका मूर्तीच्या तोंडात फिरता दगडी गोळा आहे. पोपटाच्या मूर्तीच्या चोचेत दगडी माळ आहे. मल्लिकार्जुनाच्या देवळात दोन तोंडे व एकवीस हात असलेले पक्ष्याचे शिल्प आहे. ते.विशेष आहे. येथे श्रीशिवाजीमहाराजांना वैराग्य आले होते. त्या ठिकाणी चारशे फूट खोल दरी आहे. श्रीशैल धरण सर्व धरणांत कमी खर्चाचे होणार आहे. कारण तिन्ही बाजूंनी नैसर्गिकच भिंती आहेत.'

शेवटी प्रा. ग. हु. खरे बोलले. आधीची तीन व्याख्याने व नंतर अध्यक्षीय भाषण चालू असता या सव्वीस श्रोत्यांतून अधूनमधून काही प्रश्न विचारले जात होते. वक्त्याच्या सांगण्यातून काही गळले की श्रोत्यांपैकी कुणी विचारी – ' तुम्ही ते अमके पाहिले का ? ' श्रोत्यांपैकी तिघे-चौघे या सर्व यात्रा करून आलेले दिसले. श्रोते व वक्ते यांच्यात इतका मुक्त संवाद कुठे नसेल ! हल्लीच्या पोरांच्या भाषेत सांगायचे तर मी बोअर व्हायला, या संध्याकाळचा, इथे शिरलो आणि रमत रमत गेलो. बोअर होण्यात रमणे कसे असते मला ठाऊक नाही; पण रमल्यामुळे मला अपराध्यासारखे वाटू लागले.

प्रा. ग. हु. खरे एकूणऐंशी वर्षांचे आहेत. एका व्याख्यात्यांनी देवगिरीला ते कसे चढले हे सांगितले होते. ग. हु. खरे यांच्या बोलण्यावर द. वा. पोतदार यांचा परिणाम वाटला. म्हणजे ऐसपैस लोळत विषय सांगावयाचा. अर्थात यासाठी चतुरस्र माहिती लागते. खरे यांनी वर्णन केली ती ठिकाणे मी पाहिलेली होती. ब्रिटिशांच्या काळी अजिंठा निजामहद्दीत होतं. पाच रुपये भरले की, लेणी पाहण्यास मोठ्या आरशांचे कवडसे लेण्यांत टाकीत इतर श्रोते जसे माहिती पुरवत होते तशी मलाही माहिती पुरवावी असे वाटू लागले.

श्री. खरे पण निजामाच्या काळात तिकडे गेले होते. त्यांनी आजच्या व त्या वेळच्या परिस्थितीतील पडलेले अंतर सांगितले. निजामाच्या शासनाचाच नव्हे तर त्या वेळच्या मुसलमानांचा उद्दामपणा व मूर्खपणा यांचे अनुभव त्यांनी सांगितले. मला तेच अनुभव आले होते. अजिंठा लेणी तेव्हा मी अनेकदा पाहिली होती; पण तिथे डोंगरातून उगम पावलेल्या नदीचे नाव मी विसरलो होतो. खरे यांनी तिचे नाव 'वाघोरा' आहे हे सांगताच मला अगदी आनंद झाला. खरं म्हणजे ते नाव कळलं नसतं तर काही बिघडलं नसतं. श्री. खरे यांनी एकूण मुद्दा सांगितला की, गेल्या तीस वर्षांत ऐतिहासिक अवशेषांकडे सरकारकडून खूपच लक्ष घातले जात आहे

या व्याख्यानातून किल्ले, नक्षीकाम, मूर्ती, भग्नावस्था, खंदक, मागचे सन, राजे, बांधकामे यांचे वर्णन ऐकत असता केवढा प्रचंड भूतकाळ मागे टाकला आहे हे कळत होते. जसे वकिलाकडे बसल्यावर मनुष्यस्वभावाचे कळते, डॉक्टरकडे बसल्यावर आरोग्य किती निमित्तावर टेकलेले असते हे कळते, तसे इतिहास संशोधन मंदिरात, संशोधकांत बसल्यावर काळ केवढा अनंत आहे हे कळते. त्याचसाठी ऐतिहासिक अवशेष सांभाळून ठेवून, काळाला जागजागी बांध घालून साठवून ठेवण्याच्या प्रयत्नात संशोधक असतात. भूतकाळ अपरिमित–भविष्यकाळ त्याहून अपरिमित. या दोहोंमधला वर्तमानकाळ. ज्याला आपण अतिशय महत्त्व देतो तो, ब्लेडच्या धारेएवढासुद्धा नसेल. हा क्षण 'वर्तमान' म्हणता म्हणता भूतकाळात जमा होत जातो. आता आता म्हणता म्हणता अजिंठा पाहिल्याला मला तीस वर्षे झाली होती. या सभेत बसल्याला दोन तास झाले होते. दोन तास भूतकालात गेले होते. या दोन तासांनी मला आनंद दिला होता.

सभा संपल्यावर सर्वांच्या म्हणजे तीस श्रोत्यांच्या तोंडांवर मला हा आनंद दिसला. माझ्या मनात आलं, इथे बोलणारे किंवा ऐकणारे म्हातारे, म्हातारे नाहीत–तरुण म्हातारे आहेत, निश्चितच. याउलट बाहेर जे पदोपदी वैतागणारे, निराशावाद घोटणारे तरुण आहेत तेच म्हातारे आहेत. मी सर्वांना सांगेन की, सर्व नाही, तरी काही सांजवेळा तुम्ही इथे या मंदिरात घालवा !

कदाचित ज्या वर्तमानकाळाची तुम्ही महती गाता तो वर्तमानकाळ अस्तित्वातच नाही हे तुमच्या लक्षात येईल. भूतकाळ आहे–भविष्यकाळ आहे, वर्तमानकाळ हा आभास आहे. आपल्या अस्तित्वाचा अहंकार वगैरे कालप्रवाह वगैरे काही नसेल. हे भूत व भविष्य दोन काळ विसरून वर्तमानकाळाचे स्तोम माजविल्याने आजचे घोटाळे झाले असतील. म्हणूनच काळाचे भान यायला तुमच्या सर्व नाही, तरी काही सांजवेळा इथे या इतिहासाच्या मंदिरात घालवा असे मी पुन्हा सांगेन ! □

## मानवी हक्क

पृष्ठ ८ वरून

परिपूर्ण लोकशाही आणण्यासाठी आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट व्हावयास हवी. तसेच मूलभूत मानवी हक्क प्रत्येकास मिळायला हवेत. भाषणस्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य वगैरे मूलभूत हक्क पाश्चात्य लोकशाही देशांत बऱ्याच प्रमाणात आज आहेत; पण या हक्कांइतकाच काम मिळण्याचा हक्क महत्त्वाचा आहे. प्रत्येकाला काम पुरविण्याची जबाबदारी सरकारने स्वीकारायला हवी. काही पाश्चात्य देशांतून बेकारभत्ता देण्याची तरतूद असलेले कायदे आहेत; पण तेवढे पुरेसे नाहीत कम्युनिस्ट देशांतून बेकारी नष्ट झालेली असून प्रत्येकाला काम पुरविण्यात येते; पण विचारस्वातंत्र्य, टीकास्वातंत्र्य वगैरे मूलभूत हक्क तेथे नाहीत. कम्युनिस्ट पक्षाशिवाय दुसरे पक्ष स्थापण्याला व संघटित करण्याला परवानगी नाही. निवडणुकीत एकच यादी मतदारांपुढे ठेवली जाणार, त्यापलीकडे कोणाला उभे राहण्याचे किंवा मत देण्याचेही स्वातंत्र्य नाही. या पद्धतीत कम्युनिस्ट हुकूमशाहीच अखेर कायम रहाते. परिपूर्ण लोकशाही आणण्यासाठी कम्युनिस्ट देशांतही आता एकापेक्षा अधिक पक्षांना संघटनास्वातंत्र्य द्यायला हवे. कम्युनिस्ट राजवटीला लोकांचा खरोखरच पाठिंबा असेल तर विरोधकांची भीती बाळगण्याचे त्यांना कारण नाही.

भारतात आपण पाश्चात्य लोकशाहीचीच बाह्य चौकट स्वीकारली असून तिच्या गुणांपेक्षा दोषच आपल्या अंगी बाणले आहेत. निवडणुकांवर अमाप खर्च केला जात आहे. सत्ता, पैसा, जात यांच्या बळावर मतदारांवर दडपण आणले जात आहे. मताचा हक्क असला तरी अशा परिस्थितीत मतदार स्वतंत्रपणे मत कितपत बनवू शकतो याची शंका आहे. खऱ्या व परिपूर्ण लोकशाहीसाठी मानवी हक्क प्रत्येकास निर्भयपणे उपभोगता आले पाहिजेत. त्यासाठी आर्थिक व सामाजिक विषमताही नष्ट करायला हवी. जगातील सर्व लोकशाहीवाद्यांनी या दिशेने प्रयत्न करायला हवेत. □

मुक्काम औरंगाबाद

# कुणाला जातिकलह अटळ वाटतो कुणाला वर्गकलह कुणाला हवा आहे सुसंवाद

## दलित साहित्यसंमेलन

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाची फुंकर घालून ज्या परिसरात चैतन्य फुलविले त्या नागसेनवनात सत्तावीस-अठ्ठावीस जानेवारीस तिसरे दलित साहित्यसंमेलन भरले होते. बाहेरगावांहून आलेल्या प्रतिनिधींची संख्या आणि स्थानिक लोकांचा प्रचंड उत्साह पाहिल्यावर दलित साहित्याचा प्रवाह विशाल व गतिमान होत असल्याचे जाणवले. दोन्ही दिवसांतील चर्चा-परिसंवादांतूनही दलित साहित्याच्या कक्षा आता रुंदावत चालल्या असून त्यात अधिक परिपक्वता येत असल्याचे दिसले. दोन दिवसांच्या कार्यक्रमात पाच परिसंवाद, कथाकथन, दोन कवीसंमेलनं व दोन नाटिका असा भरगच्च कार्यक्रम होता.

संमेलनाची सुरुवात समतालढ्यातील हुतात्म्यांना आदरांजली वाहून करण्यात आली. स्वागताध्यक्ष प्र. ई. सोनकांबळे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ' बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य मराठवाड्याचा कायापालट करायला कारणीभूत झाले आणि याच ठिकाणी विद्यापीठ-नामांतरावरून भारतीय घटनेतील समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय याचा उद्घोष करणारे पान फाडून टाकण्यात आले आणि त्या ठिकाणी मनुस्मृतीच्या पानाची प्रतिष्ठापना करण्यात आली हे आपले दुर्दैव आणि याच पार्श्वभूमीवर हे साहित्य-संमेलन सुरू होत आहे. तेव्हा उपस्थित असलेले मान्यवर याचा योग्य तो शोध-बोध घेतीलच. ' उद्घाटनाच्या भाषणात घनःश्याम तळवटकर यांनी प्रामुख्याने दलित साहित्यामागील प्रेरणेचे विवेचन केले.

या साहित्यसंमेलनाला अध्यक्ष म्हणून काही नामांकित साहित्यिकांना संयोजकांनी विचारले होते; पण या सगळ्यांनी काही ना काही कारण देऊन येण्याचे नाकारले. कदाचित मराठवाड्यात काही दिवसांपूर्वी नामांतराच्या प्रश्नावरून जे घडले त्याच्या पार्श्वभूमीवर तिथे आता जाणे नको, असा सोयिस्कर विचारही या नामांकितांनी केला असावा. यांनी नाही म्हटल्यावर मग कमलेश्वर यांचे नाव पुढे आले आणि त्यांनीही येण्याचे कबूल केले. खरे म्हणजे कमलेश्वरांचे ' समांतर साहित्या 'तील कार्य आणि दलित साहित्याविषयीची आस्था, इतर भाषांमध्ये हा प्रवाह नेण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न या सर्वांचा विचार करता त्यांचे नाव संयोजकांना आधीच सुचायला हवे होते. असो. दोन्ही दिवसांत दिसलेल्या कमलेश्वरांच्या व्यक्तिमत्त्वाने, भाषणातील विचारप्रवाहाने व बांधवत्या शैलीने हेच सिद्ध केले की, त्यांची निवड अगदी योग्य होती. त्यांच्या अध्यक्षीय भाषणात आजच्या आर्थिक, सामाजिक परिस्थितीचे विश्लेषण तर होतेच, पण साहित्यविषयक चिंतनही होते.

दलित साहित्य ही आजची फार मोठी शक्ती आहे असे सांगताना त्यांनी म्हटले की, ' या साहित्याने भारतातील दलित आणि शोषित मानवांचा सन्मान केला आहे व हे साहित्य भारतातील शोषित, श्रमिक मानवाच्या अस्मितेचा आवाज बनले आहे. ' सौंदर्यवादी, अध्यात्मवादी व तथाकथित व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्यांवर टीका करताना ते म्हणाले की, ' व्यक्तिस्वातंत्र्याची जी घोषणा आणीबाणीत व आजही केली जात आहे ती एका अर्थाने हिंदुत्ववादी स्वातंत्र्याचेच दुसरे नाव आहे. आजच्या विषम व शोषित समाजव्यवस्थेत व्यक्तिस्वातंत्र्य केवळ उच्च वर्णीयांचे व सधन वर्गाच्या हितसंबंधांचे संरक्षण करणारे साधन झाले आहे व्यक्तिस्वातंत्र्यास आम्ही निरपेक्ष मूल्य मानीत नाही. प्रथम समाजव्यवस्थेची रूपरेषा आणि दिशा निश्चित झाली पाहिजे; म्हणजे त्या संदर्भात व्यक्तीचे स्वातंत्र्य म्हणजे नक्की काय हे ठरवता येईल व ते मिळविण्यासाठी झगडता येईल. ढोंगी, राजकारणी व हिंदुत्ववाद्यांच्या, भांडवलदारांच्या हातातच समाज जाणार असेल तर हे व्यक्तिस्वातंत्र्य आम्हाला नको. आम्हाला हवे आहे ते सम्यक स्वातंत्र्य. ' दलितांना अभिप्रेत असलेल्या सम्यक स्वातंत्र्याचे विश्लेषण करताना कमलेश्वर म्हणाले की, ' सम्यक स्वातंत्र्य हे अद्वैत दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. आज व्यक्तिस्वातंत्र्य द्वैत स्वरूपात कायमचा सिद्धांत होऊन बसले आहे. कारण देशात आजही सामाजिक व सांस्कृतिक स्वातंत्र्याची समान वाटणी झालेलीच नाही. म्हणून सम्यक स्वातंत्र्य हेच दलित व शोषित वर्गाचे अर्थपूर्ण स्वातंत्र्य होऊ शकते. या स्वातंत्र्याला बरोबर घेऊन जेव्हा विचार व जीवनावर आधारलेली स्वतंत्रता सुरक्षित केली जाईल तेव्हाच व्यक्ती आपल्या स्वतःच्या स्वातंत्र्याचा खऱ्या अर्थाने उपयोग करून घेऊ शकेल.' आज सवलतनिहाय राखीव जागांच्या प्रश्नावरून जातीयवादी व वर्गवादी संघर्षाने पेट घतला आहे. त्याचा उल्लेख करून ते म्हणाले की, ' दलितांवर बिहार, उत्तर प्रदेशमध्ये अनन्वित अत्याचार होत आहेत. कारण पदशक्ती, वंशशक्ती व गोत्रशक्तीच्या जोरावर आणीबाणी उठल्यानंतर मिळालेल्या व्यक्तिस्वातंत्र्याचा फायदा अत्याचार करणारा वर्ग घेत आहे. '

कमलेश्वरनी आपल्या भाषणात मानवतावादी व समाजवादी मंडळींचाही ' समाचार ' घेतला. ते म्हणाले की, ' मानवतावादाचा

मुखवटा लावणारे नरहर कुरुंदकरांसारखे विचारवंत जेव्हा म्हणतात की, 'दलितांना परत आणा' तेव्हा त्यामागे त्यांना दलितांविषयी वाटणारे प्रेम नसते तर उच्च वर्णीय 'समाजवाद्यांना' आपल्या शेतावर काम करायला मजूर मिळतील हा स्वार्थ असतो. दलितांवर उच्च वर्णीयांचे वर्चस्व रहावे या हेतूनेच अनंतराव भालेराव 'मराठवाडा' दैनिकातून जातीय संघर्षाला खतपाणी घालत असतात.

'असमाधान, संघर्ष, अस्वस्था याच गोष्टी साहित्यनिर्मितीच्या मुळाशी असतात. आजचे दलित साहित्यिक त्यांच्या स्वतःच्या आत्म्याचा, काळाचा होणारा अपमान सहन करू शकत नाहीत व त्यातून ते गरज म्हणून साहित्यनिर्मितीकडे वळतात. निकडीतून आलेले असे लेखनच अधिक जीवनस्पर्शी बनते.' दलितेतर साहित्य व दलित साहित्यातील नेमका फरक सांगताना ते म्हणाले की, 'त्यांचे विश्व वेद, उपनिषद, ब्राह्मण, स्मृती यांचे आहे, तर आमचे विश्व शेत, खेडी, झोपडपट्टया, कारखाने, कुदळी-फावडी यांचे आहे. ते मानवाच्या भल्यासाठी साहित्याच्या कर्मकांडावर विश्वास ठेवतात, तर आम्ही मानवकल्याणासाठी इतिहासाच्या संघर्षाची पारख करतो. ते साहित्याला जिवंत ठेवू इच्छितात तर आम्ही मानवाला जिवंत ठेवू इच्छितो. ते म्हणतात, साहित्याचा चेहरा विद्रूप झालाय. आम्ही म्हणतो, मनुष्याचा चेहराच विद्रूप झालाय. आम्ही मनुष्याला सुंदर घडविण्याची इच्छा बाळगतो, तर ते धर्मवादी साहित्याला सुंदर बनवू इच्छितात.'

निखळ सौंदर्यवादी व कलावादी साहित्यावर टीका करताना कमलेश्वर यांनी हेही सांगितले की, 'आज दलित साहित्यात जी अनुभवांची प्रामाणिकता दिसत आहे ती या साहित्यात कधीच नव्हती. त्यातले अनुभवविश्वच बेगडी होते.' दलित साहित्याचे स्वरूप व त्याच्या कक्षा स्पष्ट करताना कमलेश्वरांनी त्याचा सांधा मराठीतील कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, मुक्तिबोध, गोदावरी परुळेकर, दि. के. बेडेकर इत्यादींच्या साहित्याशी कसा जोडलेला आहे हेही सांगितले.

'डाव्या शक्तींनी, सामाजिक बांधिलकी मानणाऱ्यांनी एकत्र येणे, आपली एकजूट बांधणे, ही काळाची गरज आहे', असे सांगून ते म्हणाले की, 'आताची वेळ सवर्ण-दलितातील वैमनस्य वाढविण्याची नाही, धर्मग्रंथांना फक्त शिव्या देण्याची नाही, तर वैचारिक मंथनाची गरज आहे. तशी घुसळण झाली तरच जाती-जातीतील द्वेषभावना जाऊन जातिव्यवस्था मोडण्याच्या कार्याला चालना मिळेल, शोषणव्यवस्था संपुष्टात येऊन समाजवादाकडील वाटचाल सुरू होईल.'

कमलेश्वरांचे भाषण हे विशिष्ट राजकीय प्रणालीसाठी सुखाची नोकरी सोडणाऱ्या एका कलावंताचे चिंतन म्हणून मननीय होते व तेच या संमेलनाचे आकर्षण ठरले. त्यांच्या समारोपाच्या भाषणातही त्यांनी सगळे राजकीय हितसंबंध बाजूला ठेवून मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिले पाहिजे, असे ठासून सांगितले. तामिळनाडूत दोन विद्यापीठांची नावं बदलली जातात त[illegible] मराठवाडा विद्यापीठाच्या बाबतीतच कुठली अडचण यावी अस[illegible] प्रश्नही त्यांनी विचारला. रोखठोकपणा हा कमलेश्वरांच्या व्यक्ति[illegible] मत्त्वाचा भाग. त्यांच्या दोन्ही भाषणात आजच्या साहित्यविषयक [illegible] साहित्यबाह्य प्रश्नांसंबंधीच्या विवेचनातही हाच रोखठोकपणा सर्व[illegible] दिसत होता.

## पहिला दलित साहित्यिक

'दलित साहित्याने पारंपारिक मराठी समीक्षा बाद ठरविली आहे[illegible] या पहिल्या परिसंवादात रावसाहेब कसबे, अर्जुन डांगळे, डॉ. यू. म[illegible] पठाण, भालचंद्र नेमाडे, सुधीर रसाळ, यशवंत मनोहर, दया पवार म. भि. चिटणीस यांनी भाग घेतला. अध्यक्ष बाबूराव बागुल होते [illegible] चर्चेचे संचालन के. रं. शिरवाडकर यांनी केले. रावसाहेब कसब[illegible] यांनी सांगितले की, 'मराठी समीक्षेच्या कसोट्या दलित साहित्याल[illegible] लावता येणार नाहीत. इतिहासाचा वैज्ञानिक दृष्टिकोन नसल्यामुळे मराठी समीक्षा फसत गेली. आज दलित साहित्याची समीक्षा करणारी दोन-चार पुस्तकं उपलब्ध असली तरी दलित साहित्याची सैद्धांतिक भूमिका मांडणाऱ्या ग्रंथाची गरज आहे. अशा ग्रंथाने नुसते दलित साहित्यच नव्हे तर मराठी साहित्यही समर्थ होईल.' अर्जुन डांगळे यांनी 'मराठी समीक्षेची परंपरा ही मध्यम वर्गीय परंपरा आहे व दलित साहित्याने मराठी समीक्षेचे स्वरूप बदलले', असे सांगितले. मराठी साहित्याचा आढावा घेत बाबूराव बागुल यांनी आजपर्यंतचे मराठी साहित्य हे तसे निर्जीवच राहिल्याचे सांगितले. बाबूराव बागुल यांचे भाषण विषयाला धरून कमी व विषयाला सोडून जास्त होते. मराठी समीक्षेचा उल्लेख त्यांनी जाता जाता फक्त केला.

भालचंद्र नेमाडे यांनी आपल्या भाषणात काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले. पहिला दलित साहित्यिक नामदेव हा होता असे त्यांचे म्हणणे. त्यांनी दलित साहित्याची परंपरा संतसाहित्यापर्यंत नेली व मराठीत विद्रोहाची भावना मुळातच आहे असे सांगितले. मराठी समीक्षेत उथळपणाच जास्त आहे; कारण समाजशास्त्रीय वाङमयीन निकषांचा आपल्याकडे पूर्ण अभाव आहे. सौंदर्यवादी व रूपवादी चर्चेत आपले समीक्षक अडकून पडले होते. अशा वेळी दलित साहित्य पुढे आले. त्यामुळे त्याच्याकडे कानाडोळा होऊन समीक्षेद्वारे त्याला दिशा देण्याचे कामच होऊ शकले नाही. दलित साहित्यात एकसुरीपणा आहे. मतिभ्रम करणाऱ्या कवितेत व क्षीण आवाका असलेल्या कथाप्रकारात न अडकता गंभीर आणि दीर्घगामी वाङमयप्रकारांकडे दलित लेखकांनी वळावे, असेही त्यांनी सांगितले. सुधीर रसाळ म्हणाले, 'दलित साहित्यातील अनुभवविश्व नवे असले तरी दलित लेखक अनुभवांकडे तटस्थपणे पाहू शकत नाहीत; म्हणून हे वाङमय समाजाला [illegible] हलवून सोडत असले तरी ते अर्थपूर्ण व सखोल बनलेले नाही. तेव्हा [illegible]

अशा साहित्याने समीक्षेला आव्हान देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.' कवी यशवंत मनोहर यांनी चर्चेत भाग घेताना सांगितले की, 'अगदी ज्ञानेश्वरांपासून मराठी समीक्षा ही पारंपारिकच आहे. अधून-मधून तिला धक्के देण्याचे कामही झाले. पहिला धक्का केशवसुतांनी दिला. मार्क्सवादी साहित्याने नंतर मराठी समीक्षेला बाद ठरविले. दलित साहित्य त्याच्याही पुढे गेले आहे; कारण त्याने जीवनासंबंधी ठोस भूमिका घेतली.' दया पवारांनी कलावंत खुडण्याचे काम मराठी समीक्षा करीत आहे व ती बरीचशी विद्यापीठीयच आहे, असे सांगितले.

या परिसंवादातील चर्चेचा सूर साधारण असाच होता की, मराठी समीक्षा ही पारंपारिक आहे. ती पारंपारिक कोणत्या अर्थाने आहे याचे नीटसे स्पष्टीकरण झाले नाही. मर्ढेकरांच्या कलावादी व दि. के. बेडेकर, मुक्तिबोध, शं. बा. सरदार इत्यादींच्या मार्क्सवादी व जीवनवादी समीक्षेचे मूल्यमापनही त्यातून नीटसे होऊ शकले नाही.

दुसऱ्या दिवशीच्या दलित साहित्यात खऱ्या अर्थाने स्त्रियांचे व अन्य उपेक्षितांचे चित्रणच झाले नाही. या परिसंवादाचे संचालन प्रा. अरुणा लोखंडे यांनी केले व अध्यक्ष छाया दातार होत्या. चर्चेची सुरुवात करताना प्रा. अरुणा लोखंडे यांनी सांगितले की, 'आधी दलितांना न्याय मिळाल्यावर मग दलितांहूनही दलित असलेल्या स्त्रीला न्याय मिळू शकेल. दलित–साहित्यातही 'सूड' या कादंबरीचा अपवाद सोडल्यास स्त्री ही उपेक्षितच राहिली आहे. स्त्रीची मानसिक कोंडी दलित लेखकांनी आपल्या साहित्यातून फोडावी. लता भिसे म्हणाल्या की, 'स्त्रीच्या स्वतंत्र सामर्थ्याचे मोल तसे कोणालाच समजले नाही. पुरुषांनी स्त्री हा वाङमयात बराचसा टिंगलीचाच विषय केल्याचे आढळते. रणजित देसाई यांनी स्वामी कादंबरीतून सतीचे महत्त्व चितारले. स्त्रीच्या उपेक्षेचे, प्रश्नांचे, आशा–आकांक्षेचे चित्रणच मराठी साहित्यातून झाले नाही.' मराठी साहित्याला नकार देणाऱ्या दलित साहित्यानेही याबाबत फारसे काही केले नाही अशी तक्रारही त्यांनी केली.

## स्त्री उपेक्षीतच राहिली

'बौद्ध समाज बौद्ध झालेला नाही तर तो बुद्दू झाला आहे. कारण तोही स्त्रियांना मारतो, त्यांची उपेक्षा करतो. चूल नि मूल यातच स्त्रियांची चळवळ गुरफटली. स्त्री-मुक्तीसाठी सर्व जाति-धर्मांच्या स्त्रियांचे संमेलन भरवावे', असे सौ. वत्सला खोब्रागडे यांनी सुचविले. 'गावगाड्याचे खरेखुरे चित्र दलित साहित्यातून उमटलेलेच नाही. चांभार वगैरे इतर जातींतील अनुभवविश्वही अजूनपर्यंत त्यातून फारसे आलेले नाही. दलित चळवळीने, साहित्याने सामाजिक परिवर्तनाच्या उद्दिष्टासाठी सर्व जाती–जमातींतील घटकांना बरोबर घेतले पाहिजे. हा समता स्थापण्याचा प्रश्न आहे, तेव्हा कोणी कुणाला हिणवू नये. हिणवण्याने माणसे चळवळीत न येता ती दूर जातात. बौद्धांनी अहंकाराचा त्याग करण्याचा विवेक दाखवावा व दलित साहित्यिकांनी एकसुरीपणा टाळावा', असे अनिल अवचट यांनी सांगितले. परिसंवादाचा समारोप करताना छाया दातार म्हणाल्या की, 'आजचे दलित साहित्य हे शहरीच आहे. दलित चळवळीतही स्त्रियांचा सहभाग दिसत नाही. स्त्रीला जो दुय्यम नागरिकत्वाचा दर्जा लाभला आहे तो कसा नष्ट करता येईल याचा विचार दलित साहित्याने करावा व स्त्रीमुक्तीच्या लढयात उतरावे', असेही त्यांनी सांगितले.

स्त्रियांच्या उपेक्षेचे चित्रण मराठी साहित्यात तर नाहीच, पण दलित साहित्यातही झालेले नाही. उपेक्षित स्त्री साहित्यातही उपेक्षितच राहिली आहे, हा या परिसंवादातील चर्चेचा एकूण निष्कर्ष होता.

नंतरचे दोन्ही परिसंवाद हे रंगभूमीशी संबंधित होते. 'दलित अभिव्यक्तीस नव्या रंगभूमीची गरज आहे' हा पहिल्याचा विषय होता तर दुसऱ्याचा विषय होता, 'दलित रंगभूमीच्या संदर्भात लोककलांचे पुनरुज्जीवन आवश्यक आहे.' या दोन्ही परिसंवादांतील चर्चेतून प्रा. भालचंद्र फडके, सतीश आळेकर, दत्ता भगत, श्रीपाद सबनीस, योगेन्द्र मेश्राम, भाऊ पंचभाई, यशवंत मनोहर, भास्कर जाधव इत्यादींनी भाग घेतला. दलित नाटक व रंगभूमीच्या संदर्भात अजून फारसे काही प्रत्यक्षात झालेले नसल्यामुळे 'दलित साहित्याने नाटक व रंगभूमीकडे वळून काय काय केले पाहिजे' याभोवतीच चर्चा फिरत राहिली. कथा–कवितेपेक्षा दृश्यातून व्यक्त होणारी चीड अधिक परिणामकारक ठरते. म्हणून समाजात बदल घडविण्यासाठी रंगभूमीसारखे साधन अधिक परिपक्व व समर्थ करण्यात यावे हा बहुतेक वक्त्यांच्या भाषणातील आशय होता.

## परिसंवाद–कथाकथन इ.

संध्याकाळचा 'मराठवाडा हिंसाचाराने निर्माण केलेले प्रश्न' हा परिसंवाद त्या मानाने चांगलाच रंगला. तसे ते अपेक्षितही होते. संचालन प्रा. शं. रा. हुणमंते यांनी केले. अध्यक्षस्थानी प्रा. म. भि. चिटणीस होते. परिसंवादाच्या प्रारंभीचा म. भि. चिटणीस यांनी सांगितले की, 'ही दंगल नामांतरामुळे घडली की नामांतराच्या निमित्ताने घडली यात न शिरता भंगलेली मने कशी जोडली जातील, तुटलेल्या संवादाचा धागा कसा जोडला जाईल याबाबत वक्त्यांनी सूचना केल्यास त्या बहुमोल ठरतील.' रावसाहेब कसबे यांनी जाति-कलह अटळ असल्याचे सांगितले. दलित समाजाने ही अपरिहार्यता जाणून जाती नाहीशा करण्यासाठी जातीकलहाची तयारी करावी. त्यांनी आजच्या दलित नेतृत्वाचे विश्लेषणही परखडपणे केले. बाबा आढाव यांनी आपल्या भाषणात यादवी युद्धाने हा प्रश्न सुटणार नाही. दलित व दलितेतरांत संवाद सुरू झाला पाहिजे असे सांगितले.

शरद पाटील यांनी वर्गीय जातीय समाजपरिवर्तन अटळ आहे, असे सांगून आर्थिक, सामाजिक कृतीसाठी पूर्वतयारी करायला पाहिजे, त्या दृष्टीने वैचारिक क्रांतीचे स्वागत व्हावे यावर भर दिला. दलित व श्रमिक यांनी एकत्र येऊन वर्गीय, जातीय हुकूमशहाविरुद्ध उभे रहावे असेही त्यांनी सांगितले. वर्गीय व जातीय दोन्ही प्रश्नांचा साकल्याने विचार शरद पाटील यांनीच प्रामुख्याने केला. बापूराव जगताप, व्ही. व्ही. गांगुर्डे, रतनलाल सोनग्रा, भाऊ लोखंडे आदी वक्त्यांनीही चर्चेत भाग घेतला.

पहिल्या दिवशी संध्याकाळी भास्कर चंदनशीव यांच्या अध्यक्षतेखाली कथा–कथनाचा कार्यक्रम झाला. नागनाथ कोत्तापल्ले, मोतीराज राठोड, प्रल्हाद चेंदवणकर, प्र. ई. सोनकांबळे यांचे कथाकथन रंगले. दोन्ही दिवसांच्या कविसंमेलनात सुमारे पन्नास कवींनी भाग घेतला. दोन्ही कविसंमेलने काहीशी लांबली, तरी त्यातून राम दोतोंडे, हरिश बनसोडे, केशव बसेकर, शैला शिरवाडकर, विष्णु सलामपुरे, तुलशी परब, भाऊ पंचभाई इत्यादी कवी रसिकांच्या मनात भरले.

समारोपाआधी बाबा आढाव यांच्या अध्यक्षतेखाली व्यक्ती, वृत्तपत्रे व नियतकालिके यांनी दाखविलेली प्रवृत्ती लक्षात घेऊन अनेकांचा सत्कार करण्यात आला व दंगलीत हौतात्म्य प्राप्त झाले त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन करण्यात आले.

त्यानंतर कमलेश्वर यांच्या अध्यक्षतेखाली खुले अधिवेशन झाले त्यात मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा विधानसभा परिषदेचा ठराव अंमलात आणावा, दंगलीची न्यायालयीन चौकशी व्हावी, विस्थापितांचे ऐच्छिक पुनर्वसन व्हावे, जागांच्या आरक्षणाची व अग्रक्रमाची पद्धत चालू ठेवावी, भटक्या विमुक्त जातीजमातींचा समावेश आदिवासी परिशिष्टीय यादीत करावा, जाहीररीत्या वर्णवार व अस्पृश्यतेचा पुरस्कार करणाऱ्या शंकराचार्यांच्या वक्तव्याचा निषेध करून खटला भरावा, सर्व जमिनींचे राष्ट्रीयीकरण करावे, शासनातर्फे देवादिकांची चाललेली पूजा थांबवावी, पाठ्यपुस्तकात समता, स्वातंत्र्य, बंधुभाव हे उदात्त संस्कार करणारी तत्त्वे असावीत हे महत्त्वाचे ठराव संमत झाले.


येत्या वर्षी नाशिक येथील डॉ. आंबेडकर यांच्या 'काळामंदिर सत्याग्रहा 'स पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने चौथे दलित साहित्य संमेलन नासिकला घेण्याचे ठरून दोन दिवसांचे हे संमेलन संपले.

–अविनाश सहस्रबुद्धे

---


## हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?
## राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?

या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........



# नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर

आवृत्ती : तिसरी (सचित्र)

किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे